सुभाषितांचे प्रयोजन मानवी मनावर योग्य संस्कार करुन त्यांची भावनिक व वैचारिक उंची वाढवणे होय. सुभाषिते ही मानवाला त्यांच्या जीवनातील गुणदोष दाखवतात. मानवी जीवनाला अर्थपूर्ण बनवण्यासाठी सुभाषिते उपयोगी असतात. चक्रधर, ज्ञानेश्वरांपासून तर तुकारामांपर्यंत त्यांच्या अभंग–ओवीमधून अनेक सुभाषितांनी मराठी साहित्याला समृध्द केले आहे.

## संत तुकारामांची सुभाषिते :

मराठी साहित्यामध्ये तुकाराम महाराज यांच्या साहित्यामधील म्हणजे अभंगातील सुभाषितांचे अनेक प्रकार करता येतात. तुकारामांनी समाजातील अनेक घटकांचा मूळापासून अभ्यास केला होता. त्याकरणाने त्यांच्या अभंगात, वृक्ष, वेली, पशु, पक्षी, अनेक आजार, ढोंगी साधू, इत्यादी अनेकांचा संपूर्ण पट मांडलेला दिसतो. तुकारामांनी माणसातील चांगले–वाईट, ढोंग, आळस इत्यादींचा लेखाजोखा अनेक दृष्टातांमधून उलगडून दाखवला आहे. प्रस्तुत शोधलेखामध्ये तुकारामांच्या निसर्गविषयक दृष्टातांचे संशोधन केले आहे.

## तुकारामांचे निसर्गविषयक सुभाषिते :

निसर्ग हा माणसाला घडवणारा मूलात्रोत आहे. माणूस निसर्गाची उत्कृष्ट निर्मिती मानली जाते. निसर्गाने माणसाची निर्मिती करताना भेदाभेद केला नाही. निसर्गामध्ये भेदाभेद नाही ही जाण तुकारामांना होती. अभंगातून अनेक निसर्गविषयक सुभाषिते आढळून येतात. निसर्ग हा मानवाचा सोबत आहे. निसर्गविषयक जाणिवांमधून मानवी दोषावर बोट ठेवणे इतकेच तुकारामांचे कार्य नसून, माणसाचा व निसर्गातील अनेक पशुपक्ष्यांचा संबंध कसा जुळतो हे दाखवणे हा आहे.

## वृक्षविषयक सुभाषिते :

तुकारामांचा निसर्ग सोयरा आहे. त्याजवळील मृदुता, कोमलता, सहजता, भेदाभेदातीत वृत्ती मनाला भावणारी आहे. आपल्याला ज्या पध्दतीने काम करायचे आहे. त्याप्रमाणे ध्येय समोर ठेवायला पाहिजे. पण माणूस प्रयत्नांपेक्षा अधिक फळ मिळवण्याची इच्छा बाळगतो. हा न्याय नाही.

तुकाराम म्हणतात —

''शुध्द बीजापोटी
फळे रसाळ गोमटी'' अ. क्र. ६२

बी हे शुद्ध असले पाहिजे तरच त्याचे चांगल्या झाडात रुपांतर होते. त्याला रसाळ फळे लागतात. जर बीज कुचके असेल तर मात्र त्याची झाडचं उगवणार नाही. सुभाषित आही प्रसिध्द आहे. कुठल्याही बाबीची रुजवणूक योग्य नसेल तर त्याला अपेक्षेप्रमाणे यश लाभत नाही. यासाठी तो सर्वत्र वापरले जातात.

या बी ची ताकद किती असते या विषयीचे विचार तुकारामांनी अभंगवाणीतून मांडले आहेत ते म्हणतात.

''ओले मूळ भेदी खडकाचे अंग
अभ्यासाचि सांग कार्य सिद्धी'' अ.क्र. १४००

बीला जेव्हा ओलावा मिळतो तेव्हा ती ताकदीने बाहेर येते. तिच्यामध्ये खडकालासुध्दा भेदण्याची क्षमता निर्माण होते. यामधून तुकारामांना सूचवण्याचे आहे की, कोणतेही कार्य करण्यासाठी अभ्यास महत्वाचा आहे तेव्हाच ते काम पूर्णत्वास जाते. या सूभाषितामधून त्यांनी अभ्यास आणि कार्य सिध्दीयांची सांगड घातली आहे.

तुकारामा महाराजांनी काही वृक्षांचे गुण माणसाच्या स्वभावासोबत जोडल आहेत. त्यामध्ये निंब, बोरी, बाभळी, केळी, लव्हाळे, वेळु, चंदन, सुर्यफुल, सिंलगणी, नारळ, फणस, ऊस, तुळस, गांजर इत्यादींचा उल्लेख त्यांच्या सुभाषितांमधून व्यक्त होतो. तुकाराम नुसता त्या वृक्षाचा उल्लेख करुन थांबत नाहीत तर त्याचे माणसाच्या जीवनातील महत्व, त्याच्यासारखेच माणसाचे असणारे स्वभाव आणि त्यावरील उपाय आपल्या सुभाषितामधून सांगतात. कडू खाणे किंवा कडू रस पिणे सहसा कुणालाच आवडत नाही. तुकाराम सांगतात —

''तुका म्हणे येथे न मना विषाद
निंबोविण व्याध तुटो नये'' अ.क्र. ८२०

एखादा उपदेश किंवा औषध जरी कडू असले तरीही ते स्वीकारणे गरजेचे आहे. कडू औषधाने व्याधी बरी होते. त्याप्रमाणे प्रबोधनाने माणसाच्या मनातील अंधकार दूर होतो. हा अर्थ या सुभाषितामधून सूचित होतो. माणसांमध्ये आज संवाद कमी होत
चालला आहे याचे विचारांचे सुभाषित तुकारामांच्या अभंग वाणीत सापडते.

''केळी आणि बोरी वसती सेजारी
संवाद कोणे परी घडे येथे''[३] अभंग क्र. ३५८५

दोन विरुद्ध विचाराचे आचाराचे माणस एकमेकांसोबत संवाद करीत नसतील तर त्यांच्यामध्ये बदल घडणार नाही. ज्याप्रमाणे बोरी आणि केळी यांचे गुणधर्म भिन्न आहेत त्याचप्रमाणे समाजात भिन्न गुणधर्मांची लोक आढळतात.

तुकारामांनी नम्रतेला महत्त्व दिले आहे. दुर्जनाशी प्रत्येकवेळी वाद घालणे किंवा त्यांच्याशी लढणे हितावह नाही. तुकाराम सांगतात—

''महापुरे झाडे जाती
तेथे लव्हाळे वाचती''[४] अभंग क्र. १२८३

आपत्ती जेव्हा येते तेव्हा स्वसंरक्षण महत्वाचे असते. लव्हाळे पुरामध्ये स्वत:ला वाचवण्याचा प्रयत्न करतात तेथे झाडे वाहुन जातात. या सुभाषितामधून लव्हाळाच्या माध्यमातून नम्रतेचे महत्व अधोरेखित केले आहे.

माणसाची क्षमता मांडताना तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगवाणीतून वेगवेगळ्या सुभाषितामधून अनेक मापदंड वापरले आहेत. नुसती उंची असुन काम चालत नाही त्यासोबत गुण महत्वाचे आहेत. वेळ आणि चंदनाचे उदाहरण देऊन तुकारामांनी ते स्पष्ट केले आहे. ते म्हणतात—

''वेळू चंदनासंगति
काय ते नसति जवळीक''[५] अ. क्र. ३४००

दोघेही सोबत राहतात. उंच वाढतात. तरीही चंदनाचे गुण सुवास बांबुला येत नाही. यावरुन चांगल्या माणसाचे गुण जोपर्यंत आपण संपादन करीत नाही, तोपर्यंत आपल्याला त्याचा फायदा नाही, असे तुकारामांच्या सुभाषितावरुन सूचित होते.

लोकांना नेहमी स्तुती करणारे मित्र हवे असतात. त्यांच्या हिताचे जरी आपण काही सांगत असलो पण त्यासाठी कठोर वाणी वापरली तर त्यांना वाईट वाटते. संत प्रबोधनाची भाषा वापरतात. तेव्हा लोकांना वाईट वाटते. तुकारामांनी त्यांना सांगितले आहे की

''बोलिलो जे काही तुमचिया हिता
वचन नेणिता क्षमाकीजे'' अ.क्र. १३१

मी तुमच्या हिताचे बोलत आहे. तोपर्यंत हे सुभाषित तुम्हाला समजणार नाही तोपर्यंत तुम्हाला ते अनुकूल वाटणार नाही. केव्हाही घाईघाईने निर्णय घेऊ नका. घाईघाईने निर्णय घेणे धोकादायक ठरु शकते. हा संदेश त्यांनी दिला आहे.

तुकारामांना भेदाभेद मान्य नव्हता. ते अंतरंगाला महत्व देत होते. बहिरंगाला त्यांनी पुर्णतः नाकारले. ऊस जरी बाहेरुन कठीण काळा वाटतो तरी आतमध्ये रस मधुर व गोड असतो. समाजात मात्र गांजरांच्या पुंगीसारखे लोक आहेत. ढोंग हा त्यांच्या स्थायीभाव झाला आहे. तुकाराम सांगतात—

''गांजराचे पुंगी
तैसे नवे झाले जोगी'' अ. क्र. २८५४

जोपर्यंत आपला स्वार्थ साधला जातो तोपर्यंत ते साधुपणा सांभाळतात आणि आपली मर्यादा संपली की, ते खुशाल विषयवासना तृप्त करतात. अशा ढोंगी साधूची तुकारामांनी कान उघडणी केली आहे.

जीवनाचे महत्व पटवून देताना तुकारामांनी सद्‌गुण महत्व दिले आहे. त्यांना भक्ती, प्रेम, वात्सल्य बावनकशी सोन्याप्रमाणे पाहिजे होते. नुसते नावात साम्य असून चालत नाही तर त्यामधील सद्‌गुणसुध्दा तितकेच असायला पाहिजेत. आदित्य हे नाव जरी असले त्याचा सुर्याप्रमाणे उजेड पडत नाही. त्याचप्रमाणे दसऱ्याच्या सोन्याचीही गत आहे. त्याला कुणी गहाण ठेवत नाही. तुकाराम म्हणतात—

''सिलंगणीचे सोने
त्यासी गहाण ठेवी कोण?'' अ.क्र. ४१९५

सोने हे धातू मूल्यवान आहे. आपट्याच्या पानाचे मूल्य हे एक दिवस असून सोन्याला निरंतर महत्व दिल्या गेले आहे. या उदाहरणावरुन सद्‌गुणांचे महत्व विशद केले आहे.

तुकाराम महाराजांनी अनेक प्राणीविषयक सुभाषितामधून माणसांच्या वैगुण्यावर बोट ठेवून माणसाला कार्यप्रवृत्त करण्यासाठी तसेच त्याला आपल्यातील माणुसकी ओळखण्यासाठी आपल्या अनेक अभंगातून उपदेश केला आहे. ज्यांना आज सुभाषिताचे स्वरुप प्राप्त झाले आहे. जसे प्राण्यांना आपलेच पिल्लू प्रिय असते इतरांच्या पिलाला ते जवळ घेत नाहीत. तसाच माणसांचा स्वभाव असतो. तुकाराम महाराज सांगतात—

''आपुल्या भोत चाही।
मारी करंटी पारख्या।'' अ.क्र. २७३८

गाय आपल्या वासराला चाटते मात्र इतर वासरांना लाथा मारते. माणसांना स्वतःचे हित, स्वतःचीच मूलंबाळ जास्त प्रिय वाटतात, त्याने इतरांनासुध्दा आपले समाजायला पाहिजे. हा वात्स्लयाचा संदेश तुकारामांनी इथे या सुभाषितामधून दिला आहे.

लोक टिका करताना संतानासुध्दा दुषणे देतात. तुकारामांच्या दृष्ट्या संत म्हणजे सज्जन. सज्जनाला सर्व बाजुंनी त्रास भोगावा लागतो. तुकाराम सांगतात

''तुका म्हण विंचवाची
नांगी ऐसा दुर्जन सर्वांगी'' अ.क्र. ३९६०

आपण विंचवांना विषारी समजतात. विचवांच्या नांगीतच विष असते. दुर्जनांच्या सर्वांगात विष असते. दुर्जनामुळे समाजात विंचवापेक्षाही धोका असतो. हा विचार ते या सुभाषितामधून मांडतात.

विंचवाबरोबरच तुकारामांनी गाढवांचेही उदाहरण दिले आहे. गाढवाच्या प्रतिमेतून त्यांनी सदैव घाणीत लोळणाऱ्या, घाण/वाईट विचार करणाऱ्या माणसाची प्रतिमा उभी केली आहे. ते बदलत नाही गाढव घोड्याप्रमाणे जरी ते वाटत असले तरीही पुनः पुनः उकिरड्यावर लोळण्याची त्यांची वृत्ती सूटत नाही. तुकाराम मांडतात—

''गाढव शृंगारिले कोडे

काही केल्या नव्हे घोडे'' अ.क्र. ३९५७

तुकारामांनी ही वृत्ती सोडणारे लोक हवे होते पण लोक त्यांच्या सवयी न बदल्यामुळे ते त्याच नांदी लागतात. हा त्यांचा स्वभावधर्म तुकारामांनी नोंदवला आहे.

निसर्गविषयक सुभाषितांची नोंद घेतांना तुकारामांनी फुलांची उदाहरणे दिली आहेत. फुल प्रत्येकाला हवेहवेसे वाटते. पण त्यांना चुरगाळू नये असे ते सांगतात. पर्यावरण संवर्धनाचा संदेश त्यांनी येथे दिला आहे. ज्याप्रमाणे आपल्या आवडीच्या मुलांचा आपण लाड करतो पण त्याला खात नाही. तसेच फुलांना सुध्दा जपायला पाहिजे हा विचार येथे व्यक्त होते ते म्हणतात—

''परिमल म्हणून चोळू नये फुले,
खाऊ नये मूल आवडीचे'' अ.क्र. १६४

मुले, फुले चांगल्या तऱ्हेने जोपासायला पाहिजेत. सृष्टीची निर्मिती येथे महत्वाची ठरते. क्षमाशीलता या गुणांचे स्पष्ट करतांना त्यांनी गवताचे व अग्नीचे उदाहरण दिले आहे. क्षमेला त्यांनी शस्त्र म्हटले. ते लिहतात—क्षमाशास्त्र ज्या माणसाजवळ असते. दृष्ट त्याला काहीच करु शकत नाहीत. जसे जेथे गवत नाही तेथे अग्नी पडला तर आपोआप विझून जातो. तसेच एखादा माणूस कितीही रागावला तरी क्षमाशील माणसांना त्याचा काहीच फरक पडत नाही. अशी अनेक सुभाषित तुकाराम महाराजांनी मांडली आहेत. जसे कठीण नारळाचे अंग/बाहेरी भीतरी ते चांग, तीर्थ धोंडा पाणी, देव रोकडा सज्जनी, इ. अनेक सुभाषितांमधून निसर्ग संबंर्धनाचा संदेश त्यांनी दिला आहे. निसर्गाने जसा भेदभाव केला नाही तसा आपण सुध्दा बाळगू नये. सर्वांना समतेने, आपुलकीने वागवावे हा विचार यामागे आहे.

## संदर्भ :

१. न.चि.केळकर, सुभाषित आणि विनोद, निळकंठ प्रकाशन, पुणे १९६८, पृष्ठ क्रमांक १३
२. संपादक श्री यशवंत दाते, चिंतामण कर्वे, श्री आबा चांदूरकर, श्री चिंतामण शंकर दातार, महाराष्ट्र शब्दकोष, महाराष्ट्र कोश, पुणे, पृष्ठ क्र. ३१३१
३. श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, सचिव, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, पुणे, स्कॅनिंग करून पुनर्मुद्रण २०११,पृ. क्र. ६२
४. तत्रैव पृ. क्र. १८३
५. तत्रैव पृ. क्र. ४४१

## संदर्भग्रंथ :

१. श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, सचिव, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ,पुणे, स्कॅनिंग करून पुनर्मुद्रण,२०११.
२. तुकाराम वचनामृत, रा. द. रानडे, आर्यभूषण प्रेस, पुणे १९४६
३. मराठी कविता, जुनी आणि नवी, वा.ल. कुलकर्णी, पाप्युलर प्रकाशन, मुंबई १९९०
४. सुभाषित आणि विनोद, न. चि. केळकर
५. प्राचीन मराठी वाड्मयाचा परामर्श, डॉ. श्री. म. पिंगे, अजय प्रकाशन, औरंगाबाद १९९५.
६. संपादक श्री यशवंत दाते, श्री चिंतामण कर्वे, आबा चांदोरकर, श्री चिंतामन शंकर दातार, महाराष्ट्र शब्दकोश, महाराष्ट्र कोश मंडळ लिमिटेड, पुणे

❖❖❖

# असहकार चळवळीतील पार्वतीबाई पटवर्धनांचे कार्य

प्रा.डॉ. आर.यु. हिरे
जिजामाता कला महाविद्यालय,
दारव्हा, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
ramdhanuhire@gmail.com ९४०४३७५१४२

## प्रस्तावना :

संपूर्ण देशाला आपल्या कतृत्वाने व कार्याने ओळख करून देणा—या थोर समाजसेविका पार्वताबाई पटवर्धन यांचा जन्म सातारा जिल्हयातील वडुत येथे सर्व सामान्य कुंटुबात झाला.बालवयातच वडीलांचा मुत्यृ झाल्यामुळे त्यांचे पितृत्व हिरावल्या गेले.त्यामुळे त्यांच्या पालन पोषणाची संपुर्ण जबाबदारी त्यांच्या काकांनी स्विकारली.त्यांचे काका सरकारी नौकरदार होते. सरकारी नौकरदार वर्गाची वारंवार बदल्या होत होत्या.अशाच पध्दतीने त्यांच्या काकांची सुध्दा बदली नागपुर येथे झाली.आणि त्या सुध्दा काकांसोबत नागपुरला आल्यात.नागपुरला त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था भिडे कन्या शाळेत झाली. त्यानंतर कांकाची बदली बनारस येथे झाल्यामुळे त्यांना ही तेथे जावे लागले आणि तेथेच त्यांचे माध्यमिक शिक्षण झाले.बनारस हे क्रांती कार्यास पोषक असल्यामुळे सर्वत्र क्रांतीचे विचार प्रसारीत झाले.त्यामुळे पार्वतीबाई यांच्यावर बनारस येथील वास्तव्यास काळात त्यांच्यावर क्रांतीकारी विचारांचा प्रभाव पडण्यास सुरूवात झाली.अशातच त्यांचा परिचय ॲनी बेझंटशी झाला. बेझंटबाईच्या विचाराचा सखोल परिणाम होवुन पार्वतीबाई बेझंटबाईच्या कार्यक्रमात सातत्याने सहभाग घेत असे.बनारसचे शिक्षण संपल्यानंतर पार्वतीबाई नागपुर आल्यात. त्याच दरम्यान त्यांची भेट व परिचय देशसेवा व समाज सेवा करण्या—या डॉ.शिवाजीराव पटवर्धन यांच्या सोबत झाला.या भेटीचे रूपांतर १९१८ साली विवाहात झाले.डॉ.शिवाजीराव पटवर्धन यांनी विवाहापुर्वी पार्वताबाईंना देशसेवा व समाजसेवा करण्याबदल सांगीततले होते.विवाहबध्द झाल्यानंतरच्या काळात महात्मा गांधी असहकार चळवळ सुरू केली.त्याचा प्रभाव डॉ.शिवाजीराव पटवर्धनवर पडुन त्यांनी आपली वैद्यकीय व्यवसाय बाजुला ठेवुन देशसेवेसाठी गांधींजींच्या असहकार चळवळीत उडी घेतली.त्याचा परिणाम पतीच्या पावलावर पाउल ठेवुन पार्वतीबाई यांनी पतीचे धोरण स्विकारून असहकार चळवळीत उडी घेवुन स्त्रीयांमध्ये असहकार चळवळीची जनजागृती करून हजारो स्त्रीयांना असहकार चळवळीत सहभागी करण्यात महत्वाचा वाटा उचलला.त्या करीता त्यांनी हजारो ठिकाणी सभा घेवुन जनजागृती केली.

इंग्रजांच्या जाचक व शोषक धोरणामुळे इंग्रजी राजवटी विरूध्द सर्व देशभर असहकार चळवळीचे वातावरण तयार झाले. त्याला पक्केरूप देण्यासाठी नागपुर येथील राष्ट्रीय कॉग्रेंसच्या अधिवेशनात चक्रवर्ती राघवाचार्य यांच्या अध्यक्षतेखाली असहकाराचा ठराव पारीत करण्यात आला.या अधिवेशनाला बहुसंख्य स्त्रिया उपस्थित होत्या.याचे श्रेय पार्वतीबाई पटवर्धन यांनाच द्यावे लागते.याच अधिवेशनात म.गांधींनी एक वर्षात देशाला स्वातंत्र्य मिळवुन देण्याची ऐतिहासिक घोषणा केली.या घोषणांचा परिणाम अमरावती शहरावर पडुन अमरावती येथील देश सेवकांनी असहकार चळवळीची जनजागृती केली.पत्रके वाटुन १४ जानेवारी १९२१ला तिळसंक्रांत सणनिमित्त परदेशी साखरेचा वापर म्हणजे देशद्रोह होय जनजागृती केली. त्याचा सखोल परिणाम महीलावर पडुन त्यांनी परदेशी साखरेचा वापर केला नाही.त्यामुळे पार्वतीबाई यांनी अमरावती येथील राजकारणात सहभाग घेवुन महीलामध्ये असहकार चळवळी बाबत जनजागृती करण्यासाठी अमरावती महीला समाज नावाची संस्था स्थापन करून स्त्रीयांची कर्तव्य व जबाबदारी यावर प्रभावी विचार मांडुन स्त्रीयामंध्ये जनजागृती केली.

विदर्भात महीलामध्ये असहकार चळवळ रूजविण्याचे महान कार्य पार्वतीबाई पटवर्धन यांनी केले. ४ ऑगष्ट १९२१ साली अमरावती येथील लक्ष्मीनारायण मंदीरात नगर महीला कॉग्रेस कमेटीच्या कार्यकारी मंडळ निवड समितीची सभा सपन्न झाली या सभेत सर्वानुमते अध्यक्ष म्हणुन लक्ष्मीबाई खापर्डे यांची अध्यक्ष म्हणुन निवड झाली. त्या सभेला संबोधीत करतांना पार्वतीबाई पटवर्धन यांनी स्त्री वर्गाचे सद्याचे कर्तव्य काय असावे यावर मनोगत व्यक्त करून स्त्री वर्गात स्वातंत्र्य चळवळी बद्दल प्रेरणा निर्माण केली.असहकार चळवळीचा प्रचार करण्यासाठी महात्मा गांधी विदर्भाच्या दौ—यावर आले तेव्हा त्यांची सभा अमरावती येथे सपन्न झाली.या सभेत महात्मा गांधीजींच्या हिंदी भाषणाचा अनुवाद पार्वतीबाई पटवर्धन यांनी मराठी भाषीक अमरावती येथील महीलांना सांगीतला होता.

महात्मा गांधीच्या असहकार चळवळीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी पार्वतीबाई पटवर्धन यांनी संपुर्ण पश्चिम विदर्भात दौरा करून ठिकठिकानी सभा घेवुन असहकार चळवळ यशस्वी होण्यासाठी जनजागृती केली.त्यामध्ये दारव्हा, कारंजा, मुर्तिजापुर, शेगांव,यवतमाळ,आकोट,खामगांव पुसद,वाशिम आदी ठिकाणी सभा घेतल्या.

पार्वतीबाई पटवर्धन यांच्या असहकार चळवळी संदर्भात केलेल्या प्रचारचा परिणाम पश्चिम विदर्भावर पडुन वकीलांनी वकीली तहकुब केली,ग्रामात पंचायती स्थापन करून गावातील वाद गावात सोडुन जातीय ऐक्य स्थापले, ग्रामिण भागात स्वातंत्र्य चळवळीची माहीती व्हावी म्हणुन वाचनालय स्थपन करण्यास प्रोत्साहन दिले. राष्ट्रीय शाळा उभारण्यास सुरूवात केली, झंजावाती प्रचारमुळे ग्रामीण भागातील जनता कॉग्रेसकडे अधिक आकर्षीत झाली, स्वदेशीचा प्रचार झाल्यामुळे हातमाग उद्योग विकासाच्या प्रवाहात आला,हिंदु–मुसलीम ऐक्या स्थापण्यास सुरूवात झाली,परदेशी मालाचा खप कमी झाला आदी परिणाम असहकार चळवळीच्या प्रचाराने घडुन आलेत.

संपुर्ण देशात लो.टिळकांनी चतुर सुत्रीचा प्रचार व प्रसार करून इंग्रज सरकारला धारेवरती धरले परंतु त्यांच्या मृत्युमुळे सर्व देशात त्यांच्या विचारांचा प्रचार करण्याची लाट उसळली त्यामध्ये पार्वतीबाई यांनी सहभाग घेवुन महीलामध्ये जनजागृतीकरण्याचे महत्वाचे कार्य केले.त्यांनी पश्चिम विदर्भात ठिकठिकानी सभा घेवुन महीलांमध्ये टिळकांचे विचार रूजविले.टिळकांच्या मृत्यु नंतर म.गांधीकडे स्वातंत्र्य चळवळीची जबाबदारी आली. त्यांच्या असहकार आंदोलनात जनजागृती करण्याचे काम पार्वतीबाई पटवर्धन यांनी केल्यामुळे म.गांधी त्यांना मुलगी मानत. यावरून पार्वतीबाई पटवर्धन यांचे काम किती मोठे असावे याची परिचीती होते.

## समारोप–

वरील वर्णनावरून असे लक्षात येते की,पार्वतीबाई पटवर्धन यांनी संपुर्ण विदर्भात महीलामध्ये जनजागृती निर्माण करून असहकार चळवळीचे वातावरण तयार केले.त्याच बरोबर महीला सुध्दा त्याच प्रमाणात सहभागी झाल्यात.त्यामुळे इंग्रजी राजवटी विरूध्द वातावरण तयार झाले त्याचा परिणाम स्वांतत्र्य आंदोलनात विदर्भाचा वाटा किती महत्वाचा होता याची जाणीव होते.विदर्भातील महीलांमध्ये असहकार चळवळीसह संपुर्ण स्वांतत्र्याच्या चळवळीसाठी महीलांना तयार करण्याचे महत्वपुर्ण कार्य पार्वतीबाई पटवर्धन केले हे विसरून चालनार नाही.

## संदर्भ ग्रंथ –

०१. कारंजकर भि.दे.–अमरावती शहराचा इतिहास
०२. डॉ. पाठक दमयंती –भारताच्या स्वांतत्र्य लढयात विदर्भातील महीलांचे योगदान
०३. डॉ. वक्कणी नि.आ.–आधुनिक विदर्भ का इतिहास
०४. जीवन मासिक–विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोन अमरावती
०५. जीवनव्रती दाजीसाहेब, श्रीमती उर्मिला भाकरे.

❖❖❖

# आदिवासी गोंडी दंडार

प्रा. नितीन जगदिश टेकाम
श्री बा. दे. पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
E-mail: nitintekam123@gmail.com भ्रमणध्वनी: ९६०४९४०४२४

लोकसाहित्य म्हणजे लोकांनी लोकांसाठी निर्माण केलेले साहित्य म्हणजे लोकसाहित्य होय. त्यात लोकगीते, लोककथा, उखाने, दंतकथा, आख्यायिका, लोकनाट्य, यासारख्या वेगवेगळ्या घटकांचा समावेश केल्या जाते. लोकसाहित्य हे ख-या अर्थाने मानवी जीवनाचा आधार आहे. मानवी जीवन आनंददायी करण्यासाठी लोकसाहित्याला मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. लोकसाहित्य समृध्द करण्यासाठी समाजातल्या वेगवेगळ्या जाती–धर्माचे जेवढे योगदान आहे तितकेच आदिवासी समाजाचेही योगदान आहे. आजही आदिवासी समाज जंगलजिव्हा-यात, द-याखो.यात, गिरीकुंहरात राहून आपल्या जीवन मरणाचा अर्थ शोधत आहे. निसर्गाकडून मिळणा. या सामर्थ्याचा आणि शक्तीचा लाभ घेवून आनंदाने जीवन जगत आहे. या धकाधकीच्या जीवनात आजही तो आपल्या सांस्कृतिक संचिताचे जतन करतांना दिसतो. जीवनातलं भयावह दारिद्रय आणि संघर्षमय जीवनात सुखी राहण्याचा मार्ग या वनपुत्रांना त्यांच्या लोकसाहित्याच्या माध्यमातून मिळते. 'नृत्य' हा त्यांच्या जीवनाचा आत्मा आहे. त्यातल्या त्यात 'दंडार' या लोकनृत्याला महाराष्ट्रात काही जमातीमध्ये खूप महत्त्वाचे स्थान आहे. त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे मांडता येईल.

## आदिवासींच्या गोंडी दंडाराची उत्पत्ती–

आदिवासी समाजात लोकनृत्याचा उगम धर्मभावनेतून झाला आहे असे समजून 'बडादेव' यांनी आपल्याला नृत्ये दिली आहे. असा त्यांचा एकंदरीत विश्वास आहे. एकदा कलसरी मातेला प्रसन्न करण्यासाठी नारनदेवाने सर्वप्रथम 'काबडनाच' केला होता तेव्हापासून तो प्रचलित आहे. महाराष्ट्रातल्या गोंड समाजाची अशी एक श्रध्दा आहे की, 'दंडार' हा भिवसन देवाने सुरू केला आहे असे ते मानतात. दंडाराच्या उत्पत्तीविषयी आणखी एक कथा मिळते ती अशी की खूप वर्षापुर्वीची कथा आहे. सियनूर, घुमनूर पहेळा नावाच्या गावी गोदमले नावाचा द्रविडवंशिय राजा होता. त्याला रामाढोली नावाची पत्नी होती. या दोघांना यदीराहुळ, जुगादीराहुळ, शिरमाराहुळ, अराहुळ आणि दौदल्याराहुळ अशी पाच मुले होती. ती पाचही मुले अविवाहित होती. ते गावा गावात भटकंती करत एका छोटयाशा गुदमासुर पटेला या गावी आले. त्या ठिकाणी त्यांना पद्मालपुरी कोको (बाई) वतुसमासुर आजोबा त्यांच्याकडे घरकाम करण्यासाठी हिराज्योती माळको नावाची नात राहत होती. त्या पाच भावांना हिराज्योती विषयी कळताच तिला वश करण्यासाठी 'दंडार' घेवून गेले आणि गुदमागुर गावी मुलीच्या दारी पोहचले. पाच भावांनी केलेल्या वेशांतरामुळे ते लोकांच्या नजरेत भरले होते. दोदल्याराहुळ आणि शिरमाराहुळ या दोघांनी तरबुडी व पर्श हे वाद्य वाजविण्यास सुरूवात केली. लोकांची गर्दीही वाढता वाढू लागली. यदीराहुळ, जुगादीहुळ वाद्याच्या तालासुरावर नृत्य करू लागली. मुलीची आजी पद्मापुरी नातीला घरात बंद करून नृत्य पाहावयास बाहेर आली. बाहेर नृत्य जोमाने चालू होते. बाहेर चाललेल्या वाद्यांचा आवाज मुलीला बाहेर येण्यास प्रवृत्त करत होता. तेवढ्यातच त्या मुलीने दंडार पाहण्यासाठी कुडाच्या भिंतीला छिद्र पाडून लपून–छपून नृत्य पाहू लागली. त्या नृत्याने ती मंत्रमुग्ध झाली होतीय उत्सुकतेपोटी आपल्या कुडाची भिंत पाडून बाहेर आली. नृत्य पाहण्याच्या दरम्यान दोदल्या व मुलगी एकमेकांकडे आकर्षित झाले आणि एकमेकांना मनापासून आवडू लागले नृत्याच्या दरम्यान दोघांनी आपापले प्रेम अभिव्यक्त करून त्यांनी विवाह केला. अशी ही दंतकथा आजही दंडारीच्या उत्पत्तीसंबंधी महत्वपूर्ण मानली जाते. या 'दंडार' नृत्याच्या माध्यमातून पुढे विवाह करण्याची पध्दत पुढे रूढ झाली. हा नृत्यप्रकार प्राचीन काळापासून गोंड. परधान, कोलाम, आंध या जमातीमध्ये साजरा केला जातो. या नृत्याचा प्रारंभ आखाडी पौर्णिमेपासून होतो. यवतमाळ जिल्ह्यात दक्षिण भागात 'दंडार' नाचण्याची प्रथा पुरातन काळापासून चालत आलेली आहे. दरवर्षी या नृत्याच्या प्रारंभी आखाडीच्या दिवसापासून धार्मिक पद्धतीने, विधीवत पूजा गावप्रमुखांच्या घरी केली जाते. या घरांना आखाडा असे म्हणतात. पूजेच्या दरम्यान सागवानाच्या झाडापासून तयार केलेल्या मुखवट्याचे गुप्तपणे त्याची पूजा प्रधान व्यक्ती करतो. त्या मुखवट्याला 'कोडाल' असे म्हणतात. 'कोडाल' हा मुखवटा भिवसनाचा असतो. पूजा विधीच्या दरम्यान पुजा याच्या अंगात भिमालपेन देवाचा संचार होतो. म्हणून त्याला 'घुसडी' असे म्हणतात. दंडारात घुसडीशिवाय दंडार नृत्य होत

नाही. पूजेला प्रारंभ झाल्यापासून घुसडीला सामान्य व्यक्तीपेक्षा वेगळे समजले जाते. कारण 'घुसडी' हा कोडालदेवाचे म्हणजे भिमालपेनचा मुखवटा धारण केल्यामुळे त्याला देव मानून त्याचे पूजन करतात आणि नवस बोलतात. घुसाडीचा त्या दिवशीचा पेहराव हा लंगोटीसारखे धोतर नेसून उघड्या शरीरावर राख फासून पांढरे पट्टे ओढतात. घुसाडीच्या कमरेला घाघरमाळा बांधलेला आणि पायाला घुंगराची माळ बांधलेली असते. मुळात हा नृत्यप्रकार पंधरा दिवस सतत चालत असतो. दंडारा दरम्यान घुसडीचे नृत्य हे एक धार्मिक विधी आहे. त्याची विशिष्ट नियमांनी अनुसरून ती विधी पार पाडावी लागते, म्हणून या नृत्याला समाजात महत्त्वाचे स्थान आहे असे म्हणावे लागेल.

आदिवासी समाजात दंडारीची निर्मिती आध्यात्मिक शक्तीतून झाली असा त्यांचा समज आहे. मुळात हा ''दंडार'' भिवसन देवाच्या आशीर्वादामुळे मिळाली आहे. त्यांच्या स्मरणार्थ दंडाराच्या दिवशी कुवारा भिवसनविषयी नव्या पिढीला माहिती पुरविल्या जाते. एका गोडी गितात भिवसनाची माहिती मिळते ती पुढील प्रमाणे—

''तिरू भिमगड पेंच समुंदर मट्टाता भूवान।
भिमाल धोंडी आन्दुने राजा करंगुना मर्यान।।
बोदाझीरी चिखाकारी नागवारी पोयार।
नांदपारा कोलीसारा मराकनारा दुवार।
येरगुट्टा कोरतोर इमा, वायोर लांजिविना पोयाने।
पेन गोदावरी हेरी हंजी, गणकून सकता सीये वाल।।
मावा कुयवा राज लायी, मात्रे वासी इमागुंजा।
ओभिन गठातेर राजा, मावमिनेत इमा केजा।।''

दंडारीतला गावप्रमुख आपल्या नव्या पिढीला भिवसनाविषयी, त्याच्या अस्तित्वाविषयी माहिती देतो. म्हणजेच हा भिवसन मध्यप्रदेशात सातपुडा पर्वताच्या रांगेतील बय्यर लांजीगण राजधानीत चैत्र पौणिमेच्या दिवशी भुरा—भुमक जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यात आहे. भिवसन हा गोंडी पुणेम धर्माचा सेवाभावी, सत्ताधारी राजा होता अशी कोया समाजात त्याची गणना केली जाते. अशा प्रकारे लोकगीतातून भिवसेनाविषयी माहिती ज्ञात होते. 'दंडार' सुरू व्हायच्या काही दिवसा अगोदर नवीन मुलांना दंडार नाचण्यास इच्छुक असणा—यांचा सराव घेतल्या जाते. ज्या व्यक्तीला दंडारीचे संपूर्ण ज्ञान आहे. अशा व्यक्तीस 'कोलावेह' असे म्हणतात. तो सगळ्यांना शिकवतो. दंडार एखाद्या पोडावरच्या विविध देवदेवतेची पूजा अर्चना करणे, त्यांना प्रसन्न करण्यासाठी नाचणे, गाणे हा त्यांच्या जीवनाचा भाग असतो. प्रामुख्याने दंडारीचे एकंदरीत चार प्रकार पडतात.

१) मोठी दंडार
२) लहान दंडार
३) चौताली दंडार
३) रेला दंडार

मोठी दंडार ही दोन्ही हातात टिप.या घेवून एका विशिष्ट प्रकारे लुगडयाचे घेर नेसून नृत्य केले जाते. लहान दंडारात एका हातात टिपरी घेवून वाकून नाच केला जातो. चौताली दंडारात कोलाम जातीतील लोकं नृत्य करतात. या नृत्यात एका हातात टिपरी आणि दुस—या हातात रंगीत रूमाल घेवून नाचावे लागतात. तर रेला दंडारात केवळ महिलाच टिप—याविना एकमेकांच्या हातात हात घालून नृत्य करतात. दंडारीच्या रक्षणासाठी घुसाडी (भगत) दंडार नाचत असतांना दंडारी सभोवती लाकडी मुकुट घालून फिरत असतो दोन गावचे दंडारी समोरासमोर आले की, एकमेकांना मान सन्मान दिला जातो. घटया, कारभारी, महाजन, भूमक यांनाही क्षेमकुशल विचारले जातात आणि आपल्या मार्गाने निघून जातात. चौताली दंडारी व्यतिरिक्त इतर दंडारी नृत्यात फक्त चार दिवस संपूर्ण साज श्रृंगार घेऊन लक्ष्मीपूजन ते भाऊबीजेच्या दुसऱ्या दिवसापर्यंत सार्वजनिक स्वरूपात गावोगावी जाऊन वर्गणी गोळा करून दुस—या दिवशी त्याची समाप्ती भिवसन देवाच्या ठाण्याजवळ केली जाते. त्याला '' कालाबोळी '' असे म्हणतात. या दंडारात नृत्य करतांना लोकगीतांनाही महत्वाचे स्थान असते. या नृत्य गीतासोबतच वाद्यांचाही समावेश होतो. त्यात ढोलक, तरबुडी, बासरी, सनई, झांज, तुनतुने इत्यादी वाद्यांची मदत होत असते. वाद्यांच्या तालावर देहभान विसरून आप—आपली संस्कृती, प्रथा, परंपरा जपून एक पिढी आपल्या दुसऱ्या पिढीची मनोभूमी नागरून त्यात समाज संस्कृतीचे बीज पेरतांना दिसून येते.

एकंदरीत विचार करता 'दंडार' हा आदिवासी समाजाचा महत्वपूर्ण नृत्यप्रकार आहे. सकल समाजाला एकत्र करून आपल्या संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्यास हा नृत्य प्रकार महत्वपूर्ण वाटतो. 'दंडार' हा बराचसा रंजत प्रधान असला तरी त्यांचा संबध धर्मविधीशी तर आहेच पण त्याच बरोबर ईश्वराविषयी, निसर्गाविषयी एकरूप होऊन

त्यांचा व्यक्त होणारा भक्तीभावही आविस्कृत होतो. दंडारात होणा—या नृत्य,गायन,संगीत, अभिनयामुळे वेगवेगळ्या कलेला वाव मिळतो. त्याच बरोबर आध्यात्मिक कार्यात पुरूषाबरोबर स्त्रियांनाही तितकेच महत्त्वाचे स्थान मिळते. त्यामुळे धार्मिक कार्यात आदिवासी स्त्रियांचाही वाटा उपयुक्त ठरतो. असे म्हटल्यास चूक होणार नाही. आज गावा—गावातून दंडारिची प्रथा दिवसेंदिवस कमी होताना दिसून येते त्याचे प्रमुख कारण म्हणजे आपल्यावर होणारे पाश्चिमात्य संस्कृतीचे आक्रमण, शिक्षण, दळणवळण या कारणामुळे गाव कुठेतरी ओस पडलेली दिसून येते. शहरातील चमचमाट, आधुनिकतेची जाण असणारा स्वतःच्या या पुरातन परंपरेला मागासलेपणा समजतो. मुळात कुठलीही संस्कृती, प्रथा, परंपरा, ही मुळासकट वाईट किंवा टाकाऊ नसते. जर एखाद्या परंपरेमुळे समाजातली लोक एकत्र येत असेल, गुण्या गोविंदाने नांदत असेल, त्या परंपरेमुळे प्रेम, समता, बंधुता, माणुसकी या मुल्यांना बहर येत असेल तर त्याचा स्वीकार करून त्याला जीवंत ठेवणे हे आपलं आद्य कर्तव्य आणि काळाची गरज ठरते असं म्हटल्यास वावगं ठरू नये.

## संदर्भ सूची


१. लोकसाहित्याचे स्वरूप, प्रभाकर मांडे, प्रथम आवृत्ती, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, १९७८.
२. आदिवासीचे सण उत्सव, डॉ. सरोजिनी बाबर, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला पूष्प २४, प्रथम आवृत्ती पुणे १९८३.
३. आदिवासी साहित्य स्वरूप व समीक्षा, डॉ.विनायक तुमरान, प्रथम आवृत्ती, विजय प्रकाशन, पुणे १९९४.
४. आदिवासीची कलाजीवन व आदिवासीची लोकनृत्य, गोविंद गारे
५. संकलित केलेली माहिती.


❖❖❖

# उ.रा. गिरी यांची भावकविता

डॉ. गजानन भाऊराव घोंगटे
श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय
वनोजा, जि वाशिम, महाराष्ट्र (India)
Email - ghongategajananb@gmail.com भ्रमणध्वनी ९८२२४०६११५

प्रस्तावना :

प्राचीन कवितेमध्ये प्रामुख्याने निवृत्तीवाद दिसतो. त्यात अध्यात्म, परमार्थ, ईश्वर, भक्ती या संकल्पना दिसतात. परंतु काळाच्या ओघात संतकविता किंचित मागे पडली व भावकविता समोर आली जी कविता आशयगर्भ व समाजातील भावदर्शन घडविते. अशा कवितांचा प्रवाह इंग्रजी वाड्मयाच्या प्रभावाने मराठी वाड्मयातही सुरु झाला. काव्यात कविच्या भावनेला अतिशय महत्व असते. ''कवीच्या भावना जे काव्य अथवा कविता जागृत करते ते काव्य म्हणजे भावकाव्य, भावकविता. कवीचे व्यक्तिमत्व काव्यातून डोकावते. कवितेतील भावनांची तीव्रता ही काव्य स्वरुपात नसून ती अंतरंगात असते. ती विशिष्ट दृष्टीकोनाचा अविष्कार करते. कवीचा भावनाविष्कार त्याच्या कवितेतून होत असतो. प्रेमनिष्ठा, सौदर्यदृष्टी असणारी कविता म्हणजे भावकविता असते.''[१] या कवितांमध्ये बा. भ. बोरकर, बा. सी. मर्ढेकर, आरती प्रभू, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, गोविंदाग्रज अशा कवींचा समावेश होतो. या शिवाय अनेक नवोदित कवींच्या कविताही भावकविता वाटतात.

आपल्याला प्रामुख्याने उ. रा. गिरी यांच्या भावकवितेचा आढावा घ्यायचा आहे. उ. रा. गिरी हे मुर्तिजापूर तालुक्यातील लाखपूरी नावाच्या छोटयाशा गावात वास्तव्याला होते. ते व्यवसायाने शिक्षक होते. त्यांच्या कवितेतून प्रामुख्याने प्रेम, भक्तिभाव, निसर्ग, प्रासंगिकता, सामाजिकता व प्रासांदिकता जाणवते. त्यांची कविता ही चित्रमय व संवेदनशील आहे. त्यांच्या कवितेतून मानवतेचे दर्शन घडते. त्यांची कविता प्रामुख्याने निवृत्तीवादी वाटायला लागते. प्रेमातून आलेले नैराश्य, उदासिनता व एकाकीपणा त्यांच्या कवितेत दृष्टीस पडतो. ही कविता बरीचशी बोलकी तरीही अबोल वाटते.

'घोटाळले नदीचे
पायात मुक पाणी
डोळयात वाट त्याला
देऊन मी निघालो.'

यात प्रामुख्याने नेत्रबोलीचा परिचय होतो. ते औपचारिकपणे बोलत नाहीत परंतु त्यांची कविता बरेच काही सांगून जाते. त्यांची कविता प्रवृत्तीपेक्षा निवृत्तीच्या अधिक जवळची वाटायला लागते.

'झोपेत हासणाऱ्या
चुंबन राहुलाशी
माझ्या यशोधरेला
सोडून मी निघालो'

त्यांना संगीताची जाण असल्यामुळे त्यांच्या काव्यातून सांगितिक प्रतिमांचा प्रत्यय येतो.

'सोडून चाललेले,
माझे मलाच गाणे,
मी मैफितील उरलो
वर्ज्य स्वराप्रमाणे'

उ. रा. गिरी यांच्या कवितेत तालबध्दता, लयबद्धता व नादमाधूर्य जाणवते. त्यांची कविता ही गणितातील समिकरणाप्रमाणे नेमकेपणा दाखवते. या शिवाय या कवितेतून अनामिकांच्या अव्यक्त संदर्भाची अभिव्यक्ती झाल्यासारखी वाटायला लागते.

'अशाच एका सोनसकाळी
अप्रुप काही घडले होते
निरभ्र निळसर एकांतावर
मंद चांदणे पडले होते'

''उ. रा. कवितां जगले, कविता हेच त्यांचे सर्व काही तिला फूलविण्यात, मोहरविण्यातच त्यांनी आपल्या जीवनाचे सार्थक मानले. उरांचे आपल्या कवितेवर अतोनात प्रेम होते. जेव्हा एखाद्या चित्रकाराला किंवा गायकाला आपले चित्र किंवा गाणे परिपूर्ण वाटते तेव्हा ती श्रेष्ठ प्रतीची कलानिर्मिती असते. तसा कलाकार हा अमृप्तच असतो. जेव्हा तो तृप्त होतो तेव्हा त्याची कलाही परिपूर्ण असते. उ. रा. सुध्दा आपल्या कवितेबद्दल तृप्त होते.''[२]

उ. रा. गिरी यांची कविता सौदर्यवादी, व्यक्तीवादी व शृंगारिक आहे, पण त्यांच्या शृंगारात निवृत्तीवाद प्रकर्शाने जाणवतो.

'मज कळले तू माझी'
पण सारे घडल्यावर
तू माझ्या गगणातून
उल्केपरि ढळल्यावर'

हा प्रत्यय त्यांच्या शृंगारिक कवितेतून येतो.

'करसैल गळयातील
करपाश रेशमाचे
सखी रत्नदीप आता
विझलेत वासनांचे'

त्यांच्या कवितेतून अतृप्ती, तृषार्तता यांचा प्रत्यय येतो. त्यांच्या कवितेतून प्रेयसीला तें देवत्व बहाल करतात या बद्दल दऊत लेखणीमध्ये याचा उल्लेख आला आहे तो पुढील प्रमाणे—

'बोलू नये ते बोलून गेलो,
मोकळ्या मनाने तुझ्यापाशी
सच्चा स्वरात गाऊन गेलो
मोकळ्या गळ्याने तुझ्यापाशी'

''प्रेयसी अन् परमेश्वर दोघांनाही ही कविता अनुरुप .... साजेशी, अशी वाटते.''[३] उ. रा. गिरी यांची कविता त्यातील आशयघनता कवी अनिल, ग्रेस, बा. भ. बोरकर मंगेश पाडगावकर यांच्या मार्गावरुन वाटचाल करताना दिसते. पण सारे घडल्यावर ही कविता कुसूमाग्रजांच्या कवितेच्या अनुरुपतेशी नाते सांगणारी वाटते.

मराठीतील भावकवितेची नाळ केशवसुत, बालकवी, भा. रा. तांबे यांच्या कवितेशी जुळलेली आहे. केशवसुतांच्या कवितेतील आत्मनिष्ठा बालकवींच्या कवितेतील शुध्द निसर्ग, भा. रा. तांबे यांच्या कवितेतील प्रेम या सर्वांशी उ. रा. गिरी यांच्या कवितेचा ऋणानुबंध जुळतो. प्रेम हा तर त्यांच्या कवितेचा आत्मा आहे, तर प्रेमभंग या कवितेतून प्रतिबिंबित होताना दिसतो.

उ. रा. गिरी यांची कविता विविधांगी आहे. विविध विषयाचा आढावा घेतांनाच ती कविता, तत्वज्ञान, प्रेमभाव, भक्तिभाव व निसर्ग यांना अलगदपणे स्पर्श करते.

''गिरींची प्रेमकविता सौदर्याने नटलेली आहे. त्यात अश्लिलता नाही. ओंगळपणा नाही, नैसर्गिक प्रतिमांनी ती सजलेली आहे. केशवसुत निसर्गात तत्वज्ञान शोधतात. गिरींचा दृष्टीकोन वर्डस्वर्थ, तांबे यांच्यासारखा आहे. ते निसर्गाकडे एक चैतन्यमय वस्तू म्हणून पाहतात, प्रेमसीलाही ते निसर्ग प्रतिमा देतात''[४]

'यायचेच तर ये सोनेरी
श्रावण —शिरव्यापरी
रंगरंग तू इंद्रधनुचे

माखुन अंगावरी'

प्रेयसीला उद्देशून कवी म्हणतात की, तुला जर माझ्या आयुष्यात यायचे असेल तर 'श्रावण—शिरव्यापरी' ये, आपल्या प्रेयसीलाही ते कायमस्वरुपी स्थान देत नाहीत, असे वाटते. त्यांची कविता निसर्गाशी संवाद साधताना म्हणते की,

'या जीवनात केव्हा
होता वसंत होता
मृदु रेशमी फुलांची
शयनास सेज होती
वक्षी विसावलेली
तव सावळी अहंता'

या कवितेतून निवृत्तीचा प्रत्यय येतो. वसंत या शब्दातला 'व' जर बाजूला केला तर संत प्रवृत्ती शिल्लक उरते. वसंत हा त्यामुळेच प्रवृत्ती व निवृत्ती या दोन्हीचा प्रतिनिधी ठरतो. म्हणून उ. रा. गिरी आपल्या कवितेतून गेलेला वसंत चित्रित करताना दिसतात.

'या एकलेपणाचा
छेडित मी पियानो
ओठास भैरवीच्या
दंशून जा स्वरांनो'

उ. रा. गिरी यांना संगीताचे ज्ञान होते त्यामुळेच त्यांच्या कवितेत नादबद्‌धता, तालबद्‌धता व गेयता या जाणिवा प्रकट होताना दिसतात. उ. रा. गिरी यांना संगीताचा व्यासंग होता, गुणगणण्याचा छंद होता त्यामुळे त्यांच्या कवितेतून नादमाधुर्याचा प्रत्यय येताना दिसतो.

## सारांश :

उ.रा. गिरींची कविता भावकविता संप्रदायात मोडणारी असली तरी गिरींना आद्य भावकवी म्हणता येणार नाही. गिरींची भावकविता भा. रा तांबे, बालकवी मंगेश पाडगांवकर, बा.भ.बोरकर, अनिल यांच्या कवितेशी नाते सांगणारी आहे. गिरींच्या कवितेतील प्रेम, निसर्ग, शृंगार, अध्यात्म समकालीन व पूर्वकालीन असे अनुबंध ठेवणारे वाटत असले तरी गेयता, लयबद्‌धता व सूचक प्रतिमांचा वापर यामुळे ती वैशिष्ट्यपूर्ण वाटायला लागते. उ. रा. गिरींची कविता कळत न कळत समकालीनांच्या मोहात पडली व त्याच रेशमी अनुबंधात ती रेंगाळली असाा तिच्यावर आरोप केला जातो. उ. रा. गिरींनी भा. रा. तांबे, बा. भ. बोरकर, वसंत बापट, मंगेश पाडगांवकर यांच्या कवितेचा साज, बाज स्विकारला असला तरी वेगळेपणाची अस्मिता कायम ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. त्यांची कविता सर्जनशीलतेपेक्षा सादरीकरणाला अधिक महत्व देताना दिसते. त्यांच्या कवितेचा पिंड शृंगार, प्रेम, अध्यात्म, निसर्ग यांच्या वर्तुळात वावरणारा असला तरी ती जगाकडे सौदर्यांच्या दृष्टीने पाहते. त्यांच्या कवितेचे स्वरुप विशुध्द भावकाव्याचे आहे. उत्कटता व रसवत्ता हे तिचे गुण आहे.

## निष्कर्ष :—

१. उ. रा. गिरी यांची कविता ही भाव कविता आहे.
२. उ. रा गिरी आपल्या कवितेत भावाची अभिव्यक्ती करतांना विविध प्रतिमांचा वापर करतात.
३. उ. रा गिरी यांच्या कवितेत सांगितिक प्रतिमांचा आढळ होतो.
४. 'मी एकटा निघालो' या काव्यसंग्रहातील कविता या गझलसादृष्य वाटतात.
५. उ. रा. गिरी यांची प्रेम कविता निसर्ग प्रतिमांमधून आविष्कृत होताना दिसते.
६. उ. रा. गिरी यांची कविता प्रवृत्तीपेक्षा निवृत्तीला स्पर्श करताना दिसते, त्यामुळेच या कवितेत बुद्‌धाचे तत्वज्ञान डोकावताना दिसते.

संदर्भ :—

१) खोडे, सुरेखा: 'उ.रा. गिरींची कविता एक चिकित्सक अभ्या', अप्रकाशित प्रबंध, पृ. क्र. १३.
२) गिरी, प्रा. अशोक : 'दऊत लेखणी', स्व. उ. रा. गिरी विशेषांक, दिवाळी १९८६, पृ.क्र. २७.
३) इंगोले, प्रा. दिवाकर : 'दऊत लेखणी', स्व. उ. रा. गिरी विशेषांक, दिवाळी १९८६, पृ.क्र. ३१.
४) तराळ, सतीश : 'दऊत लेखणी', स्व. उ. रा. गिरी विशेषांक, दिवाळी १९८६, पृ.क्र. ५४.
५) गिरी, उ.रा. : 'मी एकटा निघालो, ' अंशुल पब्लिकेशन, नागपूर, दुसरी आवृत्ती.
६) गिरी, उ.रा. : 'चंद्रायणी, ' समाजप्रबोधन संस्था, पुणे १९८४.

❖❖❖

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मांडलेला प्रयत्नवाद

प्रा. विलास शालिग्रामजी गांजरे
मातोश्री सुभद्राबाई पाटील महाविद्यालय
मानोरा, जि वाशिम, महाराष्ट्र (India)
Email - vilasganjare@gmail.com भ्रमणध्वनी ९४२३६११०४८

## प्रस्तावना :

आपल्या महाराष्ट्राच्या थोर संत परंपरेच्या समाजसुधारकांच्या क्रियाशील समाजाभिमूखतेचा वारसा जपत अनेक संत महात्म्यांनी येथे समाजसुधारणेचे आणि राष्ट्र निर्मितीचे मौलिक असे योगदान दिले आहे. अखिल मानव जातीचा उद्धार, समाज कल्याण हाच ध्यास महाराष्ट्रातील अनेक संत महात्म्यांनी घेतला होता. समाजातील अंधरलेल्या वाटा तेजोमय करत मानवी जीवन सुखरुप करण्यासाठी येथे पुरोगामी व परिवर्तनवादी विचार रुजविले गेलेत. संतांच्या मांदियाळीतील अलिकडील काळातील अतिशय कल्याणकारी, क्रांतीकारी, प्रेरक विचार देणारे महत्वाचे संत म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे होत. युगप्रवर्तक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हयांचे विचार विश्वव्यापक आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य व त्यांचे अमृततुल्य विचार हे समाजाला मानवजातीला स्फुर्तिदायक व नवचेतना देणार आहे. राष्ट्रसंतांनी आपल्या ग्रामगीतासारख्या दीपस्तंभ ठरणाऱ्या ग्रंथातून आपल्या भजनातून, भाषणातून व अनेक माध्यमांनी त्यांनी राष्ट्रविकास, ग्रामविकास, समाजविकास व व्यक्तिमत्व विकास साधण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी जे विविध विषय मांडले त्यांचा प्रत्येक विचार हा मानवजातीसाठी संजीवनी ठरणारा असाच आहे. राष्ट्रसंतांनी व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र विश्वापर्यंत कल्याणकारी राज्याची परंपरा निर्माण करता येईलत्र हयाचे सुंदर विवेचन ग्रामगीतेत केले आहे. मानवी जीवनामध्ये आपली ध्येये, उद्दिष्टये, स्वप्न पूर्ण करण्यासाठी हवे असणाऱ्या प्रयत्नांचे महत्त्व अनेक साधूसंतांनी विषद केले. त्याचप्रमाणे राष्ट्रसंतांनी समाजाला मानवाला दिलेला प्रयत्नवादाचा विचार हा अनमोल असा आहे.

## विषय विवेचन :

अनेक राष्ट्रसंत महात्म्यांनी प्रयत्नवादाचे मोल मानवाला समजावून सांगत त्यांचे जीवनाचे ध्येय, यश, सौख्य प्राप्त व्हावे हयासाठी प्रयत्न केले आहेत. संत तुकारामांनी तर 'ओले मुळ भेदी, खडकाचे अंग' हया विचारातून प्रयत्न केले तर कुठलीही गोष्ट शक्य असल्याचे मार्मिक असे प्रतिपादन केले आहे. जीवनातील जी गोष्ट आपल्याला हवी आहे, तसे प्रयत्न केले तर यश हमखास मिळतंच हाच प्रयत्नवादी विचार अनेक दृष्टीकोनातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मांडला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामगीतेत प्रयत्नवादाचे विचार व्यक्त करतात –

मित्रा ! ऐसा न धरी भ्रम । सत्यचि आहे कथीले ते वर्म ।
इच्छा – प्रयत्नेची देव कालकर्म । देती फळे ।।

जेव्हा आपल्या मनात काहीतरी करण्याची इच्छा होते त्यानंतर त्यादृष्टीने प्रयत्न केले तर आपल्याला हमखास फळ मिळतेच असे राष्ट्रसंत सांगतात. कर्मवादाचा राष्ट्रसंतांनी पुरस्कार केला असून आपले कर्म महत्वाचे असल्याचे सांगतांना ते म्हणतात, आपले कर्म व प्रयत्न हयातूनच आपण आपला उध्दार करु शकतो. आपण कुठल्या अवस्थेत राहायचे ? काय प्राप्त करायचे ? हे आपल्यावर अवलंबून आहे, म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात –

परंतु मिथ्या हा विचार । जीवास असे कर्म स्वातंत्र्य ।
प्रयत्न करता होतो उध्दार । आपुला शत्रु –मित्र आपणचि ।।

अतिशय प्रेरक असे विचार राष्ट्रसंतांनी मांडून आपणच आपला शत्रू अथवा मित्र ठरु शकतो म्हणून आपला उध्दार करण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची कास धरण्याचे सांगितले आहे. आपणच आपल्या यश —अपयशाला, सुख—दु:खाला जबाबदार असतो हयासाठी

पूर्वी केले उत्तम यत्न । म्हणोनी हाती आले रत्न ।
वाईट वर्तनाचे पुढे पतन । फळा येईल आपैसा ।।

अशा प्रकारे विचार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्त करतात.

मनुष्याने जीवनामध्ये इच्छित प्राप्तीसाठी सतत प्रयत्नरत असावे, आपल्या प्रयत्नांमध्ये कुठेही उणीव राहता कामा नये असे राष्ट्रसंत सांगतात.

आपुले प्रयत्नांची सरस करावे । केले तर करीतची राहावे ।
थोडे उणे होऊ न द्यावे । प्रयत्नामध्ये ।।

आपल्याला आपले ध्येय, मनोरथ पूर्ण करायचे असेल तर उत्तम, सरस प्रयत्नांचीच गरज आहे. आपले प्रयत्न सतत सुरु राहावेत म्हणजे आपल्याला हवे ते ध्येय आशा, आकांक्षा गाठता येईल. आपल्याला आयुष्यात सौख्य, शांती, समाधान हया मौलिक गोष्टी प्राप्त करायच्या असेल तर त्यासाठी प्रयत्नच महत्वाचे आहेत. प्रयत्नाशिवाय हया गोष्टी आपल्याला प्राप्त होणार नाही असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मानसाला जाणीव करुन देतात.

क्षण एक चुको न द्यावे । प्रयत्नासी दुरदृष्टीने जपावे ।
प्रयत्नही सर्वांगीण व्हावे । सर्व सुखे भोगावया ।।

जेव्हा आपण कुठले प्रयत्न करतो ते विधायक, चांगले, नैतिक अशा प्रकारचे असायला हवे, जर आपले प्रयत्न चुकीच्या मार्गाने केले तर त्यामुळे हिताऐवजी अहितच होईल. चांगल्या ऐवजी वाईटच होईल म्हणून सारासार विचार करुन सत्यप्रयत्न केले पाहीजे.

काही प्रयत्न नावलौकींक नेती । काही प्रयत्ने होय फजीती ।
काही प्रयत्न प्राणचि घेती । आपुले आणि परक्यांचे ।।

म्हणून आपले प्रयत्न कोणत्या मार्गाने जात आहेत हयाचा विचार व्हायला हवा असे राष्ट्रसंत म्हणतात. ज्या गोष्टी इथे घडत असतात त्याला प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे आपणच जबाबदार असतो किंवा आपले प्रयत्न त्याला कारणीभूत असतात.

मरणासीही प्रयत्नाची कारण । जन्मण्यासही प्रयत्नचि प्रमाण
भोग—सुख—दु:खांचे निधान । प्रयत्नाचि ।।

असे विचार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विषद करतात. राष्ट्रसंतांची विचारधारा ही फार डोळस आणि मानवतेशी नाते सांगणारी होती. जगाच्या कल्याणासाठीच त्यांनी प्रयत्न प्रभाव मांडला आहे. आज प्रारब्धवाद, दैववाद हया गोष्टींना महत्व दिले जाते. मात्र मनुष्याने हया गोष्टींचा विचार न करता, त्याला फारसे महत्व न देता माणसाने कर्मवाद जपला पाहिजे तरच आपण कर्तबगारीने चमकुन निघु असे अतिशय मोलाचे विचार राष्ट्रसंत सांगतात.

मित्रा म्हणोनं प्रयत्नशील व्हावे । प्रारब्धाचे थोरपण न मानावे
कर्तव्याने चमकुन उठावे । भूमंडळी उत्साहे ।।

आज मनुष्याने हया ज्ञान विज्ञान क्षेत्रात जी प्रचंड प्रगती केली आहे. अनेक नाविण्यपूर्ण शोध लागले आहेत. तसेच मानसाला आश्चर्य वाटावे असे नवीन अविष्कार समोर येत आहे हया संपूर्ण गोष्टी प्रयत्नामुळेच यशस्वी शक्य झाले आहे व होत आहे. म्हणून तुकडोजी महाराज म्हणतात.

पटवावया प्रारब्धवाद । त्यासही लागे प्रयत्न सिध्द ।
विमान दूरध्वनी आदि शोध । लाविले काय प्रारब्धे ?।।

राष्ट्रसंतांनी प्रारब्धवाद, दैववाद, नशीबवाद नकारुन प्रयत्नवाद व कर्मवादालाच महत्व दिले आहे. ज्या काही कल्पनेच्या पलिकडील गोष्टींचा शोध लागला तो प्रयत्नामुळेच म्हणून प्रयत्नाने अशक्य ते शक्य होते असा मंत्र राष्ट्रसंत तुकडोजी महाराज देतात.

प्रयत्न सोडोनी प्रारब्ध धरले । तरि ते प्राणी दोघांतूनि गेले ।
नाही प्रयत्नही पूर्ण केले । प्रारब्ध पळाले दूरदेशी ।।

प्रयत्नवादाशिवाय प्रारब्धवाद निरर्थक आहे. जर कर्म केले, प्रयत्न केले तरच हव्या त्या गोष्टी आपण प्राप्त करु शकतो. नुसते नशीब किंवा प्रारब्धवादाने काही साध्य होणार नाही. हयावर खूप चांगल्या प्रकारे राष्ट्रसंतांनी आपले विचार स्पष्ट केले आहे. पुढे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार व्यक्त करतात.

प्रारब्धवादी शिथील झाला । प्रयत्नवादी चेतना पावला ।
शोध करीत पुढे गेला । दिगंतरी ।।

अतिशय समर्थपणे राष्ट्रसंतांनी आपला प्रयत्नवाद मांडून मनुष्य प्रयत्नवादी व्हायला हवा हयावर राष्ट्रसंतांचे लक्ष होते त्यांना समाजाची काळजी होती. माणसाने प्रयत्नातून ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान व इतर क्षेत्रात जी उंच झेप घेतली हयाची राष्ट्रसंतांनी वेळोवेळी समजाला जाणीव करुन दिली आहे. प्रयत्नातून मानवाने जे दैदिप्यमान यश प्राप्त केले त्याचा उल्लेख करतांना राष्ट्रसंत म्हणतात —

केले मंगळवारी उड्डाण । चढला हिमगिरीशिखरी पूर्ण ।
शोधिले अग्निअस्त्र अणुअस्त्र महान । हैड्रोजनादि ।।

माणूस आपल्या प्रयत्नाने चंद्र मंगळवार पोहचला त्याने उंचच उंच हिमशिखरे सर केलीत, अनुबॉम्ब सारखे क्षेपणास्त्रासारखे अस्त्र बनविली त्यामध्ये मागणसाचा प्रयत्नवादाच दिसून येतो. प्रयत्नवादाशिवाय यश नाही. माणसाने आपले जीवन जगत असतांना आपल्या यशस्वी, निकोप, सुंदर, सुखमय जीवनासाठी प्रयत्नांची धाव कायम ठेवली पाहीजे असे विचार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्त करतात.

## निष्कर्ष :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे समाजाप्रती, राष्ट्राप्रती अति संवेदनशील असल्यामुळे मानवाचे कल्याण हाच दृष्टीकोन त्यांचा होता. राष्ट्रसंतांची विचारधारा ही मानवतेशी नाते जोडणारी होती. समाज परिवर्तन होण्यासाठी वैचारिक परिवर्तन होणे गरजेचे असल्याने राष्ट्रसंतांनी समाजाला नवविचार, प्रेरक विचार दिले. आपली वाणी व लेखणी हयाचा वापर करुन समाज जागृतीचे अथक प्रयत्न केले. मनुष्य समाज, राष्ट्र हयांच्या प्रगतीसाठी त्यांच्या यशस्वी जीवनासाठी प्रयत्नवाद हा अतिशय मोलाचा मंत्र राष्ट्रसंतांनी दिला. मानव जातीला उन्नती करायची असेल, आपल्या ध्येयात यशस्वी व्हायचे असेल तर प्रयत्नवाद अतिशय मोलाचा असल्याचे सुंदर विचार राष्ट्रसंतांनी दिले.

प्रयत्ने मानव होईल उन्नत ! गावचि नव्हे, हालवी दिक्प्रांत । असे परिवर्तनवादी विचार राष्ट्रसंतांनी दिले आहे. राष्ट्रसंतांनी जो प्रयत्नवाद मानव जाती समोर मांडला हा राष्ट्रसंतांचा प्रयत्नवाद मानवकल्याणासाठी, समाजासाठी, राष्ट्रासाठी दिशा दर्शन ठरणारा आहे. हा राष्ट्रसंतांचा प्रयत्नवाद म्हणजे अमृतमय विचारांचा ठेवाच आहे, जो मानवाला जीवनात तारण्यास उपयुक्त ठरेल.

## संदर्भ :

१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज — 'ग्रामगीता'
२) डॉ. भारती खापेकर डॉ. रत्नाकर भेलकर, डॉ. रविंद्र शोभणे — 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे साहित्य' : समकालीन वास्तव, नाथे पब्लिकेशन लिमिटेड, नागपूर.
३) ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक — 'राष्ट्रसंतांची नवचेतना', नाथे पब्लिकेशन, लिमिटेड, नागपूर.
४) 'रिसर्च जर्नल ऑफ इंडिया', वॉल्युम—७, ऑक्टो. २०२०, प्रकाशक — डी.बी.एम.आर.सी., इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ.

❖❖❖

# जागतिककरणाचा ग्रामीण समाजावर पडलेला प्रभाव : एक समाजशास्त्रीय अध्ययन

प्रा. डॉ. सुजाता रामदासजी नाईक
(समाजशास्त्र विभाग प्रमुख)
कला व वणिज्य महाविद्यालय, बोरीअरब,
ता. दारव्हा, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
भ्रमणध्वनी ९४२१७७०३२६

## प्रस्तावना :—

जागतिकीकरण ही व्यापक व जटील प्रक्रिया आहे. जागतिकीकरण म्हणजे स्थानिक वस्तुची किंवा घडामोडीची जागतिक स्तरावर स्थानांतरणाची प्रक्रिया होय. आधुनिक युग हे जागतिकीकरणाच्या प्रभावाचे युग आहे. जलद दळणवळणाच्या सोई व माहिती तंत्रज्ञानाच्या प्रक्रियेमुळे जग अतिशय जवळ येत चालले आहे. भौगोलिक अंतरासोबतच वेळेचेही अंतर कमी होऊन त्यांच्यातील सिमांची बंधनेही शिथील होत आहे. त्यांच्यात परस्परांना प्रभावित कण्याचे देवाण—घेवाणीचे प्रस्थ वाढत आहे. जागतिकीकरणाने जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात कोणतीही वस्तु वा सेवा उत्पादित करणे, त्यांची विक्री करणे सहज शक्य झालेले आहे.

भारतात १९९० च्या सुमारास जागतिकीकरणाला सुरूवात झाली. या काळात देशावर विदेशी कर्ज एवढे होते की, जागतिक बॅंक व आंतरराष्ट्रीय नाणे निधी हया खाजगी संघटनांनी भारतात कर्ज देणे नाकारले होते. कर्ज मिळविण्यासाठी भारतावर काही अटी लादल्या. ह्या अटीमध्ये भारताने आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये काही धोरणात्मक बदल करून ती विदेशी कंपन्यासाठी खुले करणे समाविष्ट होते. अर्थव्यवसेतील ह्या बदलांना आर्थिक सुधारणा असे म्हणतात. उदारीकरणाच्या नव्या धोरणाचा एक पैलु जागतिकीकरण होय.

आर्थिक पायाभुत सुविधांमध्ये वाहतुक, दळणवळण, दूरसंचार, वीज, रेल्वे, हवाई वाहतुक, विमानतळ इत्यादी महत्वाच्या घटकांचा समावेश ग्रामीण विकासात करण्यात येतो. नैसर्गिक साधन सामुग्रीची कमतरता असताना देखील केवळ प्रभावी नियोजन व कार्यक्षमता यांच्या जोरावर जपानसारख्या देशाने उल्लेखनिय प्रगती केली आहे. जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावर अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही स्वरूपाचा परिणाम झाला आहे.

## जागतिकीकरणाची व्याख्या अर्थ :—

जागतिकीकरणाचा अर्थ म्हणजे संपूर्ण जगाची एका मोठ्य बाजारपेठेत रूपांतरीत होण्याची प्रक्रिया होय. जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, राहणीमान, शासन, समाजव्यवस्था व संस्कृती अशा सर्व प्रकारच्या क्षेत्रामधून होत राहणारे रूपांतरण होय''

जागतिकीकरण म्हणजे वस्तु, सेवा आणि आंतरराष्ट्रीय भांडवल प्रभाव, अतिजलद व प्रसरण पावणारे तंत्रज्ञान यांचे वाढते प्रमाण तसेच विविधता यांच्या साह्याने जगातील देशांचे सतत वाढत जाणारे परस्परावलंबित्व होय.

जागतिकीकरणाचा संस्कृतीवर मोठा प्रभाव झाला आहे. देशात २० व्या शतकात अनेक देशात सांस्कृतिक स्फोट झाला आहे. संस्कृती ही एका विशिष्ट देशापुरतीच मर्यादीत न राहता कमी अधिक प्रमाणात तिचे जागतिकीकरण सुरू झाले व त्याचा ग्रामीण समाजावर मोठ्या प्रमाणात बदल घडुन आला आहे.

## प्रस्तुत शोधनिबंधाची उद्‌दिष्टे :—

१) जागतिकीकरणाचा अर्थ समजून घेणे.
२) जागतिकीकरणामुळे ग्रामीण समाज संरचनेवर झालेल्या सकारात्मक व नकारात्मक परिणामांचा अभ्यास करणे.
३) ग्रामीण समुदायाच्या वैशिष्ट्यांचे अध्ययन करणे.
४) जागतिककरणामुळे भारतासमोरील आव्हान कोणती आहे? हे समजून घेणे.
५) जागतिकीकरण टिकविण्यासाठी उपाय सुचविणे.

## अध्ययन पद्धती :—

प्रस्तुत शोध निबंधाकरिता दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर करण्यात आला. संदर्भ ग्रंथ, मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्रातील लेख चर्चासत्रे, विविध अहवाल, पंचायतराजचे रेकॉर्ड, तज्ञांची मते इत्यादी सामुग्रीच्या साह्यने दुय्यम माहिती प्राप्त करण्यात आली.

जागतिकीकरण आणि ग्रामीण समाज

जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावर फार मोठ्या प्रमाणात प्रभाव आहे. त्यामुळे ग्रामीण समाजात आमुलाग्र बदल झाला आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था जागतिकीकरणामुळे विस्कळीत झाली आहे. ग्रामीण लोकांची गरिबी दूर होण्याऐवजी ग्रामीण समाजात दारिद्र्याचे प्रमाण वाढले आहे. ग्रामीण लोकांचे जीवन तणावग्रस्त झाले आहे.

'खेडे' हा भारतीय समाजजीवनाचा गाभा आहे. भारतीय समाज रचनेचा केंद्रबिंदू म्हणजे ग्रामीण समाज होय. त्रि.ना.अत्रे यांनी त्याच्या 'गावगाडा' या ग्रंथात खेड्यांची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ''खेडे म्हणजे जमिन कसणे, खेडूत म्हणजे जमीन कसणारा, तेव्हा खेडूतांची वस्ती ते खेडे होय''.

ग्रामीण कुटुंबाचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. जागतिकीकरणाचा ग्रामीण समाज जीवनावर मोठया प्रमाणात परिणाम झाला आहे. ग्रामीण व्यक्ती पाश्चिमात्त्य संस्कृतीचा स्विकार करित आहे. ग्रामीण समाज शहरी संस्कृतीकडे आकर्षित होत आहे. त्यामुळे कुटुंबातील कौटुंबिक वातावरणात बदल झाले आहे. ग्रामीण जनतेच्या अज्ञानाचा सर्वत्र फायदा घेतला जात आहे. त्यामुळे ग्रामीण जनता दारिद्रय कर्जबाजारीपणा, दहशतवाद, शेतकरी आत्महत्या, गुन्हेगारी या सर्व समस्यांना तोंड देत आहे.

## जागतिकीकरणाचा ग्रामीण समुदायावरील प्रभाव :—

जागतिकीकरण ही आर्थिक तसेच सामाजीक व सांस्कृतीक प्रक्रिया आहे. त्यामुळे त्यांचा ग्रामीण समुदायावर अनुकूल व प्रतिकूल असा प्रभाव पडलेला दिसुन येतो. तो प्रभाव पुढीलप्रमाणे आहे.

१) कृषीक्षेत्रावर पडलेला प्रभाव :—

भारत हा कृषीप्रधान देश आहे. कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतील एकूण लोकसंख्येच्या ७० टक्के लोक ग्रामीण भागात राहतात व त्यांचा मुख्य व्यवसाय शेती आणि शेतीशी निगडीत असलेले व्यववसाय ते करतात. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने बहुराष्ट्रीय कंपन्यांनी स्वतःचे शेतीवर नियंत्रण प्रस्थापित केले आहे. शेतीस आवश्यक बी—बियाणे, खते, किटकनाशके यांचा पुरवठा त्यांच्या हाती आहे. त्यामुळे कोणत्या पिकाचे कसे व कोणत्या दराने उत्पादन करायचे यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्याचे आदेश पाळणे आवश्यक आहे.

भारतीय शेती व्यवसाय धोक्यात येत आहे हा व्यवसाय कायदेशीर करून बहुराष्ट्रीय कंपन्या स्वतःचा फायदा करून घेत आहे. त्यामुळे भारताची अन्नधान्य उत्पादनाची स्वयंपूर्तता नष्ट होत चालली आहे. जैविक विज्ञान व यांत्रिकीकरणाच्या वापरामुळे भारतीय शेती व्यवसायाला कारखानदारीचे स्वरूप आले. त्यातुन बेरोजगारी वाढली, शेती उत्पादनातील स्वावलंबन नष्ट होऊन काही अन्नधान्याची आयात करावी लागते. याच काळात अन्नधान्य उत्पादन वाढीचा वेग घटत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही घडु लागल्या आहे.

पूर्वीच्या तुलनेत आज शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान साधनाचा वापर केला जातो. परंतु खर्च जास्त पिक कमी अशी शेतकऱ्यांची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे कर्जबाजारीपणा, गरीबी, बेरोजगारी वाढीस लागली आहे.

२) ग्रामीण लघु व कुटीर उद्योगावर पडलेला प्रभाव :—

कुटीर उद्योग व लघु उद्योग हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. जागतिकीकरणामुळे आर्थिक विषमता वाढली आहे. कारण जागतिकीकरणामुळे लहान शेतकरी भूमिहिन मजूर, अशिक्षीत व्यक्ती यांच्या तुलनेत मोठे शेतकरी, श्रीमंत व्यापारी यांना अधिक फायदा झालेला आहे. त्यामुळे श्रीमंत लोक श्रीमंत होत अहे तर गरीब लोक गरीब होत आहे. परिणामी मुठभर लोक आरामाचे जीवन जगत आहे. विकसीत देशातील अति उत्पादनामुळे विदेशी उत्पादक मोठया प्रमाणावर भारतीय बाजारपेठेत स्वस्त दरात मालाचा भडीमार करीत आहे. त्यामुळे अनेक उद्योगधंदे बंद पडत आहे. भारतीय औद्योगिक व लघु उद्योग क्षेत्रावर त्याचे घातक परिणाम होत आहे. लघु उद्योग बंद पडल्यामुळे ग्रामीण भागात बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे.

३) कुटुंब संरचनेवरील प्रभाव :—

जागतिकीकरणामुळे कुटुंब संस्थेचे महत्व कमी झाले आहे. संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास होऊन विभक्त कुटुंबपद्धती समाजात निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातील मुलांना शिक्षण देणारी कुटुंबसंस्था ही महत्त्वपूर्ण व आदर्शसंस्था होती. 'एका करीता सर्व व सर्वांकरीता एक' हे कुटुंब संस्थेचे तत्त्व जवळपास संपुष्टात आले आहे.

व्यवसायाच्या निमित्ताने ग्रामीण कुटुंबातील व्यक्ती शहरी भागात स्थायीक होतात. कुटुंबातील वाढत्या गरजामुळे शेतीवर उपजिविका भागविणे कठिण झालेले आहे.

संयुक्त कुटुंबात कर्त्या पुरूशाचे पूर्वीप्रमाणे सर्वोच्च स्थान दिसत नाही. या अभावातूनच कुटुंबात मतभेद, कलह, वादविवाद यासारख्या गोष्टी वाढीस आल्या आहे. पूर्वी कुटुंबाच्या माध्यमातुन व्यक्तीला सामाजिक, राजकीय, आर्थिक, षैक्षणिक, धार्मिक इ. बाबतीत संरक्षण दिले जात असे. परंतु ही सर्व कार्ये आज इतर संस्थांनी वाटून घेतली आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे व्यक्ती केवळ मी, माझी बायको व मुले या दिशेने प्रवास सुरू आहे. आज सुख दु:खात आधार देणारी कुटुंबसंस्था लोप पावत आहे.

४) विवाह रचनेतील बदल :—

जागतिकीकरणामुळे विवाह रचनेत बदल होत आहे. स्त्री—पुरूषांच्या विवाह वयात वाढ झाली तसेच त्यांच्या आवडी—निवडीलाही प्राधान्य देण्यात येत आहे. विधवा पुनर्विवाहासंबंधी ग्रामीण लोकांच्या विचारसरणीत बदल झालेला आहे. हुंडा पध्दतीचे प्रमाण वाढलेले असुन विवाहाच्या खर्चात देखील वाढ झालेली आहे. आज इंटरनेटच्या माध्यमातुन चॅटींगद्वारे विवाह जुळत आहे. आज मुलामुलीचे विवाह जुळवुन देणारे वर—वधु सुचक केंद्र अनेक ठिकाणी दिसुन येतात.

५) सामाजीक व सांस्कृतिक क्षेत्रावर पडलेला प्रभाव :—

जागतिकीकरणामुळे विविध सस्कृती, धर्म, भाषा, आचार विचार, खाद्यपदार्थ यांची मोठया प्रमाणावर देवाण—घेवाण सुरू झाली आहे. आयात निर्याती बरोबर संस्कृतीचाही प्रचार व प्रसार होत आहे. यामुळे जीवनमूल्ये जावून आज नवीन मूल्य येत आहे. पाश्चिमात्त्य संस्कृतीचे अनुकरण करण्याचे प्रमाण वाढले आहे. पोषाख, राहणीमान, नातेसंबंध, भाषा, यात वाढ होत आहे. स्त्री—पुरूष संबंधातील मनमोकळेपणा, मुल्यांचा ऱ्हास, व्यक्तीस्वातंत्र्याचा अतिरेक, कुटुंब संस्थेचे महत्व कमी होणे. नैतिकतेचा ऱ्हास अशा अनेक गोष्टी घडुन येत आहे. अतिरेकी व्यक्तीस्वातंत्र्यामळे वृध्दांच्या समस्या वाढल्या आहे

६) शिक्षण व मनोरंजनाच्या क्षेत्रातील परिवर्तन

शिक्षणाने व्यवसाय उच्च दर्जा संपादीत करता येतो. या सर्वांचे महत्व बदलत्या परिस्थितीत हळूहळू ग्रामीण समाजाच्या लक्षात येत आहे. शाळा, महाविद्यालये यांची संख्या ग्रामीण भागात वाढत आहे. शिक्षणाच्या जोडीला वर्तमानपत्रे, रेडीओ, दूरदर्शन, संगणक इ. साधनांच्या माध्यमातून लोकशिक्षणाचे कार्य केले जात आहे. मनोरंजनाच्या संदर्भात ग्रामीण कुटुंब हेच मनोरंजनाचे केंद्र परंतु आज सिनेमा, नाटक, दूरदर्शन, मोबाईल, संगणक ही मनोरंजनाची साधने ग्रामीण भागातही पोहोचली आहे.

७) नैसर्गिक संपत्तीचा नाश व प्रदुषण :—

केवळ आर्थिक विकासासाठी जागतिकीकरणाची प्रक्रिया राबविली जात असताना प्रचंड प्रमाणात जंगलतोड, वनसंपत्तीचा नाश केला जातो. टाकाऊ मालाच्या विल्हेवाटीची समस्या अधिकाधिक उग्र होत चालली आहे. जंगली संपत्तीचा नाश व प्रदुषणाची समस्या का निर्माण झाली याचे उत्तर म्हणजे २० टक्के लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी ८० टक्के लोकांचे जीवनमान निकृष्ट करणे हे जागतिकीकरण होय.

८) जातीय व्यवसायावर परिणाम :—

जागतिकीकरणाचा ग्रामीण जातीय व्यवसायाच्या संरचनेवर अत्यंत महत्वपूर्ण प्रभाव पडला आहे. जातीवर आधारीत परंपरागत व्यवसाय मोडकळीस आलेले आहे. समाजातील बलुतेदारी पद्धती नष्ट झाली आहे. नवे तंत्रज्ञान, यंत्रसामग्री ही खेडयात पोहचली आहे. त्यामुळे व्यावसायिक गतिशिलता वाढली आहे.

९) आरोग्य क्षेत्रावर झालेले प्रभाव :—

ग्रामीण भागात रूग्णालयाची स्थिती फारच दयनीय होती. जागतिकीकरणाचा मोठा प्रभाव म्हणजे वैद्यकीय क्षेत्रात खुप मोठे बदल घडुन आले आहे. वैद्यकीय अधिकारी झटपट श्रीमंत होण्याच्या हव्यासापोटी ग्रामीण भागामध्ये दवाखाना चालवित नाही तर ते शहरामध्ये मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटलमधून सेवा देतात. बदलत्या वातावरणामुळे ग्रामीण भागात नवनवीन आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले आहे. आज आजाराचेही जागतिकीकरण झाले आहे. औषधाचे उत्पादन जागतिक बनले आहे. कॅन्सर, टि.बी. मलेरिया, एडस् अशा आजारांच्या बाबतीत औषधांची मक्तेदारी ठराविक कंपन्याकडे आहे. अशा मुठभर कंपन्याच्या हाती आता लोकांचे आरोग्य निर्भर आहे.

१०) ग्रामीण महिला प्रतिनिधीला नेतृत्वाची संधी :—

ग्रामीण महिला निवडणुकीत सहभागी होत आहे. ग्रामीण महिलांनी आज हे दाखवून दिले की, पुरूषापेक्षा महिला अधिक चांगले काम करू शकतात. बचत गटांच्या माध्यमातुन ग्रामीण महिलांनी अनेक व्यवसाय उद्योगाची

निर्मिती करून स्वत:चा राष्ट्राचा विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण महिलांना राखीव जागेच्या माध्यमामुळे राजकारणात देखील त्यांना संधी मिळत आहे.

## निष्कर्ष :—

१) आजही ग्रामीण भागातील मुख्य शेतीचा व्यवसाय निसर्गावर अवलंबुन आहे.
२) जागतिकीकरणामुळे शेतीची समस्या वाढली आहे. त्याचबरोबर शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे.
३) जागतिकीकरणामध्ये पाश्चिमात्त्य आधुनिकीकरणाचे प्रमाण वाढले आहे.
४) नैतिक आदर्श मूल्यांचा ऱ्हास होतांना दिसून येत आहे.
५) जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागातील अनेक लघुउद्योग बंद पडले आहे.
६) ग्रामीण भागात दारिद्र्याचे प्रमाण वाढत आहे. त्यासोबत बेरोजगारी संख्या ही वाढत आहे.
७) जागतिकीकरणामुळे आर्थिक विषमता वाढीस लागली आहे.
८) नैसर्गिक साधन संपत्तीचे अस्तित्व धोक्यात आले आहे.
९) जागतिकीकरणामुळे नवीन बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात आल्या त्यामुळे प्रदुषणाचे प्रमाण वाढले आहे.
१०) सामाजिक दृष्टीकोनातुन जागतिकीकरणामुळे व्यवसाय निवडीचे ग्रामीण समाजामध्ये असणारे जातीचे बंधन संपले आहे. हा जागतिकीकरणाचा सकारामक परिणाम होय.
११) जागतिकीकरणाचा कुटुंब संचनेवर अनुकूल व प्रतिकूल परिणाम झाला आहे.
१२) नवीन विचारामुळे जुनी विचारसरणी कालबाहय ठरत आहे.
१३) जागतिकीकरणाच्या काळात ग्रामीण स्त्री ही पुरूषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात काम करीत आहे.
१४) दूरदर्शन, संगणक, मोबाईल, इंटरनेट प्रसारमाध्यमे या सर्व बाबीवर जागतिकीकरणाचा प्रभाव आहे. या वस्तुंच्या तरूण पिढी आहारी गेली असुन नवीन गुन्हेगारी ही समस्या निर्माण झाली आहे.
१५) ग्रामीण भागात विकास जरी वेगाने होत असला तरी गरीबी भ्रष्टाचार राजकीय अस्थिरता यासारख्या अनेक मुलभूत समस्या सोडवल्या गेलेल्या नाहीत.
१६) जागतिकीकरणामुळे भारताच्या ग्रामीण समाजात विविध धर्म व त्याची विचारप्रणाली, संस्कृती, भाषा, आचार विचार यांचे मोठया प्रमाणावर प्रसारण होत आहे.
१७) एकीकडे मानवाने जागतिकीकरणामुळे खुप प्रगती करीत आहे तर दुसरीकडे ग्रामीण समाजात शेतमजूर, कामगार, दुर्बल स्त्रिया, दलित, आदिवासी, सामान्य जनता जागतिकीकरणाच्या दाहकतेमध्ये भरडून निघत आहे. त्यांच्या अनेक समस्या निर्माण होत आहे.

## समारोप :—

जागतिकीकरणाने संपूर्ण समाजाला व्यापले आहे. ग्रामीण समाजरचनेवर अनुकूल व प्रतिकूल परिणाम झाले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मानवी विकासाकडे दुर्लक्ष होत आहे. ग्रामीण संरचनेच्या आर्थिक, सामाजिक, राजकिय विकासात्मक मार्ग अडचणीत सापडला आहे. जागतिकीकरणाला स्विकारत असताना निर्माण होणाऱ्या समस्यांमधुन मार्ग काढणे ही आजच्या काळाची गरज आहे. तेव्हाच खऱ्या अर्थाने ग्रामीण समाज विकासाच्या नव्या प्रवाहात येईल व ग्रामीण समाजाचा विकास होईल.

## संदर्भ ग्रंथ सूची :—

१) खातु गजानन — जागतिकीकरण परिणाम व पर्याय — अमर प्रकाशन, पुणे
२) खैर सी. प. — जागतिकीकरण : समस्या, आशय व अनुभव — दिलीपराज प्रकाशन, पुणे
३) पंडीत नलिनी — जागतिकीकरण आणि भारत.
४) डॉ.कसंबे रावसाहेब — जागतिकीकरण: स्वरूप व भवितव्य — समेध प्रकाशन, पुणे
५) प्रा.लोटे रा.ज. — सामाजिक संरचना आणि समस्या.
६) डॉ.गायकवाड मुकुंद— जागतिकीकरण शाप नव्हे वरदान, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे (२००९)
७) प्रा.डॉ.कराडे — जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड प्रकाशन, पुणे

❖❖❖

# महदंबेच्या धवळयांचे स्वरूप व चिकित्सा

प्रा. डॉ. रमेश पोळ
मराठी विभाग प्रमुख
मराठी पदवी, पदव्युत्तर अध्यापन व संशोधन केंद्र
सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड, महाराष्ट्र, (India)
E-mail:- polramesh1966@gmail.com मो. 9850856330

**बीजशब्द :-**

‘धवळे’ हा एक अतिशय वैशिष्ट्यपूर्ण काव्यप्रकार, महदंबेने मराठी साहित्याला दिलेली एक अमर कलाकृती. धवळे ही महदंबेची पहिली निर्मिती. आत्मचिंतनातून साकार झालेली ही काव्यकृती, मराठीत एकमेव द्वितीय अशीच आहे.

## प्रस्तावना :-

मराठी साहित्याच्या महाद्वारापाशी असणारी आद्य कवयित्री म्हणजे ‘महदंबा’ होय. महानुभव पंथातील चक्रधर शिष्या म्हणून ती सर्वांना सुपरिचित आहे. महदंबेने आपल्या काव्याने स्त्री साहित्याचा प्रारंभ केला. आणि मराठी स्त्री साहित्याची मुहूर्तमेढ रोवली. तिने लिहिलेले काव्याचे श्रेयस व प्रेयस हे श्रीकृष्ण भक्तीचा आविष्कार करते. ज्या काळात मराठी साहित्याची सुरुवात झाली, त्या काळात महदंबेने लिहिलेले काव्य हे मराठी काव्याचा एक उत्कंट आविष्कार आहे. अशा काव्याचे स्वरुप स्पष्ट करणे हे या शोधनिबंधाचे उद्दिष्ट आहे.

## महदंबेचे काव्य:-

आद्य मराठी कवयित्री म्हणून महदंबा सर्वपरिचित आहे. तिच्या ‘धवळे’, ‘मातृकी रुक्मिणीस्वयंवर’, गर्भकांडाच्या ओव्या‘ व स्फुटप्रकरणे’ इ. रचना आहेत. या सर्व रचनांचा मध्यवर्ती विषय ‘श्रीकृष्ण’ व ‘चक्रधर स्वामी’ आहेत. महदंबेची संपूर्ण रचना ही गुरुभक्तिने व श्रीकृष्ण भक्तिने ओतपोत भरलेली आहे.

## धवळे:-

‘धवळे’ हा एक अतिशय वैशिष्ट्यपूर्ण काव्यप्रकार महदंबेने मराठी साहित्याला दिलेली एक अमर कलाकृती. धवळे ही महदंबेची पहिली निर्मिती. आत्मचिंतनातून साकार झालेली ही काव्यकृती, मराठीत एकमेव द्वितीय अशीच आहे.

## धवळयांमागील प्रेरणा:-

महदंबेच्या धवळयाचा उल्लेख सर्वप्रथम आपणाला ‘श्री गोविंदप्रभू’ चरित्र ग्रंथात सापडतो. ‘श्री गोविंदप्रभू चरित्र’ हा महानुभव साहित्यातील अतिशय महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. श्री चक्रधरांच्या मृत्यूनंतर सर्व शिष्यमंडळी ऋद्धीपूरला गोविंदप्रभूंच्याकडे गेली. आणि त्यानंतर महदंबेचा श्री गोविंदप्रभूशी व त्यांच्या चरित्र ग्रंथाशीसंबंध आला. धवळयांच्या जन्मासाठी ‘गोविंदप्रभूच्या’ चरित्रातील महदंबेशी संबंधीत ज्या लीळा आहेत. त्यातील 224 क्रमांकाची लीळा ‘विव्हावो स्वीकारु’ ची लीळा आहे. ती अशी-

"आणि माहादाइसा स्फुर्ति जाली:
इतुकेन रुक्मीणीस्वयंवर गाओचि लागली:
नीरुता लागला जीवी"[1]

यासंदर्भांत एक आख्याईका अशी सांगितली जाते की, गोविंदप्रभूंचे शिष्य एकदा भिक्षेसाठी गेले होते. त्यात महदंबा पण होती. वाटेत महदंबेला बाशिंग नेणारी तेलीन भेटते, महदंबा तिला तशा प्रकारचे दुसरे बाशिंग गोविंदप्रभूसाठी मागते, तेलीन ते करुन देते, बाशिंग पाहूण गोविंदप्रभूना लग्नसोहळा साजरा करण्याची प्रवृत्ती होते. हौशी भक्तजण खरोखरच लग्नसोहळा आरंभितात. महदंबा गोविंदप्रभूच्या डोक्याला बाशिंग बांधिते, तेव्हा गोविंदप्रभू तिला गाणे गाण्यास सांगतात आणि वरिलप्रमाणे महदंबा गाऊ लागते. यातून धवळे पहिल्यांदा महदंबेने गायले. आणि मग धवळ्यांचा जन्म झाला. हिच धवळे निर्मितीमागची प्रेरणा आहे.

यापूर्वीच धवळ्यांच्या आशयाचे बीज तिच्या मनात निर्माण झाले होते. आणि हे बीज चक्रधरांच्या सहवासात कित्येक वर्षे आधी निर्माण झाले होते. यातच धवळ्याची खरी प्रेरणा आहे. यासंदर्भात डॉ. सुहासिनी इर्लेकर सांगतात की, "महदंबेचे धवळे" वाटतात तसे निखळ प्रासंगिक स्वरुपाचे नाहीत. "विव्हावो स्वीकारु" या प्रसंगातून जन्मले असली तरी त्यांच्या संबंधीचा आराखडा महदंबेच्या मनात त्यापूर्वीच तयार झालेला होता. त्या विशिष्ट कथावस्तूविषयीचे तिचे चिंतनही पुरेसे तयार झालेले होते."[2] धवळ्यांचे बीज हे श्रीचक्रधर निरुपती 'श्रीकृष्णचरित्र' यात आहे. यासंदर्भात डॉ. सुहासिनी इर्लेकर यांचा अभिप्राय महत्वपूर्ण आहे. त्या म्हणतात की, "चक्रधरांनीही महदंबेच्या संवेदनाक्षम मनात धवळ्यांची कथाबीजे पेरुन ठेवली. पुढे गोविंदप्रभूंनी 'विव्होवो स्वीकारु' केला, तेव्हा त्यांच्या आग्रहाने महदंबेने 'रुक्मिणीहरण' गाइले आणि धवळ्यांचा जन्म झाला."[3] म्हणजेच धवळे हे मूर्त रुपाने जरी श्रीगोविंदप्रभूंच्या प्रेरणेने जन्मले, तरी त्याचे अमूर्तरुप चक्रधरांच्या सहवासात महदंबेच्या मनात खूप आधीच जन्मले होते. फक्त श्रीगोविंदप्रभूंच्या 'विव्होवी स्वीकारु' च्यारुपाने त्या अमूर्ताला मूर्त शब्दरुप देण्याचे काम झाले. आणि म्हणून धवळ्यांची मूळ प्रेरणा श्रीकृष्णचरित्रात आहे. यातूनच धवळ्यांचा जन्म झाला.

## धवळे शब्दाचा अर्थ:-

मराठीतील पहिले प्रासंगिक काव्य म्हणून धवळे लोकप्रिय आहेत. धवळे या शब्दांची उत्पत्ती अनेक अभ्यासकांनी सांगितली आहे. धवळे म्हणजे लग्नात गावयाचे वरगीत असा सार्वत्रिक स्वरुपाचा अर्थ सांगितला जातो. 'धवळा' हा एकवचन तर 'धवळे' हा अनेकवचनी शब्द आहे. धवल हा शब्द धाव+ल असा तयार झालेला आहे. याचा अर्थ 'लग्नात गावयाचे गीत' असा आहे. यासंबंधी डॉ. गं. बा. ग्रामोपाध्ये लिहितात की, "धवल हा अपभ्रंशकालापासून रुढ असलेला एक गेय वृत्तप्रकार: ज्यात एखाद्या पुरुषाची धवल म्हणजे बैल, म्हणजेच श्रेष्ठ याशी तुलना करुन स्तुती केलेली असते असा."[4] म्हणजेच धवळे हा जरी एक गीत प्रकार असला, तरी तो एक वृत्तप्रकार आहे. श्री. वा. ना. देशपांडे यांनी धवळ्याला मुक्तओवीचा प्रकार संबोधले आहे.

## धवळ्याची प्राचीनता:-

धवळे हा एक गीतप्रकार म्हणून जरी महदंबेने निर्माण केला असला तरी, त्यापूर्वी धवळे हा शब्द अनेकांनी वेगवेगळ्या अर्थांनी वापरला आहे. तो पुढीलप्रमाणे.

1) सोमेश्वराने आपल्या 'अभिलषितचिंतामणी' याग्रंथात 'विवाहे धवलम' किंवा 'विवाहे धवलं' असे शब्द वापरले आहेत.

2) हेमचंद्राने ‘छंदोनुशासन’ याग्रंथात ‘ज्या गीतात सुपुरुषाचे वर्णन केले जाते, त्याला ‘धवलगीत’ म्हणतात. त्याने धवलगीत हे अष्टपाद, षट्पाद किंवा चतुष्पाद असते असे सांगितले आहे.
3) शार्ड्‌र्देवाच्या ‘छंदोनुशासन’ याग्रंथात ही धवळ्याचा उल्लेख आलेला आहे.
4) नरेंद्रच्या ‘रुक्मिणीस्वयंवर’ तो अनेकवेळा वापरला गेला आहे.
5) एकनाथांच्या ‘रुक्मिणीस्वयंवर’ या ग्रंथात ही आलेला आहे. तो असा

“सत्ता वैसली निज बोधे। ढवळे गाती आनंदे”

6) नारायण भट्टाने ‘नैवध’ काव्यावरील आपल्या टीकेतही हा शब्द वापरलेला आहे.
7) गुजराथी- मारवाडी समाजात विवाहप्रसंगी म्हटल्या जाणाऱ्या गीतात हा शब्द आलेला आहे. त्यामध्ये ‘घोळ’ हा शब्द यावरुन आलेला आहे, असे म्हटले जाते.
8) कर्नाटकात हा एक गीतप्रकार म्हणून आलेला आहे. यासंदर्भात डॉ. वसंत जोशी सांगतात की,“शोभाने हाडूगळू’ नावाचा विवाहविषयक पदसंग्रह कानडीत असून ‘शोभाने हाडू’ या गाण्यातील धृवपद ‘शोभान’ हे ‘धवळे’ या अर्थाचेच असावे.”[5]
9) दासोपंतांच्या एका ओवीत याचा उल्लेख खालीलप्रमाणे येतो.

“धवल-मंगल गाणे उदित येणे क्षणे
शिवल येणे शोभणे श्रोतयासी”

10) सोमकोळी जातीत विवाहप्रसंगी धवळे गाण्याची पद्धत असून ही गीते गाणाऱ्या स्त्रीला ‘धवळारी’ असे म्हणतात.
11) प्रा. द. ग. बेंद्रे यांनी धवळ्याचे मूळ द्राविड ‘अक्कर’ या गीतप्रकारात आहे. असे म्हटले आहे.

धवळे हा शब्द प्राचीनकाळापासून वेगवेगळ्या ग्रंथात वापरला गेला आहे. तसेच हा गीतप्रकार असून लग्नासंबंधीच्या गीतांना प्रामुख्याने ‘धवळे’ म्हणतात. असाच अर्थ एकमताने सगळीकडे आलेला आहे. धवळे हे एक प्राचीन प्रासंगिकस्वरुपाचे कथाकाव्य आहे.

## धवळयांचा रचनाकाळ:-

धवळा हा गीतप्रकार असून, धवळ्यांची निर्मिती नक्की कधी झाली हे सांगता येत नाही. धवळ्याचे ‘पूर्वार्ध’ व ‘उत्तरार्ध’ असे दोन भाग असून पूर्वार्धाची निर्मिती आधी झाली, आणि त्यानंतर बरेच वर्षांनी उत्तरार्धाची निर्मिती झाली. म्हणजेच धवळ्याच्या पूर्वार्धाचा व उत्तरार्धाचा रचनाकाळ हा वेगवेगळा आहे.

धवळ्यांचा पूर्वार्ध हा ज्ञानेश्वरीपूर्वी निर्माण झाला, असे म्हटले जाते. यासंदर्भात डॉ. सुहासिनी इर्लेकर म्हणतात की, “धवळ्यांचा पूर्वार्ध श्रीचक्रधर निर्याणानंतर व गोविंदप्रभूंच्या मृत्यूपूर्वी म्हणजे स्थूलपणे शके 1198 ते शके 1208 च्या दरम्यान रचला गेला”[6] तसेच ज. रा. आजगावकर यांनी असे म्हटले आहे की, “महदाइसा हिने आपल्या ‘ढवळ्यांचा’ पूर्वार्ध रचला त्यांचा निधनशक 1208 हा निश्चित असल्यामुळे व तो गणितानें नक्षत्रासुध्दां बिनचूक उतरतो”[7] यापूर्वी धवळ्यांच्या पूर्वार्ध रचनाकाळासंबंधी मतमतांतरे होती. पण आता संशोधांती धवळ्यांच्या पूर्वार्धाचा रचनाकाळ हा शके 1208 हा निश्चित झाला आहे.

धवळ्यांचा उत्तरार्ध हा पूर्वार्धानंतर बऱ्याच कालावधीनंतर लिहिला गेला. उत्तरार्ध हा महदंबेने उतारवयात रचला असून शके 1234 हा उत्तरार्ध रचनेचा कालखंड आहे.

## धवळयांचे स्वरूप:-

आशायाचा व अभिव्यक्तीचा नवेपणा असणारे महदंबेचे धवळे हे अतिशय कलात्मक आहेत. धवळ्यांची ओवीसंख्या ही 148 आहे. धवळ्याच्या पूर्वार्धात 84 तर उत्तरार्धात 64 ओव्या आहेत. पूर्वार्ध व उत्तरार्ध हे वेगवेगळ्या कालखंडात निर्माण झाले असले तरी, त्यात काहीच फरक नाही. यासंदर्भात उषा

देशमुख म्हणतात की, "भाषेचा साधेपणा आणि प्रवाही गतिमानपणा पूर्वार्ध उत्तरार्धात सारखाच असून प्रसंगचित्रण आणि व्यक्तिमनोभाव दर्शन दोन्ही भागांत समांन्तर पद्धतीनेच व्यक्त झाले आहे."[8]

## धवळ्याचे कथानक:-

कथाकाव्य म्हणून धवळ्याचे स्वरुप अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. धवळ्यांचा पूर्वार्ध हा शके 1208 मध्ये रचला असून त्यात 84 ओव्या आहेत. पूर्वार्ध हा स्वयंस्फुर्तीने रचला आहे. यात महदंबेची चिंतनशील वृत्ती दिसून येते. यात 'रुक्मिणीहरणाची कथा' सांगितलेली आहे. ही कथा भागवत, हरिवंशपुराण, ब्रह्मवैवर्तपुराण व श्रीकृष्णचरित्रनिरुपम इत्यादी ग्रंथावर क्रमश: विस्तारली गेली आहे. यातील 84 ओव्या या प्रत्येक चारचरणांच्या आहेत. यामध्ये पहिल्यांदा नमन आलेले आहे. नंतर रुक्मिणीचे वर्णन, द्वारकेहून कौंडण्यपुरात आलेल्या दुताकडून कृष्णाचे वर्णन ऐकणे, गुणवर्णन व रुपवर्णन ऐक्यून श्रीकृष्णाला ब्राह्मणाकरवी पत्र पाठवणे, शिशुपालाशी रुक्मिणीचा ठरलेला विवाह, कृष्णाचे आगमण, तिच्या सख्यांनी कृष्णरुपाचे रुक्मिणीजवळ केलेले वर्णन, गौरी पुजनासाठी रुक्तिणीचे देवळात जाणे, कृष्णाला पाहणे आणि तिचे हरण करणे इत्यादी कथाभाग हा अतिशय सहजपणे व उत्स्फूर्तपणे पूर्वार्धात सांगितलेला आहे. ही एक अस्सल प्रेमकथा आहे. यासंदर्भात डॉ. सुहासिनी इर्लेकर लिहितात की, "हजारों वर्षे श्रीकृष्णचरित्राच्या सावटाने कोमेजणारे रुक्मिणीहरणकथेचे रोपटे महदंबेने अलगद उचलून मराठीत रुजविले येथूनच श्रीकृष्णरुक्मिणी विवाहकथेस एक स्वतंत्र कथाकाव्याचा डौल प्राप्त झाला."[9] अतिशय महत्वपूर्ण अशा या अभिप्रायात, धवळ्यांचे सार सांगितलेले आहे.

धवळ्यांचा उत्तरार्ध शके 1234 मध्ये रचला असून त्यामागे म्हाइंभट व लक्ष्मीधर भटांची प्रेरणा महदंबेला मिळाली आहे. यात 64 ओव्या आहेत. धवळ्यांच्या उत्तरार्ध रचनेचे श्रेय कुणाचे याबद्दल अनेक मतमतांतरे आहेत. यासंदर्भात श्री. वा. ना. देशपांडे लिहितात की, "उत्तरार्धरचनेच्या श्रेयाचा निदान 'अर्धावाटा' म्हाइंभट व लक्ष्मींद्रभट या जोडीला द्यावयास पाहिजे. पण या दोघांनी या आख्यिकेप्रमाणे ज्याअर्थी महदाइसेसाठीच उत्तरार्ध केला, त्याअर्थी तो तिच्याच नावाने ओळखला जाणे वाजवी आहे."[10] याप्रमाणे उत्तरार्ध रचनेचे श्रेय महदंबेकडे जाते.

उत्तरार्धाचे दोन उपभाग असून, पहिल्या भागात कृष्ण-रुखमी संघर्ष आहे. यासंदर्भात एकूण दहा ओव्या रचलेल्या आहेत. दुसऱ्या भागात पंचावन्न ओव्या असून विवाहोत्तर सोहळ्याची वर्णने यात येतात. विवाहाचे वर्णन करण्यात महदंबा जशी स्व:तला विसरुन होते. ते हरपले पण उत्तरार्धात नाही. धवळ्यांतील एकूण कथानक हे सर्वपरिचित व लोकप्रिय असे कथानक आहे. यासंदर्भात डॉ. मा. के. यादव सांगतात की, "महदंबेच्या धवळ्यांत विशेषत: स्त्रियांमध्ये आढळून येणारे भक्तिभाव, भावनोत्कटता, शालीनता, परमेश्वराविषयी आंतरिक तळमळ, रसोत्कटता इ. गुण प्रकर्षाने जाणवतात"[11] महदंबेने रचलेले धवळे हे मराठीतील आद्य कथाकाव्य होय. ज्याप्रमाणे त्यात महदंबेच्या व्यक्तिमत्त्वाची तेजस्वी प्रखरता आहे. तसेच निरंजनाची शुचिता ही आहे. आणि म्हणूनच धवळे कलात्मकतेचा प्रत्यय देतात.

## समारोप:-

महदंबा ही मराठीतील आद्यकवयित्री आहे. महानुभव संप्रदायात तिने केलेले कार्य अतिशय महत्त्वपूर्ण आहे. तिच्या साहित्यनिर्मितीत भक्तिभाव आहे. तिचे धवळे प्राचीन मराठी काव्यात पहिले कथाकाव्य म्हणून महत्वपूर्ण आहे. महदंबेचे चरित्र व काव्य हे चक्रधरमय भक्तिचा एक आदर्श नमूना आहे. महानुभव संप्रदायाची ती 'आऊसा' म्हणजेच आई आहे. आणि यातच तिचे श्रेष्ठत्व समावलेले आहे.

## निष्कर्ष :-

1) महदंबा ही आद्यकवयित्री असून, तत्कालीन काळात तिने केलेला महानुभव संप्रदायाचा स्वीकार, चक्रधरांचे शिष्यत्व, पंथीत कार्य हे सारे नव्या स्त्रीजीवनास प्रेरक आहे.

2) महदंबेचे काव्य तत्कालीन समाजजीवन, स्त्रीजीवन व रुढी परंपरा याचे अतिशय मार्मिक चित्रण करते.

3) तिच्या धवळ्यातून चक्रधरांबद्दलचा भक्तिभाव प्रकट होतो. संपूर्ण नवीन असा काव्यप्रकार मराठीत रुढ करण्याचे संपूर्ण श्रेय महदंबेकडे जाते.

4) धवळ्यातून तत्कालीन काळातील लग्नातील स्त्री लोकगीतांची परंपरा अधिक समृद्ध केली.

## संदर्भ सूची :-

1) महदंबेचे धवळे, सुहासिनी इर्लेकर, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, 1977, पान नंबर 10

2) तत्रैव, पान नंबर 14

3) यादवकालीन मराठी काव्यसमीक्षा, सुहासिनी इर्लेकर, धारा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती नोव्हेंबर 1979, पान नंबर 39

4) संशोधन साधना, डॉ. वसंत स. जोशी, प्रज्ञा पाठशाळा मंडळ, वाई, प्रथमावृत्ती फेब्रुवारी 1976, पान नंबर 127

5) तत्रैव, पान नंबर 128

6)महदंबेचे धवळे, सुहासिनी इर्लेकर, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊ स, पुणे, प्रथमावृत्ती, 1977, पान नंबर 21

7) महाराष्ट्र संत कवयित्री, ज.रा. आजगावकर, भारत गौरव ग्रंथालय मुंबई, प्रथमावृत्ती 21 जुलै 1939, पान नंबर 7

8) मराठी साहित्याचे आदिबंध, डॉ. उषा माधव देशमुख, लोकवाङ;मय गृह मुंबई, प्रथमावृत्ती, 1977, पान नंबर 35

9) महदंबेचे धवळे, सुहासिनी इर्लेकर, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊ स, पुणे, प्रथमावृत्ती, 1977, पान नंबर 35

10) तत्रैव, पान नंबर 21

11) मराठी संत कवयित्री, प्राचार्य मा. के. यादव, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, पान नंबर 29

❖❖❖

# समाज सुधारकांचे शिक्षणविषयक विचार

**प्रा. डॉ. नरेंद्र आप्पासाहेब ठाकरे**
मातोश्री सुभद्राबाई पाटील महाविद्यालय
मानोरा, जि. वाशिम, महाराष्ट्र, (India)
मो. नं. ९४२१७४६७७७

## प्रस्तावना :

प्रत्येक शतकामध्ये समाजाला सुयोग्य वळण लावण्यासाठी समाज जीवनात महत्वपूर्ण बदल घडविण्यासाठी एखादा क्रांतीसूर्य जन्माला येतो, या विधानाची प्रचिती देणारा क्रांतीसूर्य म्हणजे ज्योतीराव फुले. एकोणविसाव्या शतकात महाराष्ट्रातील अग्रस्थानी असणारे समाज सुधारक देह म्हणजे महात्मा ज्योतीराव फुले.

पददलितांच्या उध्दारासाठी, स्त्री शिक्षणासाठी समानता व सत्यासाठी झिजविणाऱ्या महात्मा ज्योतीराव फुले यांचा जन्म सातारा जिल्हयातील कटगुण गावी 20 फेब्रुवारी 1827 रोजी झाला. वडील गोविंदराव गो-हे, फुलमाळयाच्या धंद्यावरुन त्यांचे आडनाव फुले झाले. 1848 साली पुण्यातील भिडे वाडयात मुलींसाठी पहिली शाळा ज्योतीबांनी सुरू केली. आपली पत्नी सावित्रीबाई यांना शिकवुन शिक्षीकेचे काम करण्यास प्रोत्साहन दिले.

ज्योतीबा शाळेतील गरिब मुलांना पाटया, पेन्सीली, पुस्तके, प्रसंगी कपडे पुरवित असत. स्त्री शिक्षणानंतर ज्योतीबांनी अस्पृश्योद्वाराचे. कार्य हाती घेऊन गुलामगिरी ग्रंथ लिहून दलीतांच्या अन्यायास वाचा फोडली. सार्वत्रिक शिक्षणावर भर देऊन ज्योतीबांनी दिनबंधु वृत्तपत्र सुरु केले. 1873 साली त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. आपल्या लिखानामधून, पोवाडयामधुन, व्याख्यानामधून स्त्रीयांच्या, दलीतांच्या, शेतकऱ्याच्या कामगारांच्या अन्यायाला वाचा फोडली. मनुष्य जातीने श्रेष्ठ ठरत नसुन गुणांनी ठरतो, इश्वर सर्वव्यापी असुन सर्व त्याचीच लेकरे आहेत असे त्यांनी सांगीतले. इंग्लंडचा राजपुत्र एकदा पुण्यास आला होता. तेव्हा त्याच्या सभेस ज्योतीबा शेतकऱ्यांच्याच पोशाखात गेले. देशातील गरिबांचे वर्णन करुन आम्हाला चांगले शिक्षण देऊन गरीबी दुर करा असे आपल्या तडफदार भाषणातुन त्यांना सांगीतले. अशा या थोर समाज सेवकाचा महात्मा पदवी देऊन लोकांना गौरव केला.

## ज्योतीराव फुले यांचे शिक्षण विषयक कार्य :

समाजातील अनिष्ट प्रवृत्ती नष्ट करायच्या असतील तर सर्वप्रथम समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे, ही ज्योतीरावांची विचारधारा होती. शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकाच्या उपोद्घातात ते म्हणतात,

**विद्येविना मति गेली, मतिविना निती गेली,**
**नितीविना गती गेली, गती विना वित्त गेले,**
**वित्तविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले**.

स्त्रीया व शुद्रांना शिक्षण मिळाले पाहिजे, तेव्हाच त्यांचे दैन्य नाहीसे होईल असा त्यांना ठाम विश्वास होता. म्हणुनच सदाशिवराव गोवंडे, सदाशिवराव हाटे, परांजपे, मोरोपंत वाळवेकर यासारख्या मित्रमंडळीशी त्यांनी विचारविनीमय केला आणि सन 1848 साली बुधवार पेठेतील भिडेवाडा येथे मुलींची पहिली शाळा सुरु झाली. स्त्रियांना विशेषतः कनिष्ठ वर्गातील स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाही, या हजारो वर्षाच्या रुढीवर ज्योतीरावांनी घणाघाती घाव घातले. स्त्रिने शिक्षण घेणे म्हणजे भ्रष्टाचार ! स्त्रि

शिक्षणामुळे सुखाचे वाटोळे होऊन स्त्रीला अकाली वैधव्य प्राप्त होते. अशा प्रकारच्या अंधश्रध्दांनी बरबटलेल्या समाजाकडून ज्योतीरावांना कडाडून विरोध झाला. पण ज्योतीराव कळवळून सांगत होते,

**आता तरी तुम्ही मागे घेऊ नका | धिक्कारुन टाका मनुमता ।।**

**विद्या शिकताच पावाल ते सुख । घ्यावा माझा लेख ज्योती म्हणे।।**

मुलींच्या या शाळेत शिकविण्याकरिता अध्यापिका पाहिजे, यासाठी त्यांनी आपल्या पत्नीला सावित्रीबाईंना शिकविले. अत्यंत साध्या, -प्रेमळ, सहनशिल व पतिपारायण अशा सावित्रीबाईंनी ज्योतीरावांच्या स्त्रि शिक्षण विषयक कार्यात मनापासुन भाग घेतला. शिक्षीकेला शाळेत जातांना शेणाचे गोळे, दगड मारले गेले. त्यामुळे होणाऱ्या वेदनापेक्षा स्त्री शिक्षणाचे मोल अधिक होते. सावित्रीबाईच्या प्रेरक आधारामुळे आणि मित्रमंडळींच्या खंबीर सहकार्यामुळे 3 जुलै 1851 मध्ये चिपळुनकर वाड्यात त्यांनी शाळा सुरु केली 17 सप्टेंबर 1851 मध्ये रास्ते वाडयात शाळेची स्थापना केली, तर 15 मार्च 1852 मध्ये वेताळ पेठेत शाळा सुरु झाली. विचारांना कृतीत उतरविण्यासाठी लागणारे उदंड धाडस ज्योतीरावामध्ये होते. त्यामुळेच मुलींच्या शाळेबरोबरच पुण्यामध्ये त्यांनी अस्पृश्यासाठी शाळा काढली. समाजाच्या शिक्षण पोहचविण्यासाठी सन 1955 मध्ये रात्र शाळेची स्थापना सर्व स्तरात केली. ज्योतीरावांचे हे क्रांतिकारी कर्मठ समाजाला पैलवणारे नव्हते. त्यांना खिळ घालण्यासाठी काही दृष्ट प्रवृत्तीच्या लोकांनी अघोरी मार्ग निवडला, ज्योतीरावांच्या घरी मारेकरी धाडले, पण सामाजीकता, बंधुतेचा वसा घेतलेल्या ज्योतीबांच्या तेजाने मारेकऱ्यांनी शस्त्रे टाकुन दिली. आणि निर्भयी ज्योतीरांवाना शरण गेले. परंपरेच्या जोखडात अडकलेल्या अंधश्रध्दाळु समाज ज्योतीरावांना विरोध करीत असला तरी इंग्रज सरकारने समाजाला गती देणाऱ्या नवि दिशा देणाऱ्या ज्योतीरावांच्या कार्याचा गौरव केला. 16 नोव्हेंबर 1852 मध्ये मेजर कॅन्डी यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण कार्याबद्दल सरकारी विद्या खात्याकडून त्यांचा सत्कार करण्यात आला.

## समाजधुरंधर ज्योतीराव फुले :

समाजाच्या प्रगतीसाठी स्त्रिया व शूद्रांना शिक्षण देण्याबरोबरच इतर अनिष्ट सामाजिक प्रथांचे निर्मुलन आवश्यक आहे हे जाणून त्यादृष्टीने ज्योतीरावांचे कार्य सुरु झाले.

## विधवा विवाह :

राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नांनी सन 1821 मध्ये सतीची चाल कायद्याने बंद झाली. स्त्रीचे जीवंतपणी चितेवर जाणे यामुळे थांबले, तरी विधवेच्या जीवनात नेहमीच अत्याचाराची विटंबनेची चिता रचली जायची. त्यात बिचारी होरपळून जायची, विधवेची विटंबना थांबावी म्हणून त्यांनी विधवा विवाहाला चालना दिली. 8 मार्च 1860 रोजी त्यांनी पहिला विधवा विवाह पुण्यात घडवून आणला. शेणवी समाजातील एका विधवा स्त्रिचा विवाह या समाजातील विधुराशी लावून दिला. स्त्री जीवनात क्रांती घडविणाऱ्या या घटनेमुळे त्यांच्यावर टिकेची झोड उठली. पण ते अविचलत राहिले, विधवांना अत्याचारांच्या मालिकेतून मुक्त करुन सुरक्षित जीवनाचा मार्ग त्यांनी प्राप्त करून दिला.

## केशवपन निषेध :

विधवा स्त्रिच्या डोक्यावरील सर्व केस काढून तिला विद्रुप करणाऱ्या निर्घुण रूढी विरुद्ध त्यांनी प्रचार केला न्हावी समाजामध्ये जागृती केली. याची परिणिती म्हणजे एप्रिल 1890 मध्ये मुंबईत न्हावी समाजाची सभा झाली. त्यात सुमारे पाचशे न्हावी समाजाची सभा झाली. त्यात सुमारे पाचशे न्हावी व्यावसायिकांनी केशवपनांचे काम करणार नाही, असे ठणकावून सांगीतले. ज्योतीरावांनी सांगीतलेल्या समाज परिवर्तनाचाच हा एक भाग आहे.

## बालहत्या प्रतिबंध :

काही वेळा विधवांना अत्याचार सोशीत मातृत्वाला सामोरे जावे लागे. कलंकिता हा बोल लागू नये म्हणून भ्रूणहत्येचे प्रकार घडत असतात. मूल जन्माला आले तर अनौरस संतती म्हणून हिणवले जात असते. हि दुरावस्था टाळण्यासाठी ज्योतीरावांनी सावित्रीबाईच्या मदतीने आपल्या घरातच बालहत्या प्रतीबंधक गृह स्थापन केले. विधवांची प्रसूती आणि निराधार बालकांसाठी अनाथाश्रम असे त्यांचे स्वरूप होते.

## अनौरस संततीला मान्यता :

विधवेच्या मुलाला अनौरस संतती म्हणून त्यांची समाजात अवहेलना केली जात असते. अशा संततीला निर्भय, निकोप वातावरण मिळावे म्हणून त्यांनी प्रयत्न केले. या प्रयत्नांना कृतीची जोड दिली. त्यांनी व सावित्रीबाईंनी अनाथ बालकाश्रमातील यशवंत ला दत्तक घेतले. याला माया ममत्व, सुसंस्कार आणि शिक्षणाचा लाभ झाला. हाच त्यांचा पुत्र पुढे डॉक्टर झाला.

## द्विभार्याप्रतिबंध :

पुरुषाने एकापेक्षा अनेक लग्न केल्याने स्त्रीला दुःसह स्थितीला सामारे जावे लागे. अशा परिस्थितीत त्यांनी द्विभार्याप्रतिबंधक चळवळ सुरु केली.

## अस्पृश्यांसाठी पाणवठा खुला :

आधी केले. मग सांगितले ही वृत्ती असल्याने ज्योतीरावांनी सन 1868 मध्ये आपल्या घरचा हौदा अस्पृश्यांना पाणी पिण्यासाठी खुला केला. त्याकाळी पाणी या मुलभूत गरजेसाठीही भेदभावामुळे समाजातल्या कनिष्ठ वर्गाला विलक्षण त्रासाला सामोरे जावे लागत होते.

## कर्मकांडाऐवजी समाजोपयोगी उपक्रम :

मृत्युनंतर वडीलांच्या बाराव्याच्या वेळी कुठल्याही कर्मकांडात न अडकता ज्योतीराव व त्यांचा भाऊ राजाराम यांनी वडीलांच्या स्मरणार्थ आंधळयापांगळ्यांना जेवण घातले. गरीब मुलांना पाटी-पेन्सीली दिल्या. वडीलांच्या स्मृतीसाठी हा पायंडा त्यांनी सुमारे दिडशे वर्षांपूर्वी घातला. समाजापुढे आदर्श ठेवला.

## शेतकरी, कामकरी यांचे ज्योतीराव :

शेतकरी आणि कामकरी यांच्या दुःखाचे आणि दारिद्र्याचे निवारण करण्यासाठी चळवळ उभारणारे पहिले पुढारी अशा शब्दात धनंजय किर यांनी ज्योतीरांवाचा गौरव केला आहे. शेतकऱ्यांचा आसुड या पुस्तकात त्यांनी शेतकऱ्यांच्या अवनत स्थितीचे चित्र रेखाटून त्यावर उपाय योजनाही सुचविली आहे. दुष्काळ विषयक विनंती पत्रक काढून त्यांनी मदतीचे आवाहन केले. त्यातुन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांविषयी असणारी आस्था अंतःकरणाला भिडते.

## सत्यशोधक समाजाची स्थापना :

उच्चनीच भाव, स्त्रीदास्य, मूर्तीपुजा, कर्मकांड इ. गोष्टींचे उच्चाटन करून समताप्रधान समाज निर्माण करण्यासाठी व अंधश्रद्धेचे निर्मुलन करुन वैचारिक कांती करण्यासाठी त्यांनी सन 1873 मध्ये 'सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

## महात्मा ज्योतीरांवाचे वाङ्मय :

आपल्या शैक्षणिक, सामाजिक विचारांच्या प्रसारासाठी तसेच आपल्या कार्याला बळकटी यावी, विचार सर्वदूर पसरावेत या हेतूने ज्योतीरावानी गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसुड इ. पुस्तके तृतीय रत्न हे नाटक, पोवाडे, अखंडादी काव्यरचना केली.

## अखंडादी काव्यरचना व त्यातील मूल्यविचार :

ज्योतीराव आपल्या अभंगाना अखंड असे संबोधतात. त्यांची बरीचशी स्फुट रचना अभंग वृत्तात आहे. मात्र मानवता, सद्विवेक, सदाचार, समता यातून सार्वजनिक सत्य सांगणारा आपला वेगळा आशय स्पष्ट व्हावा, म्हणून वेगळीक सुचविणारे अखंड असे अभिधान त्यांनी योजिलेले दिसते. अखंडमधून काही मुल्ये व्यक्त होतात. उदा.

*मानवाचा धर्म एकच, धर्मराज्य भेद मानवा नसावे।। सत्याने वर्तावे ।। ईशासाठी ।।

*स्त्री पुरुष समानता :- स्त्री पुरुषांसाठी शाळा त्या घालाव्या । विद्या शिकवाव्या ।। भेद नाही ।।

*श्रमप्रतिष्ठा जगाच्या कल्याणा देह कष्टवावा । कारणी लावावा । सत्यासाठी ।।

*सौजन्यशीलता - परा । लाभ होता संतोष मानीतो । साहय देतो घेतो । सदगुणांचे।।

*सद्विवेक - दृढ मनी धरी सद्विवेकास ।। तेच संतानास ।। सुख देई ।।

एकंदरीत, महाराष्ट्रातील समाज सुधारकांचे अग्रणी असणाऱ्या महात्मा ज्योतीराव फुले यांचे विचार, त्यांचे आजही दिशादर्शक असे आहे.

**सत्य धर्माचीया वाट । जोती दाविली धोपट ।।**
**अवघे विष्व आपुले घर । सत्य हाची परमेश्वर ।।**
**सत्याची धरा कास । ज्योतीबाची आण तुम्हास ।।**
**सोडा तुम्ही वर्ण धर्म । जातीभेद हे पापकर्म ।।**
**शिकवा विद्या लहानथोर । नाश पावेल घोर अंधार ।।**

## सारांश :

महाराष्ट्र ही केवळ मर्दाची व संताचीच भूमी नसुन ती विचारवंत व समाज सुधारकांचीही भूमी आहे. अशा या महाराष्ट्रात पेशवाईच्या अस्तानंतर जे थोर विचारवंत होऊन गेलेत त्यांच्यात महात्मा ज्योतीराव फुले यांचे स्थान निःसंशय श्रेष्ठ आहे. महाराष्ट्रात इंग्रजी राजवट स्थिरावल्यानंतरही आधुनिक शिक्षणाची दारे केवळ वरीष्ठ समाजाच्या वस्तीतच उघडत होती. बहुजन समाजाच्या वस्तीत मात्र अजुनही अज्ञानाच्या काळोखाचा राबता होता. परिणामी भारतीय स्त्रि आणि अस्पृश्यादी बहुजन समाज अज्ञान व अंधश्रध्दांच्या डोहात अजुनही गटांगळया खात होता. शतकानुशतकापासून चालत आलेली बहुजन समाजाची ही दैन्यावस्था वरवरच्या मलमपट्टीने संपणार नव्हती. हजारो वर्षाचा हा रोग थातुरमातुर उपायांनी बरा होणे शक्य नव्हते. त्यासाठी आवश्यकता होती तो रोग समुळ नष्ट करणाऱ्या प्रभावी उपचारांची. महात्मा ज्योतीबा फुलेंच्या रुपाने महाराष्ट्रात एक असा निष्णात धन्वंतरी निपजला की त्याने या रोगाच्या मुळावरचा घाव घातला.

महात्मा ज्योतीबा फुले यांनी 24 सप्टेंबर 1873 रोजी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाच्या कार्यकत्यांनी बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार केला. शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती उपलब्ध करुन दिली. अशा प्रकारे समाजामध्ये शिक्षण विषयक विचार रुजविण्याचे कार्य महात्मा ज्योतीबा फुले यांनी केले.

## संदर्भ सूची :

अनसुया कुंभार, त्रिवार वंदन तुम्हा, लातुर : विद्याभारती प्रकाशन.
डॉ. अशोक नाईकवाडे, युगप्रवर्तक महात्मा फुले, गौरव ग्रंथ.
मदन मार्डीकर, इतिहास, मुंबई : हिमालया पब्लिशिंग हाऊस.
उत्तमराव पाटील, ज्योतीपर्व, पृ. 19.

❖❖❖

# महात्मा गांधीच्या दृष्टिकोनातील ग्रामस्वराज्य संकल्पना

प्रा. डॉ. अविनाश मेश्राम
कला महाविद्यालय, बुलडाणा, महाराष्ट्र (India)
भ्रमणध्वनी – ९९२३२१९३९४

## प्रस्तावना :–

भारत हा खेड्यांनी बनलेला देश आहे. मूठभर शहराचा विकास म्हणजे देशाचा विकास नव्हे, तर खेडयांच्या विकासावरच देशाचा विकास अवलंबून आहे, असे गांधीजी मानत असत. म्हणून त्यांनी 'खेडयाकडे चला' हा संदेश देऊन सर्वांचे लक्ष खेडयाकडे वळविले.

गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना ही मुक्त, निरंकुश किंवा स्वच्छंदेतवर आधारीत नाही तर 'स्वराज्य म्हणजे स्वत:वर प्राप्त केले राज्य. ज्यात कुणी भुकेला राहणार नाही. ज्यात घोर अंधारातही स्त्रियांना निर्भयतेने वावरता येईल. जिथे स्पृश्यास्पृश्यता, उचनिचता नसेल. स्वराज्याची पुंजी म्हणजे सत्याग्रह, आत्मबल, दयाबल असेल अशी होती. ग्राम स्वराज्यात धनवान आणि श्रमिकांमध्ये मित्रता असेल. मजुरांना योग्य मजुरी दिली जाईल. गांधीजींची शासन प्रणालीच्या बाबतीत आपली स्वत: स्वतंत्र व आपल्या प्रकृतीला अनुरूप शासनप्रणाली असावी अशी धारणा होती. ही शासनप्रणाली जनतेच्या आशा–आकांक्षांना अनुरूप असावी. यालाच गांधीजी रामराज्य म्हणत असत.

महात्मा गांधी हे २० व्या शतकातील एक अलौकिक आणि असामान्य व्यक्तिमत्व समजले जाते. स्वातंत्र्यपूर्व काळातील भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विचार सरणीवर त्यांच्या विचाराचा खोल ठसा उमटलेला आहे. त्यांनी आयुष्यभर सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह या त्रिसुत्री नुसारच कार्य केलेले दिसते. स्वातंत्र्यपूर्व काळातच नाही तर आज देखील महात्मा गांधीचे विचार आपल्याला प्रभावित करतात इतकेच नव्हे तर त्यांच्या विचारांनी संपूर्ण जगच प्रभावित झालेले दिसून येते. म्हणूनच संयुक्त राष्ट्र संघाने महात्मा गांधीचा जन्मदिन 'अहिंसा दिन' म्हणून साजरा करण्याचे ठरविले आहे.

## जीवन परिचय :–

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा जन्म २ ऑक्टोंबर १८६९ रोजी गुजरात राज्यातील पोरबंदर येथे झाला. त्यांच्या कुटूंबातील वातावरण अतिशय धार्मिक होते. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षण घेण्यासाठी ते इंग्लंडला गेले व तेथे त्यांनी कायद्याचा अभ्यास केला. भारतात परतल्यावर त्यांनी काही काळ वकिली देखील केली. एका खटल्याच्या निमित्ताने दक्षिण आफ्रिकेला गेले असता तेथील भारतीयांवर होत असलेला अत्याचार त्यांनी पाहिला व तेथील सरकार विरोधात आंदोलन उभारले. इ.स. १९२० पासून भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात त्यांनी सक्रीय सहभाग घेतला. त्यांच्या नेतृत्वाखाली असहकार आंदोलन, दांडीयात्रा, सविनय कायदेभंग, चले जाव चळवळ इ. आंदोलने अहिंसात्मक पध्दतीने झाली. म. गांधीनी सत्य, अहिंसा, असहकार, सत्याग्रह इ. साधनाचा वापर भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात केला. राजकीय स्वातंत्र्याबरोबरच भारताच्या सर्वांगीण विकासाकडेही त्यांचे लक्ष होते. त्या संदर्भात त्यांनी विविध व्यासपीठावरून त्यांनी विचार देखील मांडले तसेच म. गांधीनी विविध विषयांवर वेगवेगळे विचार मांडले. त्यातीलच एक म्हणजे ग्रामीण विकास होय व शेवटी ३० जानेवारी १९४८ रोजी त्यांची हत्या करण्यात आली.

## ग्रामस्वराज्य संकल्पना :–

भारताला लोकतांत्रिक व्यवस्थेची समृध्द परंपरा आहे. १८३० मध्ये ब्रिटीश गव्हर्नर सर चार्ल्स मेटकॉफ यांनी भारतीय ग्रामाचे वर्णन करताना म्हटले की, ''ये ग्रामस्वराज्य छोटेछोटे प्रजातंत्र है. जिन्हे अपनी आवश्यकता की लगभग हर वस्तू अपने भीतरही मिल जाती है और जो विदेशी सम्बन्धोसे लगभग स्वतंत्र होते है। वे ऐसी परिस्थितीयो मे भी टिके रहते है जिनमे दुसरी हरेंक वस्तू का अस्तित्व मिट जाता है।''

स्वराज्याच्या निर्मितीसाठी गावाची सेवा फार महत्त्वाची आहे. शहरातील भारत ही पाश्चात्यांच्या प्रभावातून बनली आहेत. त्यांनी खेडयांचे संघटीतपणे शोषण चालविले आहे. ती एक प्रकारची हिंसाच आहे. जर स्वराज्याची

रचना अहिंसेच्या आधारावर करायची असेल तर खेडयाला उचित स्थान प्राप्त करून दिल्याशिवाय पर्याय नाही. त्यासाठी शहराकडून होणारे खेडयांचे शोषण थांबले पाहिजे. यावर गांधीजींचा भर होता.

## ग्रामीण स्वराज्याचे स्वरूप :—

गांधीजींनी स्वयंपूर्ण आत्मनिर्भर ग्रामस्वराज्याचे स्वप्न पाहिले. गावातील लोकांनी आपल्याला लागेल इतके धान्य निर्माण करावे. कपडे बनविण्यासाठी कापूस तयार केला जाईल. गावात पशुधनाकरिता अतिरिक्त जमीन असावी. मुलांना व मोठया माणसांना मनोरंजनासाठीची साधने असावी. खेळाचे मैदान, नाटकशाळा, सभामंडप, पाणी, तलाव असावेत. ग्रामस्वराज्यात जात—पात, उचनीच हा भेदच राहणार नाही. अहिंसात्मक सत्ता हेच ग्रामस्वराज्याचे बल असेल.

गावाच्या रक्षणासाठी ग्रामसैनिकांचे असे एक दल असावे की ज्यांनी आवश्यकतेनुरूप गावाला पहारा देण्याचे काम करावे. गावाचे शासन चालविण्यासाठी पाच योग्यता प्राप्त स्त्री—पुरूष निवडून द्यावेत. ज्यांना गावाचे शासन चालविण्याचा अधिकार असेल. त्यांच्या कार्यात शासनाचा जास्त हस्तक्षेप असणार नाही. या ग्रामपंचायतींचा आधार सामान्य नागरिक असेल. गांधीजींच्या या ग्रामस्वराज्याचा विचार राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनाही मांडला आहे. गांधीजींच्या ग्रामस्वराज्याचा विचार सत्तेच्या विकेंद्रीकरणावर आधारलेला आहे. भारतात खऱ्या अर्थाने लोकतंत्र निर्माण व्हायला पाहिजे, असे लोकतंत्र की जे केंद्रात बसलेल्या वीस लोकांनी न चालविता गावातील प्रत्येक माणसाने चालवावे. श्री. माणक जैन गांधींना अपेक्षित ग्रामस्वराज्याबद्दल म्हणतात, ''गांधीजी को ऐसा ग्रामस्वराज्य अपेक्षित था जिस ग्रामस्वराज्य में गाव सम्पूर्ण सत्ता भोगनेवाला एक विकेंद्रीत राजनीतिक घटक होगा। इसलिए प्रत्येक व्यक्तीका सरकार अथवा शासन मे प्रत्यक्ष हाथ होगा। व्यक्ती अपनी सरकार का निर्माता होता।''

संपूर्ण गावाला स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर बनविण्याचे जे स्वप्न गांधीजींनी पाहिले ते पुढच्या काळात येणाऱ्या जागतिकीकरण व वैश्विकीकरणात ग्रामीण भागाला येणाऱ्या अवकळेच्या आधारावर अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. खेडयामध्ये गांधीजींनी ग्रामोद्योगाला चालना दिली. खेडयातील तरूणाला रोजगारासाठी वणवण भटकावे लागणार नाही. आपल्याच गावात राहून तो छोटामोठा उद्योग व्यवसाय करू शकेल. खेडयाला कोणत्याही गोष्टीसाठी शहराकडे पाहण्याची गरज उरणार नाही. याउलट शहरातील नागरिकांना अन्नधान्यासाठी खेडयाकडे जावे लागेल. तेव्हा शेतकरी आपल्या धान्याचा भाव स्वत: सांगू शकेल. हा विचार गांधीजी नंतर प्रत्यक्षात उतरू न शकल्यामुळे जागतिकीकरणाच्या काळात खेडयाची अतिशय दुरावस्था झालेली आहे. लहानसहान गोष्टींकरता खेडयांना शहराकडे बघावे लागते. त्यामुळे आज खेडयांना दीनवाणी अवस्था प्राप्त झाली आहे. गांधीजींच्या विचारात ग्रामविकासाची संजीवनी होती.पण पुढे आलेल्या जागतिकीकरण व वैश्विकीकरणाच्या रेटयात हा विचार खेडयांना पचविता आला नाही. भांडवलदारी व्यवस्थेने गांधीजींच्या विचारांना खेडयात रूजू न दिल्यामुळे खेडयांना केविलवाणेपणाने आज शहराच्या झगमगाटाकडे पाहण्याची वेळ आली आहे.

महात्मा गांधीजीची ग्रामीण विकासाची संकल्पना त्यांच्या १९०९ साली प्रसिध्द झालेल्या 'हिंद स्वराज्य' या छोटयाशा पुस्तकातून स्पष्ट झालेली दिसते. दलितोध्दार व ग्रामोध्दार विषयी त्यांनी सूक्ष्म चिंतन केले आहे. या चिंतनातून त्यांचा समाजाच्या पुनर्रचनेविषयीचा दृष्ट्रीकोन स्पष्ट झालेला दिसतो. ग्रामीण विकाससंबंधीचे त्यांचे विचार हे अनुभवनिष्ठ असल्यामुळे ते मूलगामी आहेत तसेच ते आजही मार्गदर्शक ठरतात. म. गांधीजीचे असे मत होते की, भारताचा खरा आत्मा खेडयात आहे. त्यामुळे खेडयांच्या विकासाशिवाय भारताचा विकास शक्य नाही. त्यामुळे त्यांनी खेडयांच्या विकासाची योजना तयार केलेली दिसते. त्या योजनेत त्यांनी ग्रामीण भागातील गरीब लोकांना केंद्रीभूत मानून त्यांच्या उत्कर्षासाठी आपली विकासाची योजना मांडली आहे.

## महात्मा गांधीचा ग्रामीण विकासाचा उद्देश :—

म. गांधीच्या 'ग्रामीण विकास' संदर्भातील जो उद्देश आहे तो पुढीलप्रमाणे, त्यामध्ये आर्थिक व सामाजिक संरचना पुन:निर्माण करणे, समाज सुधारणा करणे त्यासाठी लोकांना शिक्षण देणे, आर्थिक विकास करून लोकांचे जिवनमान उंचावणे, कृषी व औद्योगिक प्रगती करणे, सहकारी तत्वाची अंमलबजावणी, मजुरांची उन्नती करून त्यांच्या समस्या सोडविणे, दळणवळणाच्या साधनाची वाढ, आरोग्य स्तर सुधारणे, अनाथ, अपंग, बेकार पीडीत यांना सामाजिक सुरक्षा देणे, रोगाची साथ, पूर, दुष्काळ, भूकंप इ. संकटाच्या वेळी लोकांना सहाय्य करणे, वंश जाती, भाषा, रंग इ. चे वाद नाहीसे करणे, लोक शासन निर्माण करून शासनाचे विकेंद्रीकरण करणे, लोकांना सुखी, समाधानी व आत्मनिर्भर बनविणे इ. वरील प्रमाणे म. गांधीजींच्या ग्रामीण विकासाचा उद्देश स्पष्ट होतो.

## महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास :—

महात्मा गांधीजीना खेडयाचा विकास अपेक्षित होता. गांधीजींच्या मते खरा भारत खेडयात वसलेला आहे. गांधीजींना खेडयाची संकल्पना समाज व व्यक्तिंच्या संबंधातून विकास साधावयाची होती. सत्तेचे विकेंद्रीकरण ही त्या मागची भूमिका स्थानिक समस्या, प्रश्न, स्थानिक लोक जेवढया चांगल्या पध्दतीने सोडवू शकतात त्या समस्या ते प्रश्न देशपातळीवरच्या नेत्याला गांभीर्याने माहिती ही नसतात. ग्रामातील प्रश्नांची सोडवणूक होऊन ग्रामाचा विकास साधने म्हणजे गांधीजींच्या भाषेत अंत्योदय होय. विकासाचा टप्पा समाजातील अंतिम शेवटच्या माणसापर्यंत पोहचणे आवश्यक आहे. गांधीजींची ग्राम विकासाची कल्पना ही त्यांनी मांडलेल्या विविध विचारांपैकी अत्यंत मौलिक स्वरूपाची आहे. ग्रामीण विकास म्हणजे सर्वांची उन्नती, सर्वांचे कल्याण साधने हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट आहे. ग्रामीण विकासात बहुसंख्याकांचे कल्याण हे अभिप्रेत नाही तर सर्वांचे कल्याण अभिप्रेत आहे. समाजाचे स्पष्टीकरण होणे म्हणजे समाजात वेगवेगळे वर्ग उत्पन्न होणे हे स्वाभाविक असते.

## सारांश :—

ग्रामीण विकास आणि विकास या दोन शब्दाचे संयुक्तिक रूप सर्वांगीण विकास असे आहे. ज्याचा आशय खेडयाच्या समग्र विकासाशी निगडीत आहे. ग्रामीण विकासही ग्रामीण भागात मानवीय आणि भौतीक संसाधानाचा अधिकतम वापर करून गावाचा सर्वांगीण विकास करणारी व्यूहरचना आहे. विनोबा भावेनी असे स्पष्ट म्हटले आहे की, गावातील धन ५ मार्गाने शहराकडे जाते त्यामध्ये बाजार, विवाह, सावकार, शासन आणि व्यसन ही पाच मार्ग होत. यांना रोखले तरच गावातील धन गावातच राहते. ग्रामीण भागाच्या विकासाशिवाय भारताचा विकास शक्य नाही. त्यामुळेच शासनाने स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागाच्या विकासासाठी विविध योजना सुरू केलेल्या आहेत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी ग्रामीण क्षेत्र विकास व रोजगार मंत्रालयाची स्थापना करण्यात आलेली आहे. पुढे १ एप्रिल १९९९ रोजी त्याला ग्रामीण विकास मंत्रालय असे नामनिदान करण्यात आले. म. गांधीजींनी जे अनुभवनिष्ठ विचार मांडले. त्यांची प्रासंगीकता त्या निमित्ताने आजही लक्षात येते. त्यांच्या स्वप्नातील रामराज्य निर्मितीचा भारताचा प्रयत्न आहे. त्यांच्या विचारांना अनुभवाचा आधार असल्यामुळे त्यांचे विचार आजही आपणास मार्गदर्शन ठरतात.

## निष्कर्ष :—

१. महात्मा गांधींचा ग्रामस्वराज्यात राज्यविहीन अहिंसक समाज निर्मितीचा व्यापक विचार समाविष्ट आहे.
२. ग्रामीण स्वराज्यात सत्तेच्या विकेंद्रीकरणाला महत्त्वाचे स्थान आहे.
३. जागतिकीकरण व वैश्विकीकरणाच्या रेटयात खेडयांना गांधीवादी विचार पचविता आला नाही.
४. महात्मा गांधीजी ग्रामस्वराज्यविषयक विचार खेडयाला नवसंजीवनी देणारे आहेत.

## संदर्भग्रंथ :—


१. माझ्या स्वप्नातील भारत — मो. क. गांधी, परमधान प्रकाशन, पवनार
२. म. गांधी विचार दर्शन — प्रा. नागोराव कुंभार
३. विकास आणि पंचायतराज — U.N.D.P. आणि ग्रामीण विकास मंत्रालय, नई दिल्ली पुरस्कृत
४. लोकमान्य ते महात्मा, खंड दुसरा — मोरे सदानंद
५. म. गांधी संकलित वाङ्मय — भावे शि. गो. संचालक प्रसिध्दी विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, खंड — १४
६. गांधी के विचारोंकी २१ वी सदी में प्रासंगिकता, प्रथमावृत्ती, मे २०१०


❖❖❖

# डॉ. विजया राजाध्यक्ष यांच्या कथेतील स्त्री व्यक्तिरेखा

डॉ. अन्नपूर्णा अजाबराव चौधरी
(मराठी विभाग प्रमुख)
श्री. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा, महाराष्ट्र (India)

## प्रस्तावना :—

साहित्यात समाज जीवनाचे प्रतिबिंब उमटलेले असते. साहित्य हे जीवनाकरीता असते. साहित्य हे जीवनातूनच निर्माण होत असते. म्हणून व्यक्तिचित्रणाला साहित्यात महत्व असते. ज्यांच्या द्वारे कथा पुढे जाते त्या पात्रांचे कथेतील स्थान महत्वाचे असते. डॉ. विजया राजाध्यक्ष यांनी मानवी मनाचा तळ गाठणाऱ्या अनेक कथा लिहिलेल्या आहे. मुख्यपात्रे व सहपात्रांची भूमिका त्यांच्या कथेत महत्वाची ठरते. अनेक कथा मानवी मनाचा ठाव घेतात. पात्रांच्या मनोविश्लेषणातून कथा पुढे जाते. त्यामुळे पात्रांच्या व्यक्तीमत्वाचे अनेक पैलू त्यांच्या कथेतून स्पष्ट होत जाते. म्हणूनच कथेतील पात्रांचा वेध घेणे महत्वाचे ठरते.

डॉ. विजया राजाध्यक्ष यांनी आपल्या कथांमधून मध्यमवर्गीय, पांढरपेशा व संपन्न समाजाचे दर्शन घडविले आहे. तसेच स्त्रियांचे विविध प्रश्न, त्यांचे कुटुंबातील स्थान आजची, आजची बदललेली स्त्री तसेच परंपरागत जीवन जगणाऱ्या स्त्रियांचे दर्शनही त्यांनी घडविलेले आहे.

## स्त्री व्यक्तिरेखा :—

डॉ. विजया राजाध्यक्ष यांनी विपूल कथालेखन करुन स्त्री व्यक्तिरेखांचे मनोज्ञ दर्शन आपल्या कथेतून घडविलेले आहे. त्यांच्या कथेतील स्त्रियां संकुचित नाही घरंदाज, तरुण, गृहिणी व नोकरदार स्त्रियांची विविध रुपे त्यांच्या कथेत आहे. स्त्री मनातील अनेक बारीकसारीक तपशील लेखिकेने कथेच्या माध्यमातून पुढे आणले आहे. मध्यमवर्गीय स्त्रियांचा मूकसंघर्ष, त्यांची सहनशिलता व नोकदार स्त्रियांचे भावविश्व या कथेतून स्त्रीच्या बाह्यरुपापेक्षा स्त्रियांच्या अंतरंगाचे व तिच्या मनोवस्थेचे दर्शन घडते. तसेच स्त्रीमनातिल कोंडी, घुसमट व स्त्रीमनातील सूक्ष्म आंदोलनाचा वेध लेखिकेने आपल्या कथासृष्टीतून घेतलेला आहे.

## संयमशीलता, धैर्य, करारीपणा, सोशिकता इ. स्वभाववैशिष्ट्य जोपासणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखा :—

डॉ. विजया राजाध्यक्ष यांच्या कथेतील व्यक्तीरेखा विविध स्वभाव वैशिष्ट्य जोपासणाऱ्या आहेत. 'नि:शब्द' (हुंकार) या कथेतील जेन ही जी. के. मोडक यांची मुलगी जेन च्या वाटयाला भयानक एकटेपण येते पण या एकटेपणाला ती टक्कर देते. या कथेत जेन च्या संयमी स्वभावाचे दर्शन घडविले. जेंव्हा तिच्या वडिलांची भेट होते तेव्हा ती आपल्या भावनांना आवर घालू शकत नाही. 'पाऊस' (हुंकार) या कथेतून संयमीवृत्ती बाळगणाऱ्या प्रतिभाचे दर्शन लेखिकेने घडविलेले आहे. प्रतिभाला मावशीच्या घराची ओढ असते. तिची आई तिला सतर्क करते. पुढेमात्र मावशीच्या घरीही तिला कटू अनुभव येतात. पुढे तिला मावशीचे घर रंगमंच वाटू लागते. स्वभावाने प्रतिभा ही साधी सरळ आहे. वैभवात लोळणारी माणसे किती खुजी असतात हा अनुभव प्रतिभाला मावशीकडे येतो. परंतु ती अतिशय संयमी असल्यामुळे सारंकाही मनातच पचवते. 'पुरुष' कथेतील सीताबाई गोपाळरावांसारख्या निरुत्साही माणसाबरोबर आयुष्य व्यतीत करते व कुटुंबाची जबाबदारी स्वत: पेलते. लेखिकेने स्त्रियांच्या अनेक प्रश्नांना हात घालून कथालेखन केलेले आहे. त्यांच्या कथेतील स्त्री कुठलीही सक्ती, जाच, अन्याय यातून सुटण्यासाठी मुक्त सहवासाची मागणी करण्याइतकी धीट व धैर्यशील आहे. स्त्री—पुरुष संबंधाच्या संदर्भात आपले विचार स्पष्टपणे व्यक्त करणाऱ्या स्त्रिया त्यांच्या कथेतून भेटतात. 'माती' या कथेतील निर्मला अतिशय धैर्यवान आहे. आपल्या मनाविरुद्ध लग्न झाल्याने एकटे जगण्याचा निर्णय घेऊन ती धैर्य दाखवते. 'लोट' कथेतील सुनिता, 'व्यूह' मधील रेखा पुरुष कथेतील पुष्पा भावे या स्त्रिया अतिशय धीट व मोकळया आहेत. मुक्तविचार बाळगणाऱ्या आहे. मानसिक परावलंबनातून सुटलेली स्त्री विजयाबाईंनी आपल्या कथेतून उभी केलेली आहे.

शांता शेळके, विजया राजाध्यक्ष यांच्या कथेच्या संदर्भात म्हणतात, ''हा प्रेयसी, पत्नी जशी विजयाबाईंनी रंगवली आहे तशी मातेचीही अनेक चित्रे त्यांनी रेखाटलेली आहे. त्यातील हुंकार ही सर्वोत्कृष्ट कथा म्हणावी लागेल.'' (१)शांता शेळके यांचे हे विधान यथार्थ वाटते. त्यांच्या स्त्री जीवन विषयक कथा लक्षणीय अशा आहेत. 'उभे दु:ख हे' (कमान) मधील जानकी कौटुंबीक आघात सहन करते. 'अंतराळ' मधील सिंधू पुत्रानिधनाचे दु:ख सहन करते.

## स्त्रीमनाचा हळवेपणा, नम्रतावृत्ती, कृतज्ञता, विनयशीलता, पतिव्रत्य, कर्तव्यनिष्ठा, क्षमाशीलता इ. गुणवैशिष्ट्ये जोपासणाऱ्या व्यक्तिरेखा :–

डॉ. विजया राजाध्यक्ष यांच्या कथांमधून स्त्रीमनाचा हळवेपणा, नम्रतावृत्ती, कृतज्ञता, विनयशिलता पतिव्रत्य, कर्तव्यनिष्ठा व क्षमाशिलता इ गुणवैशिष्ट्ये स्पष्ट होतात. 'वय'(अधांतर)मधील शिलाला मुलाची ओढ असते. पण तिच्या नवऱ्याला लग्नानंतर पाचवर्ष तरी मुलाची अपेक्षा नसते. शिला मनातून संतापते तिच्यादृष्टीने मूल हे सुखी संसाराचे चित्र आहे. 'कवच' (अधांतर) मधिल शिला ही देखिल अतिशय हळवी स्त्री आहे. 'नेहमीचेच' ची कथानायीका मिसेस तेलंग या स्त्रिया कर्तव्यदक्ष व धीट आहे. 'प्रतिबिंब' कथेतील लिना, 'उषा' कथेची नायिका उषा पुरुष कथेतील पुष्पा भावे, 'जानकी देसाई चे प्रश्न' मधिल जानकी हया स्त्रिया अर्थार्जन करणाऱ्या व कर्तव्यदक्ष आहेत. मध्यम वर्गीय दैनंदिन वास्तव लहानमोठया बारकाव्यासह स्पष्ट करत असतांना कर्तव्यदक्ष, पतिव्रता व निर्णायक स्त्रीचे व्यक्तीमत्व अनेक पैलूंसह लेखीकेने स्पष्ट केले आहे.

श्री. देवी देसाई यांच्यामते ''जीव ओतून मुलाबाळासाठी खपणाऱ्या त्यांच्यात गुंतणाऱ्या व जराही एकटेपणाची, आत्मीकतेची वस्तुस्थिती अनुभवणाऱ्या स्त्री व्यक्तीरेखा विजयाबाईच्या कथेत पुन्हा पुन्हा भेटतात.''स्त्री जीवनात, कुटुंबात आलेल्या अनुभवाचे सूक्ष्म प्रसंग, स्त्री जीवनाची कोंडी, आलेले एकाकीपण, मध्यमवर्गीय शहरवासी, पांढरपेशा स्त्री मध्ये काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर घडत गेलेले बदल लिखेकेने अनेक कथांमधून टिपले.

अंबिका सरकार यांच्यामते ''१९६०च्या आसपास तारुण्यात पदार्पण केलेल्या त्या काळच्या संवेदनशील स्त्रीचं रेखाटन विजयाबाईंनी समर्थपणे आणि प्रथमच केले'' ३) (सरकार अंबिका : कथाशताप्दी, ग्रंथाकी प्रकाशन प्र. क्र.१६) स्त्री व्यक्तीरेखांच्या माध्यमातून स्पष्ट झालेल्या आहेत.

## बंडखोर संघर्षातील व आत्मकथन जोपासणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखा :–

डॉ. विजया राजाध्यक्ष यांच्या कथेतील स्त्री धीट व धाडसी पाऊले उचलणारी आहे. 'जानकी देसाईचे प्रश्न' मधील जानकी बंगाली तरुणाबरोबर मुक्तसहवास पद्धतीने राहण्याचा निर्णय घेते पण तो दुसऱ्या स्त्रीमध्ये गुंतत जातो तेव्हा ती विभक्त होते. स्त्रियांच्या अनुभवविश्वात झालेले बदल विजयाबाईंनी आपल्या कथांमधून टिपलेले आहे. 'दोनवर्ष' कथेतील 'मी' प्राध्यापिका आहे. 'वर्तमान' कथेतील सरस्वती डॉक्टर आहे.' 'उषा' कथेतील उषा ऑफीसर आहे. 'अखेरचे पर्व' मधील शारदा शिक्षिका आहे. या व्यक्तीरेखांच्या माध्यमातून त्या त्या क्षेत्रातील कामाचे स्वरुप लेखिकेने स्पष्ट केले व त्याठिकाणी उत्पन्न होणारे प्रश्न, समस्या व त्यासाठी संघर्ष करणाऱ्या कथानायिका या कथामधून लेखिकेने उभ्या केलेल्या आहे.

शुभा चिटणिस म्हणतात त्याप्रमाणे ''स्त्रीच्या अवघ्या अवस्थांची ह्या कथांमधून घेतलेली नोंद चिंतनीय व ह्रदय अशा स्वरुपाची आहे'' (३) कौटुंबीक जबाबदारी पार पाडीत असतांना स्त्रियांची विविध रुपे विजया राजाध्यक्ष यांनी आपल्या कथेतून साकारलेली आहे. तसेच स्त्री मनाचे बदल संघर्ष व परिवर्तनही त्यांनी अधोरेखीत केलेले आहे.

## सारांश :–

विजया राजाध्यक्ष यांच्या कथेतील स्त्री व्यक्तीरेखा सुशिक्षीत आहे. वैचारिक दृष्ट्या प्रगल्भ आहे. बऱ्याच स्त्रियांनी आर्थिक स्वातंत्र्य मिळविलेले आहे. अनेक स्त्रियां निर्णायक भुमिका घेणाऱ्या आहेत. नोकरीकरणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न व समस्या विजयाबाईंनी अधोरेखित केलेल्या आहेत. अनेक जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या स्त्रिया त्यांच्या कथेत आहे. परावलंबनातून सुटलेली स्त्री त्यांनी कथेतून उभी केली. या स्त्रियांना उत्मभान आहे. घर कुटुंब व नोकरी हे त्यांचे कार्यक्षेत्र आहे. कुटुंबवत्सल, कर्तव्यदक्ष व स्वत:चे व्यक्तीमत्व फुलवणारी स्त्री त्यांनी आपल्या कथेतून उभी केली. तसेच स्त्रियांच्या वाट्याला येणारी घुसमट कोंडी व नानाविध प्रश्नांचा वेध विजया राजाध्यक्ष यांनी कथेच्या माध्यमातून घेतलेला आहे.

## संदर्भ ग्रंथ :–

१) शेळके शांता : वेचक विजया राजाध्यक्ष : प्रस्तावना पृ.क्र.११
२) संपा देशपांडे शिरीष : लेख श्री देवी देसाई
३) सरकार अंबिका : कथाशताब्दी, ग्रंथाली प्रकाशन पृ.क्र.१६
४) डॉ. चिटणीस शुभा : विजया राजाध्यक्ष यांच्या कथालेखनाचा प्रवास पृ.क्र. ३१

❖❖❖

# ज्ञानदेवे रचिला पाया । तुका झालासे कळस।

डॉ. स्मिता म. जाधव
कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा, जि.अमरावती, महाराष्ट्र (India)
Email: smitamohod15@gmail.com Mob.No.: 9764291038, 8208865157

गोषवारा:—

महाराष्ट्र या संताच्या भूमीत जे विविध धर्मसंप्रदाय उदयाला आलेत त्यातील एक संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय होय. या संप्रदायात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांपासून तर तुकोबारायांपर्यंतची एक फार मोठी उज्वल संतपरंपरा उदयाला आली. या संप्रदायाची तात्विक मांडणी संत ज्ञानेश्वरांनी केली. त्यांनी संस्कृत भाषेवर प्रभूत्व असूनही जनसामान्यांना कळेल अशा मायमराठीत विविध साहित्य रचले. त्यांनी लिहिलेले साहित्य अमर साहित्य आहे. त्यांच्या समकालीन असणारे संत नामदेव महाराज यांनी वारकरी संप्रदायाच्या तत्वज्ञानाचा सर्वत्र प्रसार केला.

संत एकनाथांनी आपले साहित्य मराठीत लिहून प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालून जीवन जगण्याचा अमूल्य संदेश लोकांना दिला. याच संत परंपरेत संत तुकाराम महाराजांचे नाव प्रकर्षाने घ्यावे लागेल त्यांनी लिहीलेली अभंगगाथा आजही लोकांच्या ओठावर आहे. याशिवाय संत सेना न्हावी, नरहरी सोनार, संत जनाबाई, संत चोखामेळा, संत सावता माळी इ.अनेक संतांचा नामोल्लेख करावा लागेल. या सर्वच संतांनी उक्ती आणि कृती याचा समन्वय साधून लोकांना उपदेश केला. राजाश्रयाची आस न बाळगता कार्य करणाऱ्या संप्रदायाने लोकांना ईश्वर भक्तीचा सोपा आणि सुगम मार्ग सांगीतला. वारकरी संप्रदायातील संतानी लिहिलेले साहित्य मराठी सारस्वताचे अनमोल लेणे आहे.

बीजशब्द

संत,वारकरी, संप्रदाय, महाराष्ट्र, भक्ती, विठ्ठल, अभंग, मराठी, संस्कृत, गुरुपरंपरा, कुलपरंपरा, शिष्य, साहित्य, पंढरीची वारी, सगुण, निर्गुण, ज्ञानेश्वरी

## प्रस्तावना :—

महाराष्ट्र ही संताची पूण्यभूमी आहे. या भूमीत फार मोठी संतपरंपरा उदयाला आली. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरापासून तर संत तुकोबारायांपर्यंत असे महान संत या भूमीत होवून गेले. या सर्व संतांनी समाजजिवनातील परिस्थितीचा वेध घेवून प्रबोधन केले. अभंग, कीर्तन, प्रवचन, गीते, भारुडे, गौळणी यातून लोकांची आध्यात्मिक जडणघडण करीत असतांनाच लोकांना सामाजिक एकात्मतेचा संदेश दिलाच पण त्याचबरोबर भक्तीमार्ग दाखविला, लोकांना परमार्थाची शिकवण देवून त्याचेतील पुरुषार्थ जागविण्याचे अमूल्य कार्य संतांनी केले. महाराष्ट्रामध्ये नाथ महानुभाव, दत्त, रामदासी, सुफी आणि वारकरी हे विविध संप्रदाय दिसून येतात. यातील सर्व संप्रदायांतील संतमहात्म्यांनी लोकजागृती घडवून आणली आणि लोकांमध्ये आत्मसन्मान आणि स्वाभिमान निर्माण केला. या सर्व संप्रदायातील संतांचे तत्वज्ञानाबाबत काही प्रमाणात बराच फरक असला तरी त्याचे ध्येय मात्र समान होते ते म्हणजे अखिल मानवजातीचे कल्याण साधणे हे होय.

या सर्व संप्रदायांमध्ये एक अत्यंत प्रभावशाली व लोकप्रिय भक्ती संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय (माळकरी संप्रदाय) होय. वारकरी संप्रदायातील संतांनी आपल्या कार्यकतृत्वाव्दारे महाराष्ट्रभूमीला अलंकृत केले. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांपासून संत तुकोबारायांपर्यंत ही उज्वल परंपरा दिसून येते. मराठी सारस्वताचे दालन संत साहित्याने समृध्द केले. त्यांनी आपले साहित्य हे लोकांना समजेल आणि रुचेल अशा मायमराठीत लिहीले. भक्ती,वैराग्य,तत्वज्ञान,नीती,सदाचरण, विश्वकल्याण या विषयांना त्यांनी आपल्या साहित्यात प्रामुख्याने स्थान दिले.

## चैतन्याचा महास्त्रोत संत ज्ञानेश्वर :—

वारकरी हा संप्रदाय नेमका केव्हा उगमपावला हे निश्चीतपणे जरी सांगता येत नाही. संत बहिणाबाई म्हणतात. श्संतकृपा जाली । इमारत फळा आली श या अभंगात लिहितात.

ज्ञानेदवे रचिला पाया। उभारिले देवालया
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले ते आवार
जनार्दन एकनाथ । खांब दिधला भागवत
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ८

यावरुन वारकरी संप्रदायाचा पाया संत ज्ञानेश्वरांनी रचला असे म्हटले जाते. तथापि वारी करणारा या अर्थाने वारकरी हा शब्द वापरला जाते. वारी म्हणजे नियमित फेरी, येरझार, यात्रा म्हणजेच न चुकता अंगिकारलेले व्रत धारण करतो, तो म्हणजे वारकरी. वारकरी संप्रदाय म्हणजे पंढरपूरच्या विठोबाशी संबंधित असलेला संप्रदाय आपल्या उपास्य देवतेच्या वारीला या संप्रदायाने जे महत्व दिले ते इतर कोणत्याच पंथाने दिले नाही. ही बाब अत्यंत उल्लेखनीय आहे.

संत ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत बरीच वर्षे पंढरीची पायी वारी करीत असत, म्हणजे संत ज्ञानेश्वरांपूर्वीही वारकरी संप्रदाय अस्तित्वात होता आणि त्याकरिताच पंढरपुरचे देवस्थान केव्हापासून अस्तित्वात आले याचा निश्चीत निर्णय होऊ शकला तर ती बाब वारकरी संप्रदायाचा आरंभाचा गड निश्चित करण्यास सहाय्यभूत होऊ शकेल. देवगिरीचा राजा श्रीरामदेवराय यादव या करणाधिप हेमाद्री (हेमाडपंत) 'यांची चतुवर्ग चिंतामणी' या ग्रंथात पांडुरंग माहात्म्यावरील श्लोक दिला आहे. हा ग्रंथ त्यांनी इ.स. १२६० ते १२७० च्या दरम्यान लिहिला आहे आणि म्हणूनच या ग्रंथाचा आधार घेवून श्री.म.ग.काणे धर्मशास्त्राचा इतिहास खंड ४ था यात लिहितात, "१२६० पूर्वी अनेक शतके पंढरपूरचा तीर्थमहिमा गाजत होता आणि भक्त पुंडलिकाची कथा प्रसिध्द होती. हयावरुन हे मंदीर फार पुरातन असले पाहिजे आणि वारकरी पंथही बराच प्राचीन असला पाहिजे असा निष्कर्ष निघतो या पार्श्वभूमीवर ज्ञानेदेवे रचिला पाया" या ओळीचा अर्थ ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाचा पाया घातला. हयाचा अर्थ हया संप्रदायाला अध्यात्मनिष्ठ मानवतावादाचे अधिष्ठान त्यांनी प्राप्त करुन दिले."[१]

दार्शनिक साक्षात्कारी संत एक श्रेष्ठ प्रतिभाव व सिध्दहस्त महाकवी, संतकवी आत्मानुभवी योगी,श्रेष्ठ तत्वज्ञ महाराष्ट्रातील भागवत धर्माचे प्रवर्तक, पारमार्थिक दिशादर्शक, क्रांतदर्शी समाजसुधारक असे श्रेष्ठ व्यक्तिमत्व म्हणजे संत ज्ञानेश्वर होत. संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाला तात्विक अधिष्ठान दिले ते कालपरंपरेने पंढरीची वारी करणाऱ्या वंशात जन्माला आहे म्हणून वैष्णव होते आणि म्हणूनच ज्ञानेश्वरांना वारकरी संप्रदायात संस्थापकाचा मान दिला जातो. संत ज्ञानेश्वरांची गुरुपरंपरा ही नाथपंथीय होती. त्यांचे गुरु त्यांचे जेष्ठ बंधू श्री निवृत्तीनाथ होते. त्यामुळे नांथपंथाचा समृध्द तत्वज्ञानाचा वारसा त्यांना प्राप्त होतो आणि याच संस्कारातून त्यांचा जीवनविषयक दृष्टीकोन निर्माण झाला होता निवृत्तीनाथाकडून संत ज्ञानेश्वरांना नाथ संप्रदायाचा अनुग्रह झाल्याने ते गुरुपंरपरेने शैव आहेत. पुढे वारकरी संप्रदायाचा त्यांनी जो तात्वीक पाया घातला त्यामूळे ते अखिल जगाचे माऊली बनले. संत "संत नामदेवांनी त्यांना ज्ञानराज योग्यांची माऊली" असा भाव प्रकट केला त्यांच्या समाधीप्रसंगी "नामा म्हणे अवा लोपला दिनकर । बाप ज्ञानेश्वर समाधिस्था"। असा आर्त टाहो फोडला आणि संत ज्ञानदेव सर्वांचेच मायबाप झाले. संत ज्ञानेश्वराच्या रुपाने वारकरी संप्रदायाला जणू चैतन्याचा महास्त्रोत मिळाला. ज्ञानेश्वरांना त्यांच्या मातापित्यांना व बहीण भावंडांना समाजाकडून असहय जाच सहन करावा लागला जणू तो त्यांचे विषाचा पेला पिल्याप्रमाणेच होता. समाजाने केलेली निंदानालस्ती किती भयानक असू शकते याचा स्वानुभव त्यांनी घेतलेला होता. त्याचाच परिणाम त्यांच्या मातापित्यांनी केलेला आत्मत्याग होय. तरीही समाजाकडून छळ सुरुच राहिला पण तरीही ते शांतचित्त होते. अशावेळी निवृत्तनाथ सोपानदव,ज्ञानदेव आणि मुक्ताई यांचे मन अंतर्बाहय उजळून निघाले आणि चौघेही समस्त लोकांकरीता दीपस्तंभ बनले त्यात संत ज्ञानदेवांना तर त्याच समाजाने "माऊली" म्हणून संबोधले.

संत ज्ञानेश्वर हे महाराष्ट्रातील आमुलाग्र परिवर्तनाचे पथदर्शक होते. कुलपरंपरेने वैष्णव आणि गुरुपंरपरेने शैव असणाऱ्या ज्ञानेदेवांनी समाजाला अचूक दिशादिग्दर्शने केले. त्यांनी कशाचाही लिहिलेले विपूल साहित्य हे त्याचे प्रतिक आहे.

अध्यात्मविद्या ही विशीष्ट वर्गाची मक्तेदारी नाही तर सामान्य ही आत्मसात करु शकतो हा आत्मविश्वास लोकांच्या मनामध्ये निर्माण करण्याचे कार्य ज्ञानेश्वरांनी केले आणि म्हणूनच संत बहिणाबाईंनी "ज्ञानदेवे रचिला पाया" अशा सार्थ शब्दात ज्ञानेश्वर महाराजांच्या अलौकिक कार्याचे वर्णन केले आहे. संत ज्ञानेश्वरांनी विपूल ग्रंथ निर्मिती केली. ज्ञानेश्वरी, चांगदेवपासष्टी, अमृतानुभव आणि अनेक स्फूट अभंग लिहीले ज्ञानेश्वरी ही त्यांनी लिहिलेला ग्रंथ भगवद्गीतेवरील टीकाग्रंथ आहे. हा ग्रंथ मराठी भाष्य गंथाचाच नव्हे तर मराठी काव्याचाही मानदंड आहे. स्वतंत्र ग्रंथनिर्मितीचे सामर्थ्य त्यांचे ठायी असतांनाही ते गीतेवर भाष्य करण्याकरीता भव्य भगवद्गीतेला स्वीकारतात हे महत्वपूर्ण आहे. परंतु गीतेकडे ज्ञानेश्वर हे केवळ भाष्यविषय म्हणून पाहत नाही. तर तो त्यांचा श्रध्देचा, चिंतनाचा,प्रीतीचा, अनुभूतीचा आणि आस्वादाचा विषय आहे. आणि म्हणूनच ज्ञानेश्वरीत या सर्व भावभावनांचा साक्षात्कार घडतो. संत बहिणाबाईंनी "ज्ञानेश्वरीस इमारतीचा पाया मानले आहे. संत साहित्याची गंगोत्री मानले नाही. कारण ज्ञानेश्वरी हा एक वाग्यज्ञ आहे. त्यातून अखंड स्फूरणाचा अनुभवांच्या ज्वालेतून प्रत्येक मराठी संताने आपली आंतरिक ज्योत प्रज्वलित करुन घेतलेली आहे. ज्ञानेश्वरी हा आध्यात्मिक ज्ञानाचा जणू महासागर

आहे. ज्या ज्या संताने हया ज्ञानसागरातून आपल्या वाणीने पाट काढून दिले आहेत, त्यामुळे संतकाव्यातून ज्ञानेश्वरीच पाझरतांना दिसते आणि म्हणून फोडिले भांडार धन्याचा हा माल ! मी तो हमाल भारवाही, अशी सच्ची नम्रताचे पुढील संतांना व्यक्त करावीशी वाटते."[२]

संत ज्ञानेश्वर हे शब्दसृष्टीचे ईश्वरच होते. त्यांनी लिहिलेली "ज्ञानेश्वरी" हा श्रेष्ठ काव्यग्रंथ आहे. ज्ञानेश्वरी शिवाय संतसाहित्याची संकल्पना करणे कठीण आहे आणि म्हणूनच मराठी काव्याचा मानदंड म्हणून ज्ञानेश्वरीचा उल्लेख केला जातो.

"वाचे बरवे कवित्व । कवित्वीबरवें रसिकत्व
रसिकत्वी परतत्व । स्पर्शु जैसा ।।" (ज्ञानेश्वरी अ.१८ ओवी ३४७)

ज्ञानेश्वरांनी मराठी संतकाव्याचे मूळ लक्षण आहे. त्यांनी काव्यनिर्मीतीमध्ये शब्द शक्तीचा केलेला विचार पूढील संतांनी मार्गदर्शक ठरतो. संत नामदेव हे त्यांचे समकालीन होते. पूढे संत एकनाथ,संत गोराकुंभार,नरहरी सोनार,संत जनाबाई यासारख्या विविध संतानी आणि पूढे तुकोबारायांनी याच विचारावरुन वाटचाल केली.

महाराष्ट्रातील संतांची परंपरा ही ज्ञानेश्वरांपासून तुकारामापर्यंत तेजस्वी स्वरुपात आढळते. संत ज्ञानेश्वरांनी प्रस्तुत केलेल्या तत्वज्ञान संत नामदेव, संत एकनाथ आणि वारकरी संप्रदायातील संतांची अतुट श्रध्दा होती. ज्ञानदेवांचेच समकालीन नामदेव हे वारकरी पंथाचे आदय प्रचारक होत. त्यांनी महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात भ्रमंती करुन वारकरी संप्रदायाचा प्रसार केला. संत ज्ञानदेवांनी वारकरी पंथाला तात्विक अधिष्ठान दिले. त्या प्रमाणे संत नामदेव हे तत्वचिंतकाच्या भूमिकेत दिसत नसले तरी त्यांनी ईश्वरभक्ती करण्याचा आदर्श निर्माण केला. पंढरीनगरी ही सर्व तीर्थांचे तीर्थ आहे अशी ऐकांतिक श्रध्दा समोर ठेवून वारकी पंथाला सर्वदूर प्रसारित केले. सुरुवातीला सगुण भक्तीत रममाण झालेल्या संत नामदेवांना ज्यावेळी सर्वात्मक परमेश्वराचे ज्ञान प्राप्त झाले त्यावेळी परमेश्वराच्या भक्ती रुपाला आपण अभंगाव्दारे प्रसारित केले. त्यांचे अभंग भारतात लोकप्रिय झालेत.

विठ्ठलाच्या भक्तीने भारलेल्या संत ज्ञानदेव—नामदेव या संताबरोबरच गोरा कुंभार,नरहरी सोनार, सावता माळी, चोखा मेळा, सेना न्हावी, संत तुकाराम अशी विविध संतांची एक वारकरी संप्रदायाची प्रभावळ महाराष्ट्रात उदयाला आली. या सर्व संतानी आपआपल्या व्यवसायाशी प्रामाणिक राहून विठ्ठलभक्तीचे महात्मय अभंगातून वर्णन केले आणि विशेष म्हणजे त्यांनी आपल्या व्यवसायाची परिभाषा वापरुन भक्तीला श्रेष्ठतम दर्जा दिले. हे संत टाळ कुटत राहिले नाही तर व्यवसायात मग्न होवून ते भक्तीत लीन झाले आणि स्वत:बरोबरच लोकांना आत्मविकासाची वाट त्यांनी मोकळी करुन दिली.

संत नरहरी सोनार म्हणतात,

"देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार
देह बागेसरी जाणे । अंतरात्मा नाम सोने
त्रिगुणाची करुनी मूस । आत ओतिला ब्रम्हरसा"

तर संत सावता माळी म्हणतात.

" कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी
लसूण मिरची कोथिंबीरी । अवघा झाला माझा हरी ।"

या प्रमाणे व्यवसायाकडे लक्ष देवून आपला व्यवसाय हा विठ्ठलाच्या भक्तीला त्यांनी समर्पित केला.

संत ज्ञानदेव, नामदेव यांच्या नंतर विविध संत उदयाला आले आणि याच परंपरेत संत एकनाथ महाराजांच्या उदय झाला. संत ज्ञानेश्वरांची गुरुपरंपरा ही नाथपंथीय होती तशी संत एकनाथांची दत्त संप्रदायी होते कारण त्यांचे गुरु जनार्दनस्वामी हे दत्तोपासक होते आणि त्यांची कुलपरंपरा ही वैष्णवपंथीय होती. कारण त्यांचे पणजोबा भानुदास हे विठ्ठलभक्त होते. विठ्ठलभक्तीची कुलपरंपरा पाठीशी असल्याने त्यांच्याकडून वारकरी संप्रदायाच्या विकासात फार मोलाची भर टाकली. ज्या प्रमाणे संत ज्ञानेश्वरांनी संस्कृत भाषेवर प्रभूत्व असूनही "ज्ञानेश्वरी" ही मायमराठीत लिहून गीतेचा अर्थ सर्व सामान्यांना सांगीतला त्याच प्रमाणे संत एकनाथानीही "भागवतपुराण मराठी भाषेत" लिहिले ज्यावेळी काशीच्या सनातनी लोकांनी त्यांनी याकरीता विरोध केला.

"संस्कृत भाषा देवे केली ।
तरी प्राकृत काय चोरापासून झाली ।।"

असा सवालही विचारण्यास ते मागे सरले नाही पण याचा अर्थ त्यांनी संस्कृत भाषेवर प्रेम केले नाही असे होत नाही तर उलट त्यांच्या मनात संस्कृत भाषेबद्दल अत्यंत आदर आणि प्रेम होते पण जी भाषा बहूजनांना

समजतच नाही तरी त्याच भाषेचा हेका धरणे त्यांना मान्य नव्हते. संत एकनाथांनी प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालून जीवन जगण्याचा अमूल्य संदेश लोकांनी दिला एकनाथी भागवतात ते म्हणतात.

"हे देशभाषा वाणी । उघडिली परमार्थची खाणी ।
हे ऐका तरी मराठी । ज्ञानदाने होईल लाठी ।"

यावरुन त्यांचे मराठी भाषेवरील आत्यंतिक प्रेम लक्षात येते.

याच वारकरी संत परंपरेत संत तुकाराम यांचे नाव प्रकर्षाने घ्यावे लागेल. इ.स.च्या १७व्या शतकातील युगप्रवर्तक संत म्हणजे तुकाराम महाराजांचा उल्लेख करावा लागेल. एक थोर संत, प्रतिभावंत कवी आणि समाजाच्या अध्ययनाकरिता आपले सर्वस्व अर्पण करणारे संत तुकाराम होय. ते विठ्ठलभक्त होते. त्यांची कतृत्वशक्ती अमोघ होती विठ्ठलाचा भक्ती त्यांना कुलपरंपरेने मिळाली होती. ते एका अभंगात लिहितात.

"पंढरीची वारी आहे माझे घरी ।
आणिक न करी तीर्थव्रत
माझ्या वडिलांसी मिरासी गा देवा।
तुझी चरण सेवा पांडुरंगा ।।"

त्यांचे व्यक्तिमत्व हे जन्मजात भावकवीचे होते. त्यांच्या वाणीत कमालीची प्रासादिकता, उत्कटता, उत्स्फूर्तता, कारुण्य, आत्मनिष्ठा होती त्यामुळे अंतरिचे धावे स्वभावे बाहेरी । यातून त्यांचे भावकाव्य निर्माण झाले. त्यातील एका अभंगाचा उल्लेख येथे करणे इष्ट ठरेल.

"कन्या सासुयासि जाये । मागे परतोनी पाहे ।
तैसे झाले माझ्या जिवा। केव्हा भेटसी केशवा ।।
चुकलिया माये बाळ हुरु हुरु पाहे ।।
जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी।।"

हा सुंदर भावाविष्कार त्यांच्या लेखणीत आहे. यावेळी ती अत्यंत मृदू बनते पण कधी पण त्याच प्रमाणे त्यांची लेखणी ही कधी अत्यंत धीट बनते. समाजातील वाईट कुप्रथांवर ते आपल्या लेखणीतून प्रहार करतात धर्माचे बाहय अवडंबर,कर्मकांड यावर ते मार्मिक प्रहार करतांना दिसून येतात. समाजाला सामाजिक विषमता परमार्थाच्या नावावर लुटणाऱ्यांना भोंदूनां फटकारतात ते लिहितात.

ऐसे केसे जाले भोंदू । कर्म करोनी म्हणती साधू ।।
अंगा लावूनिया राख । डोळे झाकुनी करितो पाप ।।
दावुनी वैराग्याच्या कळा । भोगी विषयाचा सोहळा ।।
तुका म्हणे सांगो किती । जळो तयांची संगती ।। (तुकाराम गाथा ३२४७)

एखादया संसारी व्यक्तीने संसारात राहून परमार्थ कसा साधावा हयाचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे संत तुकाराम महाराज होय.

संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाची जी इमारतीचा पाया रचला त्या पायावर नामदेव, एकनाथ आणि अन्य संतजनांनी सुरेख इमारत रचली आणि त्या इमारतीवर कळस चढविण्याचे कार्य संत तुकारामांनी केली.

"आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्न करु ।
शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोका ।"
तुका म्हणे पहा शब्दचि हा देव । शब्देचि गौरव पूजा करु ।

त्यांच्या या शब्द कळेचे वैशिष्टय वा.ल.कुळकर्णी सांगतात.

"तुकारामांची वाणी ही अस्सल मराठमोळी आहे. ती शिष्टांची भाषा नाही. ती भाषा आपण सुसंस्कृत आहे हे दाखवत नाही. सुसंस्कृतपणाचा आव आणीत नाही. सुसंस्कृत बनण्याची धडपड करीत नाही.ती आपले सामर्थ्य लोक भाषेतून होते. लोकोभाषेची बोलण्याची पध्दती, त्या भाषेचे वाक्संप्रदाय त्या भाषेतील म्हणी, त्या भाषेतील बोलके शब्द घेऊन ती बोलत असते."[३]

अशा प्रकारे वारकरी संप्रदायातील संतामध्ये विचार भावना आणि धारणा यांची श्रीमंती होती.या संतांनी महाराष्ट्र भूमीला त्याग, निष्ठा, सहिष्णूता, औदार्य आणि भक्ती यांनी सिंचीत केले. संत ज्ञानेश्वरापासून संत एकनाथ, गोरा कुंभार,चोखा महार, संत तुकाराम यांचा समाजाने असहय छळ केला. परंतू तो सहन करुन समाजाला आपले प्रेम समर्पित केले कारण ते संत होते. संत कसा असावा हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात.

तुका म्हणे तोचि संत । सोशी जगाचे आघात ।"

वारकरी संप्रदायाने देशी भाषेचा पूरस्कार करुन अमूल्य साहित्य निर्मिती केली.या संप्रदायातील एकेक संत जणू एक संस्थाच होती. त्यांचा शब्द न शब्द हा अखंड स्फूर्तीचा प्रेरणास्त्रोत आहे.

लोकसंग्रह आणि लोक संघटन ही प्रभावी सुत्रे या संप्रदायाची होती. हा संप्रदाय लोकांना अधिक आवडला कारण या संप्रदायाने कधीच राजाश्रयाची आस बाळगली नाही. संत तुकोबारायांना शिवाजी महाराजांचे आमंत्रण आले तेव्हा तुकोबाराय म्हणाले,

"दिवव्या छत्री घोडे । हे तो बऱ्यात न पडे ।
राजगृहा यावे मानाचिया आसे । तेथे काय वसे समाधान"[४]

## समारोप

या संप्रदायाने लोकांना नीती, सदाचरण, भक्ती, त्याग यांची शिकवण दिली. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि तुकारामांची गाथा हे तीन ग्रंथ म्हणजे वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी होय असे म्हणतात. यात अनेक संतांनी मौलीक भर टाकली आणि हा अमूल्य ठेवा जनताजनार्दनापूढे ठेवला. या संप्रदायाची शिकवण आजही लोकांच्या हृदयसिंहासनावर कायम आहे. "ज्ञानेश्वरीच्या अभावी मराठी साहित्याची वास्तू विस्तारणे शक्य नसले तरी संताच्या व्यक्तिमत्वानुसार त्याची उंची वाढली. ज्ञानेश्वर नसते तर नामदेवांची सगुणभक्ती निर्गुणाकडे झुकली नसती. संत एकनाथांना भागवतावर भाष्यग्रंथ रचण्याची प्रेरणा लाभली नसती. यादव काळातील संतांची "मांदियाळी" दिसली नसती. तुकारामांना श्रेष्ठ गीताधर्म आपल्या जीवनातून व साहित्यातून प्रवाहित करता आला नसता. महाराष्ट्राचा अभ्युदय साधणारी वारकरी पंथाची चळवळी उभी राहू शकली नसती आणि म्हणूनच प्रत्येक संताचे ज्ञानेश्वरीशी थेट पहिले नाते आहे."[५]

आणि म्हणूनच तेराव्या शतकात प्रवर्तित होवून थेट सतराव्या शतकात उभ्या असलेल्या वारकरी संप्रदायाचे भव्य वास्तूरुप संत बहिणाबाईसमोर उभे ठाकले आणि त्यांनी ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीला वारकरी संप्रदायाचा पाया असे संबोधले आणि त्या पायाला आपल्या कतृत्वाने आणि वाणीने पूढील संतांनी संचीत केले आणि संत तुकोबांनी त्यावर कळस चढविला म्हणूनच म्हणात. "ज्ञानेदेव रचिला पाया । तुका झालासे कळस।।"

## निष्कर्ष :—

१. महाराष्ट्रामध्ये जे विविध संप्रदाय आहेत. त्यातीलच एक संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय होय.
२. लोकाभिमुखता वारकरी संप्रदायाचे एक फार मोठे वैशिष्टय होय.
३. समाजधारणेला आवश्यक असणारी कर्म सोडण्याचा उपदेश या संप्रदायाने कधीच केला नाही.
४. वारकरी संतांनी राजाश्रयाची आस कधीच बाळगली नाही.
५. वारकरी संप्रदाय ज्ञानेश्वरांच्या पूर्वी अस्तित्वात होता पण या पंथाला खऱ्या अर्थाने तात्विक अधिष्ठान दिले ते ज्ञानेश्वराने.
६. प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालून मनुष्य आपले जीवन आनंदाने व्यतित करु शकतो. हे या संप्रदायातील संतानी सांगितले.

## संदर्भ टीपा

१. मराठी विश्वकोश,खंड१६, पृ.क्र. ७८
२. लेख— सुहासिनी इर्लेकर— संतसाहित्य: अभ्यासाच्या काही दिशा पृ. १९
३. युगप्रवर्तक संत तुकाराम रामदास — पृ.७२
४. मराठी विश्वकोश खंड १६ पृ.८१
५. संपादक— डॉ.कल्याण काळे, रा.श.नगरकर — संत साहित्य अभ्यासाच्या काही दिशा पृ.२०

## संदर्भ ग्रंथ

१. मराठी विश्वकोष — खंड १६ — मुख्य संपादक — मे.पुं. रेगे
२. बा.र.सुंठणकर महाराष्ट्रातील संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य, प्रकाशक — लोकवाङमयगृह मुंबई
३. संपादक — डॉ. कल्याण काळे, रा.शं. नगरकर, संत साहित्य : अभ्यासाच्या काही दिशा प्रकाशक:— श्री. एल.व्ही.तारे, पुणे
४. संपादक :— डॉ. मुकुंद दातार — मध्ययुगीन धर्मसंप्रदायी वाङमय — एक विंहगदर्शन प्रकाशक :— स्नेहल प्रकाशन,पुणे.
५. डॉ.स.रा.गाडगीळ — मराठी काव्याचे मानदंड, खंड पहिला — पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

❖❖❖

# संज्ञाप्रवाह व कानेटकरांचे कथात्मक साहित्य

डॉ. गजानन विष्णू लोंढे
आबासाहेब काकडे महाविद्यालय,
बोधेगाव, ता.शेवगाव, जि.अहमदनगर, महाराष्ट्र (India)
भ्रमणभाष – ९४२३३९०९९०

## प्रस्तावना

वसंत कानेटकर हे प्रामुख्याने नाटककार म्हणून ओळखले जात असले तरी त्यांनी कथा, कादंबरी, वैचारिक व आत्मपर असे विविध स्वरुपाचे लेखन केलेले आहे. १९३८–३९ च्या सुमारास त्यांनी कथालेखनाने आपला लेखनप्रवास सुरु केला. त्यांचे प्रातिनिधिक कथांचे तीन संग्रह प्रसिद्ध असून एकूण सेहेचाळीस कथा आहेत. घर, पंख व पोरका या तीन कादंबऱ्या आणि याशिवाय काही आत्मपर लेखन व काही वैचारिक लेखनही प्रसिद्ध आहे. त्यांच्या अनेक नाटकांची व कादंबऱ्यांची बीजे त्यांच्या कथांमध्ये सापडतात म्हणूनच नाटककार कानेटकरांच्या लेखनाचा शोध घेण्यासाठी कथावाङ्.मयाचा अभ्यास महत्वाचा ठरतो.याशिवाय त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमध्ये 'संज्ञाप्रवाह' ही संकल्पना वापरलेली आहे. त्यामुळे संज्ञाप्रवाह म्हणजे काय? कानेटकरांच्या कादंबऱ्यातील संज्ञाप्रवाह व एकंदरीतच त्यांचे कथात्म साहित्य अशा तीन पातळीवर येथे अभ्यास अपेक्षित आहे.

बीजशब्द

कानेटकरांनी आपल्या लेखनात विशेषत: कादंबरीलेखनात 'संज्ञाप्रवाह' ही पाश्चात्य साहित्यातून आलेली संज्ञा वापरली. संज्ञाप्रवाहाची बीजे तशी त्यांच्या कथावाङ्.मयातच सापडतात परंतु या लेखनाला संज्ञाप्रवाही कथा मात्र म्हणता येणार नाही. फार तर मनोविश्लेषनात्मक कथा असा त्यांचा उल्लेख करता येईल. मनोविश्लेषणाचा पुढचा टप्पा म्हणजे संज्ञाप्रवाह होय. आता संज्ञाप्रवाह म्हणजे काय हे थोडक्यात समजावून घेऊ.

मानवाला दोन मने असतात एक जागृत किंवा बहिर्मन व दुसरे अंतर्मन. विसाव्या शतकापर्यंत माणसाच्या जागृत मनाचाच विचार होत असे परंतु विसाव्या शतकानंतर मात्र अंतर्मन हेच खरे वास्तव आहे आणि सत्यापर्यंत पोहोचायचे असल्यास या अंतर्मनाचा शोध घेतला पाहिजे या विचारसरणीने जोर धरला. प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ सिगमंड फ्राइड यांच्या अबोध मनाच्या शोधाचा वाङ्.मय धारणेवर फार मोठा प्रभाव पडला. फ्राइडच्या नव्या सिध्दांतानुसार मानवी मनाच्या एकूण भागापैकी फक्त एक अष्ठमांश भाग सबोध म्हणजे जागृत मनाने व्यापलेला असून उरलेला सात अष्ठमांश भाग अबोध अथवा नेणिवयुक्त मनाने व्यापलेला असतो. या नेणिवेतील जाणिवेचे साहित्यातील चित्रण **Stream of Consciousness** (संज्ञाप्रवाह) म्हणून ओळखले जाऊ लागले. मराठी साहित्यात मात्र हा संज्ञाप्रवाह काही मोजक्याच साहित्यातून दिसतो. यामध्ये बा.सी.मर्ढेकर यांच्या 'रात्रीचा दिवस', वसंत कानेटकरांची 'घर', विश्राम बेडेकरांची 'रणांगण' अशा काही कादंबऱ्यांचा समावेश होतो.

Stream of Consciousness हा शब्द प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ विल्यम जेम्स याने १८९० मध्ये प्रसिद्ध झालेल्या आपल्या Principles of Psychology (मानसशास्त्राची तत्वे)या पुस्तकात पहिल्यांदा वापरला. Stream of Consciousness ला पर्यायी शब्दप्रयोगम्हणून मराठीत संज्ञाप्रवाह ही संकल्पना वापरली जाते. 'संज्ञा' याचा अर्थ शुद्धी, चेतना, ज्ञान, बुद्धी (संस्कृत : सम + ज्ञा = जाणणे) असा आहे. (महाराष्ट्र शब्दकोश, विभाग सातवा) तर प्रवाह म्हणजे ओघ (अभिनव मराठी – मराठी शब्दकोश, भाग तिसरा, संपादक–द.ह.अग्निहोत्री) Stream म्हणजे प्रवाह व Consciousness म्हणजे संज्ञा, चेतना अथवा जाणीव होय. यावरुन संज्ञाप्रवाह म्हणजे चेतनेचा प्रवाह किंवा जाणिवेचा प्रवाह असे म्हणता येते. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, 'माणसाच्या अंतर्मनातील गुहेत नेणिवेत (?) चाललेली विलक्षण खळबळ जाणिवेच्या पातळीवर आणण्याचा प्रयत्न 'संज्ञाप्रवाह' या नावाने ओळखला जातो'.[१]

फ्राइडचा सर्वात महत्वाचा शोध अप्रकट किंवा नेणिवयुक्त मनाचा होय. या अंतर्मनाविषयी डॉ.दु.का.संत म्हणतात, 'या अंतर्मनात अनेक भावभावना, वासना म्हणता येतील अशा सुप्त इच्छा, त्यांच्या प्राथमिक अवस्था म्हणजे असंस्कारित, असामाजिक उर्मिच्या स्वरुपात वावरत असतात. ह्या दोन विभागाच्या मध्यावर (अंतर्मन व बहिर्मन) आपल्या सद्सद्विवेक बुद्धीच्या रुपाने एक नियंत्रक उर्फ सेन्सॉर वावरत असतो. त्याच्याद्वारे अंतर्मनातील वरील विविध उर्मी इ. ह्या प्रकट मनात येत असतात. त्यासाठी अनेकदा मूळ स्वरुपात बदल करुन विशिष्ट उर्मिचे अधिक सामाजिक दृष्टीने मान्य असलेल्या उदात्ततेत रुपांतर करुन घ्यावे लागते. त्याला 'सब्लमेशन' म्हणतात. ते शक्य नसल्यास त्या उर्मी तो नियंत्रक दाबून टाकतो. त्याला दमन उर्फ 'रिप्रेशन' असे नाव आहे.'[२] फ्राइडने जागृत

किंवा बहिर्मनाचा संबंध अंतर्मनाशी जोडला. मनुष्याच्या मनातील विचार, भावना, वासना, वर्तन यांचे मूळ त्याच्या अंतर्मनात असते. त्यामुळेच अंतर्मनाचा शोध घेणे क्रमप्राप्त ठरते. खरे वास्तव हे अंतर्मनच असते. समाज, संस्कृती व नैतिक मूल्ये इत्यादीमुळे हे वास्तव जसेच्या तसे वाड्.मयात येत नाही. संज्ञाप्रवाहाच्या रुपाने ते वाड्.मयात येऊ लागले. सद्सद्विवेकबुद्धी ही खऱ्या वास्तवाचे उदात्ततेत रुपांतर करते किंवा वास्तवाला दाबून तरी टाकते. जागृत मन किंवा बहिर्मन हा एक मूखवटा आहे. अर्थात या बहिर्मनाच्या वागण्यावरुन कलावंत अंतर्मनाविषयी काही अंदाज बांधत असतो. फ्राइडच्या मते कला हा ईप्सित पूर्तीचा उपक्रम आहे. या अंतर्मनातील उर्मित कामभावनेला अधिक महत्व असते. काम व भूक या मानवाच्या जगण्याच्या दोन महत्वाच्या प्रेरणा आहेत. म्हणून संज्ञा प्रवाहात कामभावनेला अधिक महत्व प्राप्त झालेले दिसते.

संज्ञाप्रवाहाचे अधिक स्पष्टीकरण करताना वसंत शहाणे म्हणतात, 'आमच्या जाणिवेत अथवा संज्ञेत जो असंबद्धतेचा फार मोठा भाग असतो. त्याचे चित्रण करायचा कादंबरीकार प्रयत्न करतो ही खरीखुरी असंबध्दता आहे असे वाटते. खरे पाहिले असता या दर्शनी असंबद्धतेच्या मागे खोल आणि सूक्ष्म अशी मानवी बुद्धीला सहजपणे न आकलन करता येणारी साखळी असतेच. या साखळीत सत्य विखुरलेले आहे. या सत्याचे कण कलावंताला शोधायचे असतात, वेचायचे असतात. या सखोल, सूक्ष्म वास्तवाचा ठाव लागून कलेच्या चौकटीत त्याचे दर्शन त्याला घडवायचे असते. याचा अर्थ मात्र असा नव्हे की, त्याला केवळ त्या असंबद्धतेचे शब्दरुपाने एक छायाचित्र काढायचे असते.'[३] साहित्यनिर्मितीत कलावंताचे मन हे महत्वाचे असते. कारण कलानिर्मितीची बीजे ही त्याच्या अबोध मनात असतात. या अबोध व सबोध मनाचा संबंध स्पष्ट करताना वसंत शहाणे लिहितात, 'अप्रकट मन हे फेसाळणाऱ्या सोडावॉटरच्या बाटलीसारखे आहे आणि प्रकट मन म्हणजे त्या सोडावॉटरच्या बाटलीचे बूच. हे बूच स्वतंत्र आहे, घन आहे, स्वयंसिद्ध आहे असे उगाचच आपल्याला वाटते.'[४] म्हणजे प्रकट मनात ज्या वृत्ती–प्रवृत्ती, विचार असतात त्याचे मूळ अप्रकट मनात असते. म्हणूनच खऱ्या वास्तवाचा शोध घेण्यासाठी हे प्रकट मन समजून घ्यावे लागते. प्रकट मन हे फक्त जागृतावस्थेत कार्यान्वीत असते, तर अप्रकट मन हे जन्मापासून मरेपर्यंत जागृत व अजागृत (म्हणजे झोपेत) दोन्ही अवस्थेत कार्यान्वीत असते आणि संज्ञा प्रवाहात याचेच चित्रण येते. थोडक्यात नेणिवयुक्त मनातील जाणिवेचा प्रवाह म्हणजे संज्ञाप्रवाह होय.

संज्ञाप्रवाहात ज्या मनाचे चित्रण येते त्याविषयी वसंत तांबे म्हणतात, 'मानसशास्त्राप्रमाणे मनुष्याचे मन हे गुणावगुणांच्या बांधलेल्या जुडीसारखे नाही. ते एखाद्या नदीच्या प्रवाहासारखे असते. हा प्रवाह निश्चित असा अर्थातच नसतो. तो कधी जोरात तर कधी हळू, कधी संथ तर कधी खवळलेला असा वाहत असतो. त्याचे दरक्षणी वेगळेच—नविनच स्वरुप प्रत्ययाला येते; आणि पुढच्या क्षणी तो कोणते स्वरुप धारण करील, कुठे वळण घेईल हे सहजासहजी सांगणे कठीण असते.'[५] अशाप्रकारे नदीच्या प्रवाहाप्रमाणे असलेल्या मनाचे चित्रण संज्ञाप्रवाहात येते. म्हणूनच त्याला 'स्वयंचलित लेखन' असेही म्हणतात. या लेखनात व्यवस्थीत मांडणी वगैरे नसते. अंतर्मनातील खळबळीला कोणताही क्रम नसतो. शिस्तबद्ध संकल्पना नसते. म्हणूनच ती खळबळ नेहमीच व्यक्त करता येतेच असेही नाही. तरीही काही प्रतिमा, प्रतिके, सूचकता इ. च्या साह्याने शब्दांची मोडतोड करुन कलावंत ती मांडण्याचा प्रयत्न करत असतो.

फ्राइडच्या अबोध मनाच्या शोधानंतर पाश्चात्यांकडून संज्ञाप्रवाह मराठीत आला. परंतु मराठीत मात्र तो फारसा रुजला नाही. १९६० नंतर काही प्रमाणात त्याने मूळ धरले. मनोविष्लेषण, अस्तित्ववाद, अतिवास्तववाद इ. प्रकारात त्याची मराठीत सरमीसळ झाली आहे. विश्राम बेडेकरांच्या 'रणांगण' (१९३९) या कादंबरीपासून मराठी साहित्यात संज्ञाप्रवाहाची सुरवात झाली असे मानले जाते. त्यानंतर बा.सी.मर्ढेकर यांची 'रात्रीचा दिवस' तसेच वसंत कानेटकरांच्या घर, पंख व पोरका, भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' व चि.त्र्यं.खानोलकरांच्या 'कोंडूरा', 'त्रिशंकू', 'रात्र काळी घागर काळी' इ. कादंबऱ्यात ठळकपणे संज्ञाप्रवाही तंत्र वापरलेले दिसते.

कानेटकरांच्या कादंबऱ्यांचा विचार करतांना 'घर', 'पंख' व 'पोरका' या तीनही कादंबऱ्यात त्यांनी व्यक्तिंच्या भावभावनांना अधिक प्राधान्य दिलेले आहे पर्यायाने या कादंबऱ्यात कथानकाला गौण स्थान प्राप्त होते. 'घर' या कादंबरीबाबत असे झालेले दिसते परंतु पंख व पोरका मध्ये मात्र संज्ञाप्रवाही तंत्र काटेकोरपणे वापरले नसल्याने येथे कथानकालाही कानेटकरांनी महत्व दिले आहे. कानेटकरांची 'घर' ही कादंबरी १९५१ मध्ये प्रसिद्धझाली. त्यानंतर 'पंख' (१९५३) व 'पोरका' (१९५६) या कादंबऱ्या प्रकाशीत झाल्या. घर ही कादंबरी नायक रघुनाथच्या भावभावनांना केंद्रस्थानी ठेवून लिहीली गेलेली आहे. रघुनाथच्या स्वभावचित्रणाच्या माध्यमातून दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेली परिस्थिती कानेटकरांना सांगावयाची आहे. इंग्लंडमध्ये सुरु झालेली औद्योगिक क्रांती भारतात आली परिणामी मुंबईसारख्या शहरात मानवही यांत्रिक बनला. मानव जगण्यासाठी ग्रामीण भागातून विशेषत:

कोकणातून मुंबईत येऊ लागला व मुंबईत घराचा प्रश्न निर्माण झाला. नोकरी मुंबईत व बायका–मुले कोकणात आणि त्यामुळे होणारा कोंडमारा रघुनाथच्या माध्यमातून कानेटकरांनी चित्रित केला आहे.

कानेटकरांनी 'घर' कादंबरीचे 'उपोद्घात', 'पार्श्वभूमी', 'रघूनाथ' व 'उपसंहार' असे एकूण चार भाग केले आहेत. इतर कादंबऱ्यांच्या तुलनेत 'घर' ची सुरवात थोडी वेगळी आहे. 'उपोद्घात' या छोटयाशा पद्यमय प्रकरणात मानवी संस्कृती व कावळे संस्कृती यांची तुलना करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. आजच्या यंत्रयुगात मानवाचे जीवनही कावळयाप्रमाणेच झालेले आहे. कावळे ज्याप्रमाणे पोट भरण्यासाठी एखाद्या ठिकाणी जातात, तीच वेळ आज मानवावर आली आहे आणि अशा या यंत्रवत जीवनात त्याला नातेवाईकांचेही भान ठेवणे अवघड होऊन बसले आहे. आपल्या भावनेला आवर घालून त्याला कसेबसे जीवन जगावे लागते. यानंतरच्या 'पार्श्वभूमी' प्रकरणात कोकणातील रघुनाथाच्या कुटुंबाचे वर्णन येते. रघुनाथ सरदेसाई हा आपले आईवडील, बायको व तीन मुले कोकणात ठेवून मुंबईत 'मानवता' वृत्तपत्राच्या कचेरीत नोकरीला असतो. लग्न होऊन तीन मुले झाली तरी अजूनही मुंबईत त्याला कुटुंबासाठी जागा मिळालेली नसते. रघुनाथची पत्नी इंदुमती सतत त्याची वाट पाहत असते. कारण त्याला वर्ष सहा महिन्यातुन कधीतरी दोन–तीन दिवसांची रजा मिळत असे. पतीचा सहवास इंदुमतीला खूप कमी मिळत असे तसेच मुलांना व आईवडीलांनाही रघुनाथचा सहवास फारसा मिळत नसे. यामुळे यांच्या मनातील विशेषत: रघुनाथ व इंदुमती यांच्या मनातील प्रेम, भावभावना संज्ञाप्रवाहाच्या साह्याने लेखकाने प्रभावीपणे व्यक्त केल्या आहेत.

तिसरे 'रघुनाथ' हे प्रकरण सर्वात मोठे असून त्यात मुंबईतील रघुनाथच्या जीवनातील झालेल्या यांत्रिकीकरणाचे वर्णन येते. 'मानवता' कचेरीतील नोकरी, खाणावळीतील कसेकसे जगणे, दररोजची धावपळ, कोकणातील घराची तसेच पत्नी व मुलांची ओढ याचे वर्णन येथे येते. शेवटच्या 'उपसंहार' मध्ये पद्यमय उताऱ्यातून रघुनाथच्या मनातील विचार, भावना व्यक्त होतात. मुंबईत दिसलेल्या, भेटलेल्या इतर स्त्रियांचा तिटकारा त्याला येतो, घृणा येते आता त्याला त्याची पत्नी इंदुमतीशिवाय इतर स्त्रिया नको असतात. फक्त आपल्या मायेची माणसे हवी असतात. पत्नी इंदुमती, माईआण्णा व मुले ही सर्व त्याला हवी असतात. परंतु नशिबाने बांधल्या गेलेल्या या रघुनाथला हे कौटुंबिक प्रेम मिळू शकत नाही त्याच्या नशिबात फक्त मुंबई या यंत्रनगरीतील तेच कुजलेले, रखडलेले जीवन असते.

'घर' कादंबरीच्या कथानकचा विचार करता संज्ञाप्रवाहामुळे कथानकाचा धागा अनेकदा तुटतो. अनेक संदर्भसूचकत्वाचा वापर कादंबरीत झालेला दिसतो. उदा. 'स्टर्लींग' वरुन 'डार्लिंग' किंवा घुशीच्या चिरडलेल्या डोळयावरुन इंदुमतीचे रडलेले डोळे आठवणे इ. व्यावहारिक पातळीवरचा रघुनाथ व अर्धचेतन किंवा निश्चेतन पातळीवरचा रघुनाथ चित्रित करण्यासाठी लेखकाने संज्ञा प्रवाहाचा वापर केलेला दिसतो. येथे कानेटकरांनी संज्ञाप्रवाहाचा वापर केला नसता तर रघुनाथची व्यक्तिरेखा व त्याला मुंबईत 'घर' न मिळाल्यामुळे निर्माण होणारी समस्या प्रभावीपणे मांडता आली नसती.

कानेटकरांची 'पंख' ही दुसरी कादंबरी मेंदूचा विकार जडलेल्या व त्यामुळे पंखहीन आयुष्य जगणाऱ्या एका नाटयवेडया कलंदराची – पांडूमास्तरची दुर्दैवी कहाणी आहे. याही कादंबरीत संज्ञा प्रवाहाबरोबरच कथानकालाही महत्व आहे. संज्ञाप्रवाहामुळे कादंबरीत काहीशी अनाकलनीयता येते हे 'घर' कादंबरीत कानेटकरांच्या लक्षात आल्यानंतर 'पंख' मध्ये संज्ञाप्रवाहाचा वापर कमी झाल्याचे दिसते. नाटकाचे जबरदस्त वेड असलेल्या पांडूमास्तर हा 'पंख' या कादंबरीचा नायक होय. नाटकाचे नुसते वेडच नाही तर अभिनय व रंगभूषेचे काम मास्तर उत्तम रितीने करतात. परंतु दुर्दैवाने पांडूमास्तरला 'कोरिआ' नावाचा विचित्र रोग झालेला असतो. या रोगामुळे मज्जातंतूवरील ताबा ढिला होऊन अचानक रोग्याच्या चेहऱ्याची व हातापायाची वेडीवाकडी हालचाल होते. यामुळेच पांडूमास्तरच्या चांगल्या अभिनयाचा विचका होत असे. मास्तरचे छोटेसेच कुटुंब आहे. पन्ती बयो व सात–आठ वर्षांची छोटी जाई ही मुलगी. पांडूमास्तर हे गावातील लोकल बोर्डाच्या दोन नंबरच्या शाळेत ड्राइंगमास्तर होते. गावात आसपास कुठेही नाटक असेल तर मास्तर खुशाल शाळेला दांडी मारत असत. या त्यांच्या सवयीपायी अनेकदा त्यांना वरिष्ठांचे बोलणेही ऐकूण घ्यावे लागत. एक–दोनदा तर त्यांना याच कारणामुळे नोकरीतूनही तात्पुरते कमी केले होते. परंतु त्यांचे नाटकाचे वेड काही कमी होत नव्हते. या नाटकाच्या वेडापायी त्यांना जीवनात अनेक चढउतार पाहावे लागतात. आयुष्यभर नाटकाची साधना करुनही 'कोरिआ' हा जीवघेणा आजार जडलेल्या पांडूमास्तरांचे अभिनयाचे पंखच नियतीने छाटून टाकले आहेत. परंतु आपल्या मुलीच्या, जाईच्या रुपाने (म्हणजे नाटकातील तिचा उत्तम अभिनय) त्यांना कादंबरीच्या शेवटी पुन्हा एकदा नवीन पंख फुटतात. त्यांच्या मनातील अधुरे स्वप्न जाई पूर्ण करते. संपूर्ण कादंबरीभर पांडुमास्तरच्या मनातील भावभावना संज्ञाप्रवाहाच्या साह्याने कानेटकरांनी दाखवल्या आहेत. या कादंबरीत मात्र पांडुमास्तरशिवाय अन्य व्यक्तिरेखेत संज्ञाप्रवाह आलेला नाही.

'पोरका' या कानेटकरांच्या शेवटच्या कादंबरीमध्ये अनाथ महिला व अशाच अनाथ मुलांचा प्रश्न, त्यासाठी तणमनधनाने कार्य करण्याची गरज लेखकाने व्यक्त केली आहे. या कादंबरीतील 'सुमित्रा' ही अशीच आईवडीलांशिवाय दादा–माईंनी वाढवलेली अनाथ मुलगी. आयुष्यभर पोरक्यांसाठी कार्य करण्याची तिची तळमळ परंतु छब्या हा तिचाच मुलगा मात्र या तिच्या इच्छा आकांक्षावर मात्र पाणी फिरवतो. पोरक्यांसाठीचे कार्य करताना सुमित्रेला अनंत अडचणी येतात परंतु ती मात्र शेवटपर्यंत धडपड करत राहते 'दाराशी आणून टाकलेली पोर' अशी सुमित्रेची माईकडून सतत हेटाळणी होत असे. तिला मात्र अन्य पर्याय नसल्याने व प्रेमळ अशा दादांमुळे ती हे सर्व ती सहन करते. मात्र आपण दादा–माईच्या भूतदयेवर जगत आहोत ही टोचणी तिला सतत जाणवत असे. भाई दिनानाथ नावाचा कावेबाज माणूस सुमित्रेशी लग्न करतो परंतु तोही त्याच्या आर्थिक गरजेसाठी म्हणून तो नेहमीच सुमित्रेकडून पैसे उकळत राहतो व एकदा पैसे मिळाले कि, सहा–सहा महिने फिरकतही नसे. तिचा मुलगा छब्या हाही वाईट वळणाला लागतो. पर्यायाने आपल्यानंतर आपल्या मुलाने म्हणजे छब्याने आपल्यासारखेच अनाथांसाठी काम करावे ही तिची इच्छा पूर्ण होऊ शकत नाही. येथे सुमित्रेच्या मनातील विचार, भाव–भावना, दुःख इ. संज्ञाप्रवाहाच्या माध्यमातून कानेटकरांनी व्यक्त केले आहे. 'घर' कादंबरीच्या तुलनेत 'पंख' व 'पोरका' या दोन्ही कादंबऱ्यांत संज्ञाप्रवाहाचा वापर कानंटकरांनी खूपच कमी केलेला आहे. येथे अनाथ मुले व महिला यांची समस्या व त्यासाठी करावयाचे कार्य हाच विषय केंद्रस्थानी आहे. आणि म्हणून हीच भावना, तळमळ सुमित्रेच्या माध्यमातून संज्ञाप्रवाहाच्या साह्याने कानेटकरांनी व्यक्त केली आहे.

संज्ञाप्रवाही कादंबऱ्यात मनोविश्लेषनाला अधिक महत्व असते. येथे पात्रांचे मनोविश्व आणि त्याचेच मनोविश्लेषण केले जाते. पात्राच्या या मनोविश्वातून संज्ञाप्रवाह व्यक्त होतो. 'घर'मधील रघुनाथचे मनोविश्व हे संज्ञाप्रवाहाचे उत्तम उदाहरण आहे. त्याच्या मनातील इच्छा, काम भावना, वात्सल्य भावना संज्ञाप्रवाहामुळे लेखकाला दाखवणे शक्य झाले आहे. 'पंख' व 'पोरका' मध्ये मात्र 'घर' च्या तुलनेत संज्ञाप्रवाह क्वचितच डोकावतो. संज्ञाप्रवाहापेक्षाही येथे आशयाला अधिक महत्व आहे. तिनही कादंबऱ्यांना सामाजिक संदर्भ असून संज्ञाप्रवाहामुळे कुठेही अनाकलनीयता आलेली नाही.

कानेटकरांच्या कादंबऱ्याच्या तुलनेत कथांमध्ये संज्ञाप्रवाह हा प्राथमिक स्वरुपाचा, पात्रांचे मनोविश्व, त्याचे विश्लेषण अशा स्वरुपाचा दिसतो. या लेखनाला संज्ञाप्रवाह निश्चितपणे म्हणता येईल कि नाही हे सांगता येणार नाही. मात्र पात्रांच्या मनोविश्लेषणावर त्यांनी भर दिलेला दिसतो. वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षापासून कानेटकरांनी कथालेखनास सुरवात केली. त्यांच्या लेखनाची सुरवातच कथेने झाली त्यानंतर कादंबऱ्या, नाटके व इतर लेखन त्यांनी केले. 'किर्लोस्कर', 'मनोहर', 'दीपावली', 'अंजली', 'सत्यकथा', 'अभिरुची', 'यशवंत' अशा अनेक नियतकालिकांतून त्या प्रसिद्ध होत होत्या. त्यांच्या सर्वच लेखनाप्रमाणे त्यांनी कथेतही माणूस शोधण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यांच्या अनेक नाटकांची बीजे या कथांमध्ये सापडतात उदा. वेडयाचं घर उन्हात, रमाई, फक्त एकच कारण इ. कथांवर त्यांनी पुढे नाटके लिहिली.

कानेटकरांच्या एकूण एकोणचाळीस कथांचे वैद्यकीय व्यवसायाचे चित्रण करणाऱ्या कथा, स्त्री–पुरुष संबंधावरील कथा, शैक्षणिक चित्रण करणाऱ्या कथा व बालमनोविश्वाचे चित्रण करणाऱ्या कथा असे वर्गिकरण करता येते. 'वेडयाचं घर उन्हात', 'हलत्या पाण्याचा तळ', 'मनातलं चांदणं', 'एक होतं कोकरु', 'आई हवीय मला', 'नको झालेले माणूस' आदीसारख्या अनेक कथांमधून पात्रांची मानसिक आंदोलने चित्रित झालेली दिसतात. या कथांमधूनही अनेक सामाजिक प्रश्न त्यांनी हाताळलेले दिसतात. मानसिक आंदोलने कथेमधून व्यक्त करताना कथेतील कथानकापेक्षा त्यातील व्यक्तिचित्रणावर कानेटकर अधिक भर देतात. म्हणुनच या कथा पात्रांच्या स्वभावानुसार वळण घेतात. हा सूक्ष्म स्वरुपातला संज्ञाप्रवाहच असतो या संदर्भात वसंत शहाणे म्हणतात, '... मला तर वाटते की, हरिभाऊ आपटे, वा.म.जोशी, ना.सी.फडके, पु.ल.देशपांडे यांच्या अनेक कादंबऱ्यातून सखोल मनोविश्लेषणावर रेखाटन आलेले आहे. या वर्णनाला काटेकोरपणे संज्ञाप्रवाहाचे तंत्र म्हणता येणार नाही हे उघड आहे.'[६] याचा अर्थ हरिभाऊ आपटे यांच्या लेखनापासून मनोविश्लेषणावर भर दिलेला असून कानेटकरांच्या कथालेखनातही हे सूत्र सापडते.

## सारांश

Stream of Consciousness ला प्रतिशब्द म्हणून संज्ञाप्रवाह ही संकल्पना मराठी साहित्यात वापरली जाते. संज्ञाप्रवाह म्हणजे मानवी मनातील नेणिवाचे चित्रण असते. या नेणिवेतील विचार, भावना, असबध्दता यांचे चित्रण या लेखनात येत असल्याने कधीकधी त्यामुळे अनाकलनीयताही येते. परंतु त्यामुळे मानवाच्या खऱ्या मनापर्यंत

पोहचता येते आणि यातूनच कानेटकरांनी माणसाचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. या संज्ञाप्रवाहाचा वापर कानेटकरांनी 'घर', 'पंख' व 'पोरका' या कादंबऱ्यातून केला आहे. कथावाङ्.मयात मात्र असा संज्ञाप्रवाह ठळकपणे दाखवता येत नाही. येथे पात्रांच्या मनोविश्वाला कानेटकरांनी अधिक महत्व दिलेले आहे आणि यातून सत्यापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## निष्कर्ष

१. पाश्चात्य साहित्यातून आलेला संज्ञाप्रवाह मराठी साहित्यात मोजक्याच साहित्यिकांनी हाताळला आहे.
२. वसंत कानेटकरांनी त्यांच्या 'घर', 'पंख' व 'पोरका' या कादंबऱ्यात काटेकोरपणे संज्ञाप्रवाहाचे तंत्र वापरले नसून कथानकालाही महत्व दिले आहे.
३. कानेटकरांच्या कथांमध्ये पात्रांच्या मनोविश्लेषणावर भर दिल्यामुळे सूक्ष्म स्वरुपात संज्ञाप्रवाहाची बीजे दिसतात परंतु तरीही या कथांना संज्ञाप्रवाही कथा म्हणता येणार नाही.
४. कानेटकरांनी त्यांच्या नाटकांप्रमाणेच कथा व कादंबऱ्यातही मानवी मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## संदर्भ

१. बांदिवडेकर चंद्रकांत, 'आलोचना', ऑगस्ट १९६८; 'संज्ञाप्रवाह आणि कादंबरी', पृ. ९.
२. संत दु. का., 'नवसमीक्षा' काही विचारप्रवाह', (संपा. प्रा. गो. म. कुलकर्णी) मेहता प्रकाशन; १९८२, पृ. ११८.
३. शहाणे वसंत, 'प्रतिष्ठान' सप्टेंबर १९५५; 'कादंबरी आणि संज्ञाप्रवाह', पृ. १६.
४. तत्रैव पृ. १७.
५. तांबे वसंत, 'सहयाद्री', जानेवारी १९४१; 'संज्ञाप्रवाह पद्धती' पृ. ३३.
६. शहाणे वसंत, ३. नि. पृ. ६.

❖❖❖

# डॉ. संजय ढोले यांच्या विज्ञान कथा - गाव विकासाच्या प्रेरक

**प्रा. डॉ. माधव कौतिक कदम**
(पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग)
जी.टी. पाटील महाविद्यालय, नंदुरबार, महाराष्ट्र (India)
C/o १५, गोपाळ नगर, नंदुरबार ४२५४१२
ई-मेल madhavkadam69@gmail.com मोबाईल ७५८८३१८७५९

## प्रस्तावना:-

विज्ञान कथेत केवळ कल्पनांच्या भराऱ्या मारुन विज्ञान कथा आहे असे भासविणे, ग्रह, तारे, अवकाश, तबकडी, उल्कापात, अणू-रेणू, चुंबकीय शक्ती, सूर्यग्रहण, टाईम मशीन, कंम्प्युटर, यंत्रमानव यांचा केवळ उल्लेख म्हणजे "विज्ञान कथा" नव्हे. विज्ञानकथेत वैज्ञानिक संकल्पनांचा अभाव असेल, विज्ञान आणि विज्ञानाचा प्रवाह नसेल तर केवळ वैज्ञानिक शब्द वापरून विज्ञान कथा होत नसते. कारण विज्ञान कथेत एक वैज्ञानिक सत्य असते. मुलभूत विचार शास्त्र आणि ठोस असे सूत्र असते. या मुलभूत सुत्रात नेमकं काय असायला हवं, त्यात विज्ञान संकल्पना किती आहे? याचा विचार झाला पाहिजे. विज्ञान शाप की वरदान असा दुहेरी प्रश्न विचारला जातो. पण माझ्या मते विज्ञान वरदानच असले पाहिजे. डॉ. संजय ढोले यांच्या विज्ञान कथेतील विज्ञान हे वरदान ठरते. कारण त्यांनी "संकरित" या आपल्या विज्ञान कथा संग्रहातील सर्व शास्त्रज्ञ मानवी कल्याणासाठी, समाजाच्या विविध समस्यांची उकल करण्यासाठी सतत प्रयोगशाळेत रमणारे व गावाकडच्या मातीशी इमान ठेवणारे असेच चितारले आहेत. मुळात डॉ. संजय ढोले यांची गाव खेडयाशी, आपल्या मातीशी नाळ असल्याने "गाव विकासाच्या जनसामान्यांच्या कल्याणकारी" कथा त्यांनी लिहिल्या आहेत.

## संशोधनाची उद्दिष्टये:-

विज्ञानाचा वापर योग्य की अयोग्य यावर विज्ञानाचे फलित असते. विज्ञान कथेतून नेमकी कशी मांडणी झाली आहे? डॉ. ढोले यांनी आपल्या विज्ञान कथांमधून विज्ञानाचे कोणते मुलभूत शास्त्र विकसित केले आहे? त्यासाठी कोणत्या सूत्राची मांडणी केली आहे? हे या लिखाणाचे उद्दिष्ट आहे. डॉ. ढोले यांच्या कथेतील विज्ञान, आशय, वैज्ञानिक संकल्पना समजून घेतांनाच त्यांनी नव्या नव्या संशोधन विषयाची जी मांडणी केली आहे तेही समजून घेता येईल. ते स्वत: भौतिकशास्त्राचे प्राध्यापक, संशोधक असल्याने भौतिक शास्त्रातील नियम, सूत्र त्यांच्या कथेतून जाणून घेतांनाच त्यांच्या कथेची जातकुळी लक्षात घेता येईल.

## अभ्यास क्षेत्र:-

डॉ. संजय ढोले यांचे प्रतिशोध, प्रेमाचा रेणू, डिंभक, अश्मजीव, संकरित, खुजाबा, अंतराळातील मृत्यू यासारखे विज्ञानकथा संग्रह प्रसिध्द आहेत. या शिवाय राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकातून १०० पेक्षा अधिक संशोधन पेपर प्रकाशित आहेत. विज्ञान विषयावर प्लँटोन कादंबरी आहे. यातील संशोधन पेपर साठी डॉ. संजय ढोले यांचा 'संकरित' हा कथासंग्रह निवडला आहे. या संग्रहात उत्परिवर्तन, परिवर्तन, मोहीम फत्ते, कोळिष्टक, अकल्पित, संकरित, अस्तित्व, उध्वस्त, अखेर तो परतला, सॉकर, विचारवहन, दुर्गम्य अशा १२ कथांचा समावेश असून त्यांचा अभ्यास, ही अभ्यास क्षेत्राची मर्यादा आहे.

## अभ्यासपधद्धती:-

विज्ञान साहित्यात मुलभूत प्रश्न, नियम, सूत्र, वैज्ञानिक जाणिवा, तर्कशुध्दता यावर भर दिलेला असतो. म्हणूनच डॉ. ढोले यांच्या विज्ञान कथेची मांडणी, अभ्यास करतांना चिकित्सक, चिंतनशीलतेला अधिक महत्व आहे. कथांची शास्त्रीय मांडणी करतांना वर्णनात्मक व चिकित्सात्मक अभ्यासपध्दतीचा वापर केला आहे.

## विषय विवेचनः-

डॉ. संजय ढोले यांनी आपल्या सर्वच कथांमधून गाव खेडयातल्या सामान्य माणसांचे, गरीबातल्या गरीबाचे आपल्या संशोधनामुळे कल्याण होईल, त्यांची मानसिक, आर्थिक, सामाजिक उन्नती होईल असेच विज्ञान रेखाटले आहे. त्यांच्या कथांमधील सर्वच नायक खेडयातील व शेतकरी कुटुंबातून आलेले असून आपल्या संशोधनाने आंतरराष्ट्रीय किर्ती प्राप्त करणारे आहेत. म्हणून हे संशोधन शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाचे, सुखाचे असणे अशी त्यांची धडपड आहे. म्हणून विज्ञानाकडे, भाबडेपणाने न पाहता कल्याणकारी दृष्टीने पाहिले पाहिजे. डॉ. ढोले यांच्या विज्ञान कथेत 'जनुकीय' संशोधनाला विशेष महत्व असून सोबतच मुळ पेशी, स्पायडर फॉर्मींग, किरणोत्सारीता, दीपन, स्मृतीपटल, टॅनेलिंग इफेक्ट, मानवी मेंदूतील क्षीण लहरी व त्यांचा परिणाम एवढचे नव्हे तर अतिरेकी आणि त्यांच्याकडे असणारी स्फोटकं शोधून काढणारे यंत्र या सारख्या मानवाच्या विधायक जीवनासाठी आवश्यक असलेल्या संशोधन विषयांना प्राधान्य दिले आहे.

'उत्परिवर्तन' सारख्या कथेत डॉ. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रोटॉन ऐवजी न्युट्रॉन वापरून वेगवेगळया जनुकांची सरमिसळ करुन मानवासाठी उपयुक्त अशा विकाच्या जाती निर्माण करणे, वनस्पतींच्या अंतरंगात शिरुन वेगळी विश्वे शोधणे, या वनस्पतींचया प्रकाश विश्लेषण क्रियेचा अभ्यास करुन शेती व जैव उर्जेसाठी लागणाऱ्या उर्जेचा पुरवठा करणे, त्यातून गाव स्वयंप्रकाशीत व स्वंयपूर्ण करणे हा महत्वाचा शोध लावून 'उत्परिवर्तन' सारख्या कथेत जनसामान्यांच्या कल्याणकारी मार्गाचा अवलंब केला आहे. शेतकऱ्यांना या प्रयोगामुळे भरपूर उत्पन्न मिळते. भावही चांगला मिळून आर्थिक स्तर उंचावतो. तर डॉ. भोसेकरांनी परिश्रम पूर्वक वेगवेगळी यंत्रणा वापरुन, नैसर्गिकरित्या प्रकाश संश्लेषणामार्फत आंब्याच्या झाडातील ऊर्जा एकत्रीत केली. ती गावाच्या मुख्य डीपीला जोडून स्वयंप्रकाशीत व उर्जा निर्माण करणारे गाव निर्माण केले. समाजासाठी या संशोधनाचे फार मोठे योगदान होते असे आपल्या लक्षात येते. उत्परिवर्तन बरोबरच 'परिवर्तन' सारख्या कथेतून जनुकशास्त्र, क्लोनिंगशास्त्राचा अभ्यास करणारे डॉ. किरण ठाकूर व डॉ. रमाकांत कोचरे हे के. राजन यांच्या निकामी झालेल्या हृदयाच्या जागी पेशी अथवा उतींचे रोपण करण्याऐवजी त्याच्याच हृदयातील चांगल्या पेशी शोधून त्यांचे संवर्धन करतात. व त्यांचे अवयवात पुनरुज्जीवन करुन हृदय निकामी झालेल्या हृदयाच्या जागी रोपण करुन राजन ला जीवनदान देतात. राजन सारख्या गुन्हेगार प्रवृत्तीच्या माणसाला जीवनदान मिळाल्याने विज्ञानाचे महत्व कळते. व तो अशा प्रयोगासाठी आणि विज्ञानाचा प्रचार-प्रसारासाठी १० अब्ज रुपये देऊ करतो. यातच विधायक विज्ञानाचे सामर्थ्य लपलेलं आहे असं मला वाटते.

'मोहीमफत्ते' सारख्या कथेतून बॉम्बस्फोटामुळे व अतिरेक्यांच्या कारवाईमुळे लाखो निरपराध लोकं मारले जातात. त्यामुळे अशी स्फोटकं ज्याच्याकडे आहेत नेमका त्याचाच शोध घेऊन ही जीवीत व आर्थिक हानी वाचविता येते. त्यासाठी डॉ. सुखलाल साळवे सारख्या शास्त्रज्ञाच्या माध्यमातून रेडीओ लहरींचा वापर करुन स्फोटकं ज्या व्यक्तीच्या हातात आहेत. त्याची "ग्लोबल पोझिशिनींग सिस्टम" द्वारे घरबसल्या माहिती मिळविण्याचे तंत्र विकसित केले. याद्वारे जहाल अतिरेक्यांकडील स्फोटकं सापडवून निरपराधांचे प्राण वाचविण्याचे हे संशोधन अत्यंत महत्वाचे ठरले आहे. तर "कोळिष्टकं" सारख्या कथेतूनही उत्परिवर्तन कथेचाच विषय घेऊन "डॉ. शरणकुमार मगरेंच्या माध्मयातून "पिकांवरील कीड रोखण्यासाठी कोळयांची उत्पत्ती व जाळयांचे निर्माण" हे संशोधन करुन शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर वाढविण्याचा प्रयत्न करतात. ज्या संशोधनावर कोटयावधी रुपये खर्च होतात ते संशोधन माणसाच्या विकासाचे नसेल? समाजाचे मुळे प्रश्न सोडविणारे नसेल? मुलभूत प्रश्नांची उकल करणारे नसेल? तर ते संशोधन काय कामाचं? म्हणूनच डॉ. मगर शेतीवर जिवापाड मेहनत करणाऱ्या लोकांसाठी काहीतरी केलं पाहिजे असं वाटून जनुकातील फेरफार करुन मवाळ जातीचे कोळी निर्माण करतात. ज्यामुळे पिकांवरील किड नाहीशी होऊन पिकांना संरक्षण मिळून दरडोई उत्पन्नात भर पडते. हा प्रयोग म्हणजे कृषी क्षेत्रातील क्रांतीच होती. पण निसर्गशक्ती आडवी येते आणि मवाळ कोळयांपेक्षा वाईट गुणसूत्र असलेल्या कोळयांची संख्या वाढून शेवटी संशोधनच धोक्यात येते. अशावेळी डॉ. मगरे यांनी सारं शेतचं जाळून या हिंसक कोळयांना नष्ट करुन संभाव्य संकट टाळून शेतकरी हिताचा निर्णय घेतात.

'अकल्पित' सारख्या कथेतून डॉ. संजय ढोले "मिनल घोडके" च्या माध्यमातून शारीरिक संबंधाविना प्रेग्नेंट राहिलेल्या मिनलला आपल्याच उदरातील गर्भपेशींशी झालेल्या स्त्रीयुग्मकाचे क्लोलिंग अर्थात

'स्वयंक्लोनिंग' होऊन गर्भधारणा झाल्याचे नमूद करतात. रहस्ये ही रहस्येच असतात आणि निसर्गातील रहस्य सहज मिळणं सोपं नाही असचं या कथेतून सूचीत केलं आहे.

'संकरित' सारख्या कथेत संकरित बी-बियाणे सारखे स्त्री बीजे व पुरुष बीजे तयार करुन विकणाऱ्या डॉ. पंडीतराव देशमुख देशाशी गद्दारी करतो, सीबीआय ला माहिती पडताच स्वत:चीच संकरीत रुपे तयार करुन सुटका करुन घेतो. हे वैज्ञानिक सूत्र ते स्वत:साठीच वापरतात. आपल्या अशा संशोधनाने अतिरेकी संघटनांना क्रूर, उलटया काळजाच्या, भावनाशून्य स्त्री व पुरुष बीजे पुरवून देशाशी बेईमानी होऊ शकते... देशाला यापासून फार मोठा धोका निर्माण होऊ शकतो. तेव्हा हे शास्त्र आणि संशोधन घातक आहे अशी भितीही डॉ. ढोले आपल्या या कथेतून व्यक्त करतात. 'अस्तित्व' सारख्या कथेतून अपघातात मेंदू मज्जासंस्था व स्नायूमध्ये बिघाड झाल्याने लुळा, दुर्बल व स्मृती हरवण्या सारखा होतो. या कथेतील नायक 'केतन' वर मेंदूत उठणाऱ्या तरंगावर आधारीत व त्याला प्रतिसाद देणारी मानवी मेंदूतच तीचं रोपण करुन रुग्ण स्वत:च मुलभूत गरजांपासून सर्व प्रकारची कामे यंत्र मानवाकडून करुन घेईल, जेणेकरुन अशा परिस्थितीतील दुर्बल रुग्ण स्वावलंबी होतील आणि आपले आयुष्य सुखाने जगतील अशा संशोधनाची मांडणी करतात. पण कोणतेही संशोधन १००% निर्दोष असेलच याची प्राप्त परिस्थितीत खात्री देता येत नाही. म्हणूनच आबालवृध्दांना उपयुक्त ठरणाऱ्या या संशोधनात माणसाला वैयक्तिक विचार स्वातंत्र्य असतं आणि तो जो विचार करेल तोच यंत्र मानव अंमलात आणेल. एखाद्या वेळीस रुग्ण निराशेत गेला तर नुकसान होऊ शकतं हा विचारच संशोधक विसरल्याने संशोधनाची प्रतिकुलता निर्माण होऊ शकते. असा इशाराही डॉ. ढोले आपल्या कथेतून देतात. 'उध्वस्त' कथेत विविध रसायनांच्या मिश्रणातून स्वत:ला अदृश्य होता येतं व इतर प्रवृत्तींचा, खलमाणसांचा थोडक्यात अतिरेक्यांचा नायनाट करता येऊ शकतो. 'अखेर तो परतला' सारख्या कथेतून ज्यांच्या स्मृती गेल्या आहेत, आयुष्यातून जो बाद झाला आहे अशा मानवाला स्मृती पटलांच्या आधारे आपले आयुष्य जगता येऊ शकते, 'सॉकर' सारख्या कथेत माकडाची व कोळयाची जनुकं वापरून जन्माला घातलेला बाळ (प्रतिक) फुटबॉलसाठी रोल मॉडेल होऊ शकला. भारताला जगज्जेता करु शकला. एका बिघडलेल्या स्त्री व पुरुष बिजांडात रेडीएशन तंत्राने बदल घडवून असा बाळ जन्माला घालता येऊ शकतो. 'विचारवहन' सारख्या कथेतून अतिसुक्ष्म इलेक्ट्रानिक्स सारणीद्वारे दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखता येऊ शकतात, स्वत:चा मृत्यू सुध्दा वाचवू शकतो. तर 'दुर्गम्य' सारख्या कथेतून मानवाच्या त्वचेच पृथक्करण केल्यास स्वभाव गुणदोष व गुणधर्मांचा अभ्यास करुन निष्कर्ष काढता येतो. यासारखी संशोधने डॉ. संजय ढोले यांनी आपल्या कथांमधून मांडली आहेत. या सगळया विषयांची विधायक भूमिका लक्षात घेतली तर हे सर्व विषय सर्व सामान्यांच्या हिताचे आणि कल्याणाचे आहेत हे लक्षात येते.

## निष्कर्ष:-

१) डॉ. ढोले यांच्या कथा भाबडेपणाने नव्हे तर डोळसपणे विज्ञानाकडे पाहतात.

२) डॉ. ढोले यांच्या कथा सर्वसामान्यांच्या विकासाला पूरक व चालना देणाऱ्या आहेत.

३) डॉ. ढोले यांच्या कथा मानव्याचा ध्यास घेतात.

४) डॉ. ढोले यांच्या कथा दहशतवादी कारवाया नियंत्रणात आणता येऊ शकतात असं सूत्र मांडतात.

५) डॉ. ढोले यांच्या कथा निसर्गाचं वर्चस्व आणि विज्ञानाच्या मर्यादा मान्य करतात.

## संदर्भग्रंथ:-

१) संकरित- प्रस्तावना, प्रा. डॉ. नागनाथ कोत्तापल्ली, मल्ली कुलगुरु डॉ. बा.आ. म.वि. औरंगाबाद

२) संकरित- डॉ. संजय ढोले, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, प्रथामावृत्ती नोव्हे.२०१५

❖❖❖

# पश्चिम विदर्भातील स्वदेशी आंदोलन

डॉ. प्रदिप शा. ढोले
इतिहास विभाग प्रमुख
स्व. पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय
वरूड, जि. अमरावती, महाराष्ट्र (India)
ई मेल – drpradeepdhole@gmail.com मो.नं. ९४२३६०९८५०

स्वदेशी आंदोलनाला भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात अनन्यसाधारण महत्व आहे कारण या आंदोलनाने भारतीय स्वांतत्र्य आंदोलन अधिक गतिशिल व व्यापक करण्यात महत्वपूर्ण भूमिका पार पाडली होती. स्वदेशी म्हणजे आपल्या देशातील. या आंदोलनाच्या माध्यमातून इंग्लंडमध्ये बनलेल्या मालाचा बहिष्कार करणे व भारतात उत्पादीत होणाऱ्या मालाचा अधिकाअधिक वापर करून साम्राज्यवादी ब्रिटनला (इंग्लंडला) आर्थिक नुकसान करणे तसेच भारतीयांकरिता रोजगार उपलब्ध करून ब्रिटिश सत्तेला भारतातून उखडून संपूर्ण भारताच्या अर्थव्यवस्थेचा विकास घडवून आणणे हा होता.

भारतात स्वदेशीचा पहिला नारा बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी इ.सन. १८७२ मध्ये दिला होता यानंतर भोलानाथ चंद्र यांनी १८७४ मध्ये त्याचा पुर्नउच्चार केला. अरविंद घोष, रविंद्रनाथ ठाकूर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, लालालजपतराय हे तर स्वदेशी आंदोलनाचे प्रमुख पुरस्कर्ते होते.

वाराणसी येथे १९०५ मध्ये कॉंग्रेसचे एकविसावे अधिवेशन भरले. या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. गोपाळकृष्ण गोखले होते. त्यांनी ब्रिटिश मालावर बहिष्कार टाकण्याची घोषणा करताच पं.मदनमोहन मालवीय यांनी ब्रिटिश मालाच्याबहिष्काराचा ठराव मांडला त्याला लाल लजपतराय यांनी अनुमोदन दिले. याच अधिवेशनात पश्चिमविदर्भाच्या दादासाहेब खापर्डे यांनी स्वदेशीचा ठराव मांडला होता व डॉ. मुंजेनी त्याचे अनुमोदन केले होते. विदेशी मालावर बहिष्कार व स्वदेशी चळवळीची सुरूवात हे या अधिवेशनाचे वैशिष्ट मानले पाहिजे. दुसऱ्या अर्थाने या अधिवेशनापासून देशात स्वदेशी आंदोलनाची सर्वप्रथम बंगालमध्ये प्रचिती आली. शिवाय कर्झनच्या बंगाल फाळणीचाही परिणाम होऊन लोकांनी इंग्रजी मालाच्या होळया पेटवून स्वदेशीचा पुरस्कार केलेला दिसुन येतो. या अधिवेशनात बरेच वक्ते स्फोटक बोलले पण पंजाबचे लाला लजपतराय व पश्चिम विदर्भाचे दादासाहेब खापर्डे या दोन वक्त्यांची भाषणे अधिक स्फोटक म्हणुन गाजली. अमरावतीचे राव बहादुर आर.एन. मुधोळकर हे या अधिवेशनाचे सेक्रेटरी होते.[१]

बंगालच्या फाळणीविरुद्ध लोकमान्य टिळकांनी आपल्या केसरी वृत्तपत्रातून अनेक लेख प्रकाशित करून जनमत जागृत केले. शिवाय साठ हजार लोकांच्या सहयांचा एक अर्ज ब्रिटिश पार्लमेंटकडे पाठवून बंगालची फाळणी रद्द करण्याची मागणीही केली. परंतू ब्रिटिश सरकार फाळणी रद्द करण्यास तयार नव्हते. म्हणुन टिळकांनी स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य या चतु:सुत्री चा पूरस्कार करून चळवळ गतिशील केली.महाराष्ट्र, बंगाल आणि पंजाब प्रांतात या चळवळीचा अधिक प्रभाव होता. विदर्भातील जनतेनेसुध्दा या चळवळीत सक्रियतेने भाग घेतला होता.त्याची सुरूवात सर्वप्रथम नागपूरातून झालेली दिसून येते.[२]स्वदेशी आंदोलन देशात सुरू होण्याच्या एक दशकापूर्वीच पश्चिम विदर्भाच्या मेहकरमध्ये सन १८९६ साली स्वदेशी आंदोलनाची मुहूर्तमेढ रोवल्या गेल्याची बातमी त्याकाळी अकोल्याहून निघणाऱ्या वऱ्हाड समाचार या वृत्तपत्रामध्ये दि. १३/०२/१८९६ रोजीच्याअंकात गत महाशिवरात्रीच्या दिवशी श्री.शारंगधर बालाजी मंदिरामध्ये लोकांची एक विशाल सभा आयोजित झाली होती. सभेच्या आयोजनाचे श्रेय राजश्री शिवरामसा तुकासा सावजी यांचे आहे. अध्यक्षपदी रा.रा. केशव वासुदेव सोमण विराजमान झाल्यावर साहू राजश्री शिवरामसा यांनी सभेचा उद्देश सांगितला. जकात (चुंगीकराच्या) बिलाच्या कारणांमुळे राणीसाहेबांचे व अध्यादेश व अभिवचन तोडले जात आहे. वीस नंबराच्या खालील सुतावर वकापडावर पुर्वी कर नव्हता. आता लावला आहे.हा फार मोठा अन्याय आहे. आम्ही विलायतेचे नाव घेणे सोडून देऊ. आम्ही स्वदेशी कापड व स्वदेशी वस्तू वापरू. आर्य नावाचा अभिमान ठेवू आणि इश्वराला साक्षी ठेऊन शपथ घेऊ की स्वदेशी कापडच वापरू. विलायती कापड वापरणार नाही.[३] अशी बातमी प्रकाशित झाली होती.

या बातमीवरून मेहकरवासियांच्या मनातील स्वदेशींचे प्रेम स्पष्ट दिसून येते. शिवाय स्वदेशी आंदोनलापूर्वी अमरावतीच्या श्री वासूदेवराव खोत यांनी स्वदेशी दुकान चालविले होते. खोत यांनी आपल्या मित्रांबरोबर अमरावती स्वदेशी कल्याण चे उदयोग सुरू केले होते.

अमरावती जिल्हा व स्वदेशी आंदोलन :—अमरावती जिल्हयाचे स्वदेशी आंदोलनात विशेष योगदान आहे. बंगालच्या फाळणीची घोषणा झाल्यानंतर अरविंद घोष यांनी सर्वत्र दौरे काढले. वंगभंग चळवळीला जिल्हयातून पाठिंबा मिळावा म्हणून अरविंद घोष यांनी दि. २८ जानेवारी १९०८ रोजी अमरावतीला भेट देऊन जिल्हयाचा दौरा केला होता. अमरावतीच्या तरूणांनी त्यांची शहरातून भव्य मिरवणुक काढली होती. त्यानंतर 'इंद्रभुनव थिएटर' मध्ये अरविंद घोष यांचे जाहीर भाषण झाले. त्यांनी या सभेत जनतेने वंगभंगाच्या चळवळीला पाठिबा द्यावा असे आहवान केले. अमरावती जिल्हयात एक तरूण क्रांतीकारक स्वामी शिवानंद या टोपण नावाने राष्ट्रीय कार्य करत होते. ते कवी आणि गायक होते. त्यांनी स्वदेशी आंदोलनावर काव्य लिहून ते प्रकाशित केले. याबद्दल त्यांना १९०७ साली सात वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. दादासाहेब खापर्डे यांनी स्वदेशी आंदोलन तीव्र करण्यासाठी अमरावती केंद्र निवडले.[४] राजकिय व स्वातंत्र्याच्या क्षेत्रातील पश्चिम विदर्भातील प्रथम महिला क्रांतिकारक यशोदाबाई जोशी यांनी १९०५ पासून स्वदेशी चळवळीला प्रारंभ केला होता.[५]

अमरावतीच्या विद्यार्थ्यांनी वंगभंगाचा निषेध करण्यासाठी अमरावतीच्या जोग चौकामध्ये एक विशाल सभेचे आयोजन केले होते. या सभेमध्ये वंगभंगाचा निषेध व विदेशी वस्तूंवर बहिष्कार हे दोन ठराव पास करण्यात आले. पण दुसऱ्या दिवशी मुख्याध्यापकांनी बोर्डिंगमधील जे विद्यार्थी या सभेला उपस्थित होते. त्यांना छडया मारल्या. या विद्यार्थ्यांपैकी एकाचे नाव जनार्दन हरीभाऊ चांदोरकर हे होते. ते कट्टर देशभक्त होते. चांदोरकर यांनी छडी मारण्याचा निषेध करण्यासाठी हॉस्टेलमध्ये अन्नपाणी ग्रहण न करण्याचा दृढ निश्चय केला. त्यांना फॉरेस्ट कन्झरव्हेटर बल्लाळ आणि दवण्डे नावच्या पोलीस कॉन्स्टेबल यांनी या निर्णयापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण चांदोरकर आपल्या संकल्पापासून ढळले नाहीत. चांदोरकरची राष्ट्रभक्ती पाहून हे दोघेही प्रभावित झाले. या दोघांनी दादासाहेब खापर्डे यांच्याशी विचारविनिमय करून 'राष्ट्रीय शाळे' ची स्थापना केली होती.[६]

अकोला जिल्हा व स्वदेशी आंदोलन :—बंगालच्या फाळणीचे पडसाद अकोला जिल्हात सुध्दा उमटले. स्वदेशी आंदोलनाच्या प्रचारासाठी लोकमान्य टिळकांनी पूर्ण देश व महाराष्ट्राप्रमाणे पश्चिम विदर्भातही दौरे सुरू केले. इ.स. १९०८ मध्ये लोकमान्य टिळक अकोल्यात आले होते. त्यांची अकोल्यात तीन दिवस जाहिर व्याख्याने झालीत. टिळकांच्या ओजस्वी भाषणांनी अकोला शहर तसेच जिल्हयात देशाभिमानाची भावना जागृत होऊन जिल्हयात तरूणांची मडळे स्थापन केलीत. या मंडळानी गणेशोत्सव व शिवाजी उत्सव यासारखे कार्यक्रम घेणे सुरू केले. जिल्हयात अकोला, वाशिम, कारंजा, अकोट तसेच इतर ठिकाणी तरूणांनी व्यायामशाळा व आखाडे सुरू केले. यातूनच देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लढण्याकरिता जागृत तरूण वर्ग निर्माण झाला. लोकांमध्ये देशभक्ती जागृत व्हावी म्हणून देशभक्तीपर नाटके व विविध कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. परशुराम चिंतामन, मारोती सावजी व मामा जोगळेकर यांनी जिल्हयात जनजागृती केली.[७]

शिवजयंती उत्सवानिमित्त दिनांक २ मे १९०८ रोजी अकोल्याला रेल्वेस्टेशनवर लोकमान्य टिळकांचे आगमन होताच हजारे शेतकरी व सामान्य जनतेने त्यांचे स्वागत केले. राजेश्वर मंदिराच्या पटांगणात लोकमान्य टिळकांच्या जाहीर भाषणासाठी अकोला व जिल्हयाच्या इतर भागातून आलेले दहा हजार पेक्षाही जास्त लोक उपस्थित होते. अकोल्याच्या इतिहासातील ही सर्वात मोठी जाहीर सभा होती. या सभेलास्त्रियासुध्दा मोठया संख्येने उपस्थित होत्या. लोकमान्य टिळकांनी "स्वराज्य हाच माझा जन्मसिध्द हक्क आहे" ही संपुर्ण देशात प्रसिध्द झालेली घोषणा या सभेत दिली. सभेला शेगावचे महान संत श्री गजानन महाराज हे सुध्दा उपस्थित होते. लोकमान्य टिळकांनी भाषणाला सुरूवात करताच सगळीकडे निशब्द शांतता पसरली. टिळकांनी एक—दिड तास भाषण दिले.[८] अमरावतीचे श्री. दादासाहेब खापर्डे वकील हे लोकमान्य ठिळकांचे पश्चिम विदर्भातीलअत्यंत जवळचे सहकारी होते. त्यांनी संपुर्ण पश्चिम विदर्भात फिरून लोकमान्यांचे दौरे आयोजीत केले. अकोला येथे दि.२,३ व ४मे १९०८ रोजी शिवजयंतीच्या निमित्ताने लोकान्य टिळकांची तीन भाषणे झालीत.

स्वदेशी आंदोलनाच्या काळात अकोला जिल्हयातील मंगरूळ, वाशिम व कारंजा येथे परदेशी कापडाच्या होळया करण्यात आल्या. १९०८ साली मंगरूळ व कारंजा येथील सात तरूणांना राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आल्यामुळे हे सात तरूण अकोला जिल्हयातील पहिले स्वातंत्र्यवीर ठरले.१) बाळकृष्ण श्रीकृष्ण सांगोळे रा. मंगरूळ, शिक्षा ९ महिने सक्त मजुरी व २महिने अंधारकोठडी.२) श्रीराम केशव रा.मंगरूळशिक्षा ६ महिने सक्त मजुरी व १ महिना अंधारकोठडी.३) धोंडू अंबादास रा. कारंजा लाडशिक्षा ६ महिने सक्त मजुरी व १महिना अंधारकोठडी. ४) नारायण गोपाळ रा. मंगरूळशिक्षा ६ महिने सक्त मजुरी व १ महिना अंधारकोठडी. ५) त्र्यंबक सदाशिव रा. मंगरूळशिक्षा ६ महिने सक्त मजुरी ६) नरेन्द्रनाथ उर्फ रामकृष्ण सखाराम, शिक्षक, रा. कारंजा लाड शिक्षा ६ महिने सक्त मजुरी ७) अनंत पांडुरंग राजे रा. अकोला शिक्षा २ वर्षे

अकोला जिल्हयात स्वदेशी आंदोलनाला चांगला प्रतिसाद मिळाला. स्वदेशीचा अवलंब व परदेशी कापड बहिष्काराच्या चळवळीस जोमाने प्रारंभ झाला. मंगरूळ, वाशिम, व कारंजा येथे काही देशभक्त तरूणांनी स्वदेशी वस्तू भांडारे व कापड दुकाने सुरू केली. शिवाय या देशभक्त तरूणांनी परदेशी कापडाच्या होळयासुध्दा केल्या म्हणुन इंग्रज सरकारच्या दडपशाहीला हे तरूण बळी पडले.स्वदेशी आंदोलनाच्या काळात अकोला जिल्हयातील मोरेश्वर गोविंद पुरोहित या तरूणाने पुर्ण जिल्हयाचा दौरा करूण 'स्वदेशीचा वापर करा' व 'परदेशी मालावर बहिष्कार घाला' अशा घोषणा दिल्या. त्याकाळी भगवा पोषाख घातलेला हा तरूण संन्याशी स्वातत्र्यवीर अकोला जिल्हयातील एक कौतुकाचा विषय ठरला होता.अकोला जिल्हयात लोकमान्य टिळकांच्या अनुयायांचा एक मोठा गट होता. या गटाचे नेतृत्व परशराम चिंतामन ऊर्फ मामा जोगळेकर, गोपाळराव चितळे, बापुसाहेब फडके, बापट, गुणवंत सप्रे यासारख्या उत्साही तरूणांकडे होते. लोकमान्य टिळकांनी सभेत मद्यपानाचा निषेध केल्यामुळे त्याचा परिणाम कलाली दुकानांवर झाला होता.

अकोला जिल्हयातील विद्यार्थ्यांनी सुध्दा स्वदेशी आंदोलनामध्ये सक्रीय सहभाग घेतला होता. अकोला शहरातील एक सुप्रसिध्द वकील हरिभाऊ चांदूरकर हे त्यावेळी अमरावतीच्या सरकारी बोर्डींगमध्ये राहत होते. त्यांनाही या आंदोलनात वेताचा मार खावा लागला. चांदुरकर प्रमाणेच अनेक तरूणांनी या स्वदेशी आंदोलनात उत्साहाने भाग घेतला होता.

## बुलढाणा जिल्हा व स्वदेशी आंदोलन :—

इ.स. १९०८ मध्ये लोकमान्य टिळकांच्या पश्चिम विदर्भ दौऱ्यात बुलढाणा जिल्हयातील खामगाव, मेहकर, चिखली, शेगाव या शहरातील जनतेला लोकमान्य टिळकांचे भाषण ऐकण्याचे भाग्य लाभले.[९] बुलढाण्याचे एक अत्यंत सधन शेतकरी श्री. विष्णू सावजी यांनी लोकमान्य टिळकांचे त्यांच्या घरी आदरातिथ्य केले. याआधी विष्णु सावजी यांच्यावर ब्रिटिश शासनाची कृपा होती पण लोकमान्य टिळकांना साथ दिल्याने शासनाने त्यांना या घटनेबद्दल जाब विचारला. सावजी यांनी सुध्दा बिंटिश शासनाने दिलेली पदवी परत केली. लोकमान्य टिळकांच्या प्रभावाने बुलढाण्याचे श्री. या.मा. काळे, श्री. कानिटकर व श्री. गर्दे, मलकापूरचे श्री. पिंपळकर, मेहकरचे श्री. दादासाहेब सोमण, खामगावचे डॉ. पारसनीस यांनी जिल्हयात जनजागृतीचे कार्य केले होते.

यवतमाळ जिल्हा व स्वदेशी आंदोलन

यवतमाळ जिल्हयाने स्वदेशी आंदोलनात उल्लेखनीय योगदान दिले. यवतमाळ जिल्हयातील स्वातंत्र्यवीर श्री. बाबासाहेब परांजपे यांनी वंगभंगाचा निषेध करण्याकरीता यवतमाळमध्ये मिरवणूक काढली होती. 'चौतीस कलम' या मैदानावर या मिरवणुकीचे एका सभेत रूपांतर झाले. सभेमध्ये विलायती कापडाची होळी करण्यात आली. त्यानंतर पश्चिम विदर्भाचे स्वातंत्र्यवीर श्री. खानखोजे व तपस्वी परांजपे यांनी वंगभंगाचा निषेध करतांना जहाल भाषणे केलीत.

पश्चिम विदर्भात राष्ट्रीय चळवळीने जोर धरताच यवतमाळचे 'विद्यागृह' व 'हरिकिशोर पत्र' हे दोन वृत्तपत्र ब्रिटिश सरकारच्या दडपशाहीचे बळी ठरले. या वृत्तपत्राचे संपादक श्री. पृथ्वीगीर यांना राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक होऊन त्यांना दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षाझाली. त्यांच्या अटकेनंतर या वृत्तपत्राचे संपादक बनलेले श्री. नरहर भावे यांनाही त्यांच्या लिखाणाबद्दल दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली होती.

यवतमाळमधील पृथ्वीगीर गोसावी व भावे यांना अटक झाल्यानंतर यवतमाळ शहरात जहाल गटापैकी बाबासाहेब परांजपे, श्यामराव दादा देशपांडे, गणपतराव माळी, गोपाळराव टांगो, मारोतराव जामनकर, दत्तोपंत काणे, कृष्णाजी लक्ष्मण पेशवे, दादासाहेब काठेकर श्री. टिकले ही मंडळी उरली होती. या नेत्यांनी स्वदेशी आंदोलनाच्या जहाल तत्वज्ञानाचा आणि कार्यक्रमाचा जोमात प्रचार सुरू केला. तपस्वी बाबासाहेब परांजपे यांनी अनेक तरूणांना देशसेवा व सार्वजनिक कार्याकडे वळविले. श्री. दादा काणे यांनी मिळत असलेली तहसिलदाराची नोकरी नाकारली. त्यांनी पुर्ण जिवनभर देशसेवा करण्याचा निश्चय केला होता. पोलीसांची या जहाल नेत्यांवर सतत पाळत असल्यामुळे त्यांनी 'आटयापाटया क्लब' ची स्थापना केली. यामुळे एकमेकांशी सल्लमसलत करण्याचे त्यांचे काम सातत्याने चालूच राहिले.[१०]

स्वदेशी आंदोलनाचा प्रचार युवकामध्ये व्हावा म्हणुन आटयापाटया या खेळाचा एक क्लब स्थापन करण्यात आला होता. राष्ट्रीय विचारांचा प्रभाव असलेले पापासाहेब, शामराव दादा यांनी या क्लबची स्थापना केली होती. या क्लबमध्ये खेळ संपल्यानंतर लोकमान्य टिळकांच्या केसरी या वर्तमानपत्रातील राष्ट्रीय विचारांवर चर्चा होत असे. ही

चर्चा ऐकण्यासाठी इतरही खुप लोक जमा होत असत. क्रांतीकारी तपस्वी परांजपे यांनी जहाल विचारांचा अनुयायीवर्ग वाढविण्यासाठी हा उपक्रम सुरू केला होता.

बाबासाहेब परांजपे यांच्यावर लोकमान्य टिळकांच्या जहालवादी विचारांचा प्रभाव होता. परांजपे यांच्या प्रेरणेने यवतमाळ येथे पापासाहेब यांनी स्वदेशीचे दुकान चालविले. 'हरिकिशोर' या राष्ट्रीय विचारांच्या वृत्तपत्राचे ते संपादक होते. तपस्वी परांजपे यांनी यवतमाळ शहरात तसेच जिल्हयातील इतर गावोगावी जावून स्वदेशीचा प्रचार व प्रसार करणारे स्वयंसेवक तयार करण्याचा प्रयत्न केला. या स्वदेशी आंदोलनापासून प्रेरणा घेऊन मामाभाई या खोजाने स्वदेशी वस्तूंचे एक दुकान यवतमाळात उघडले. या स्वदेशी वस्तूंच्या दुकानात साबण, कपडे, पेन्सील, कागद, छत्र्या, बटण,मेणबत्त्या, कुलुप, चाकू इ. स्वदेशी वस्तू विकल्या जात असत. सांबशिव नारायण कळमकर यांनी त्यात भांडवल टाकून स्वदेशीचे दुकान आणखी मोठे केल होते.

निष्कर्ष :– पश्चिम विदर्भातील स्वदेशी आंदोलन हे भारतीय स्वातंत्र्य आंदोलन अधिक गतिशिल व व्यापार करण्यात मोठे सहाय्यभूत ठरले. दादासाहेब खापर्डे, आर. एन. मुधोळकर तसेच लोकमान्य टिळकांच्या दौऱ्यांमुळे या आंदोलनाने पश्चिम विदर्भात प्रचंड जनजागृती घडवून आणली. आंदोलनाकरिता पैशाची गरज पूर्ण करण्यासाठी पैसा फंड सुरू करण्यात आला. मोठया प्रमाणात विदेशी कापड तसेच मालाची होळी करण्यात आली. या आंदोलनामुळेच पश्चिम विदर्भात लिफाफे, साबू, काळया कांबळीच्या टोप्या,विणकरांनी विणलेले हातमागाचे कापड आदि वस्तू निर्माण होऊ लागल्या. राष्ट्रीय शाळा, विद्यालयांची स्थापना, विद्यार्थी संघटना, उभ्या होऊनब्रिटिश शासनाच्या कायदयांचा निषेध सुरू झाल्याने स्वातंत्र्य आंदोलन अधिक तीव्र होत गेले. पश्चिम विदर्भातील जनतेच्या मनातील ब्रिटिश सत्तेबद्दलची भिती दुर करण्यात स्वदेशी आंदोलनाने मोठे हातभार लावण्याचे दिसून येते.

## संदर्भ सूची :–

१) शनिवारे, गो.सी.– कथा कॉंग्रेसची गाथा स्वातत्र्याची, पृ. ५०
२) कानेटकर, मा.ज.– कॉंगेस सुवर्ण जुबिली, नागपूर प्रांताचा इतिहास,१९३५, पृ. २६
३) कोलारकर, डॉ.श. गो. –आधुनिक विदर्भाचा इतिहास,२००३, पृ. ३२
४) वक्कानी डॉ. नि.आ.– आधुनिक विदर्भाचा इतिहास,२००३, पृ. १३,१४
५) पाठक डॉ.सौ. दमयंती–वैदर्भिय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील योगदान२००३, पृ. २५३
६) वाघमारे डॉ. बि.आर. –अमरावती जिल्हयातील स्वातंत्र्य आंदोलन २०१८, पृ. ५७
७) वक्कानी डॉ. नि.आ. –उपरोक्त पृ. १३,१४
८) ओक, के.य.–स्मृतीच्या मशाली १९८६ पृ. १९
९) देशपांडे, अच्युतराव. केशवराव–– अमरावती जिल्हयातील स्वातंत्र्य लढा पृ. ११,१५,१६
१०) कोलारकर, डॉ.श. गो. –उपरोक्त,२००३, पृ. ३२,३३

❖❖❖

# लोक साहित्य : लोकवाङ्मय उखाणे

प्रा. रेखा व्ही. इंगोले
मराठी विभाग प्रमुख
मा.सु.पा.कला, विज्ञान व कै.पां.ठा. वाणिज्य महाविद्यालय
मानोरा, जि. वाशिम, महाराष्ट्र (India)
e-mail ID – rekhaingole09@gmail.com मो.नं. ९४०४५४७२७१

## प्रस्तावना :

लोक साहित्यामध्ये लोक समूहाच्या पारंपारिक जीवनाचा अविष्कार झालेला असतो. लोक साहित्य हे आदिमानव निर्मित असून त्याची मालकी समूहाची असते. लोक साहित्याचे प्रचलन एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत होत असते. लोक साहित्य हा लोक संस्कृतीचा एक पैलू असतो. लोक साहित्य म्हणजे लोकजीवनाचा इतिहास असेही म्हणता येते. लोक साहित्य हे कला आणि वाङमय यांचे स्त्रोत असते लोक साहित्य ही समाजाची अभिव्यक्ती असते. समाजमनाचे विविध पैलू त्यामध्ये पहावयास मिळतात.

लोक वाङमयात उखाणा हे एक मौल्यवान लेणे आहेत. लोक वाङमयातील उखाण्यांचे हे दालन वेगळे पण आगळे आहे. उखाण्याचा प्रकार फार प्राचीन काळापासून परंपरेने चालत आला असून त्यात नेहमीच नविन अशी भर पडत आलेली आहे. रामायण, महाभारतात उखाणे घालण्याच्या पध्दतीचा धागा आपणास सापडतो. उखाणा कधी भव्य दिव्य विचार बोलून दाखवितो तर कधी थट्टामस्करी, मिस्कील विनोद करुन गालावर खळी पाडतो, तर कधी ऐकणाऱ्या व्यक्तीला कोड्यात टाकतो. अशा या उखाण्याचा उद्देश असतो, मनोरंजनातून ज्ञान.

## उखाण्याला पर्यायी शब्द :

उखाणा या शब्दाला भारतात अनेक पर्यायी शब्द उपलब्ध आहेत. कुट, प्रहेलिका, कोडे, प्रश्न, ब्रम्होस्त्र मायना असेही प्रचलीत शब्द उखाणा या प्रकारांसाठी उपयोगात आणले जातात. हिंदीत उखाण्याला पहेली म्हणतात, तर सिंध्दी भाषेत उखाणी हा शब्द प्रचलीत आहे.

## उखाण्याचे प्रकार :

उखाणे प्रामुख्याने दोन स्वरुपात लोकजीवनात प्रचलित असलेले आढळतात. १) कोडी किंवा कूट २) साधा उखाणा.

## १) कोडी किंवा कूट :

कोडी किंवा कूट याचा अर्थ गूढ अर्थाने वचन उखाण्याच्या या स्वरुपात प्रश्न आणि उत्तर यांचा समावेश असतो. अशा प्रकारच्या उखाण्यातून प्रश्न विचारणा व त्या प्रश्नांचे उत्तर देणारा असे दोन घटक असतात. प्रश्न रुपकाची असतात. उत्तरात गोपनाचा स्फोट अपेक्षित असतो. अशा प्रकारच्या उखाण्याचा प्राण म्हणजे त्यातील 'गोपन' कूट प्रश्नांच्या अशा उखाण्यास मराठवाडयात 'तोरका' हा शब्दही काही परिसरात प्रचलित आहे. अशा स्वरुपाच्या उखाण्याचा महत्वाचा उद्देश म्हणजे मनोरंजनातून ज्ञान हा असतो. या उखाण्याला सांस्कृतिक परंपरा असते. गूढतेमूळे उखाण्याला एक विशिष्ट सौदर्य प्राप्त होते. उखाण्याच्या या प्रकारात त्याच्या बाहय स्वरुपावरुन अशा प्रकारच्या उखाण्यांचे दोन वर्ग पुढील प्रमाणे करता येतात.

१) प्रश्नार्थक रचनेची कोडी
२) प्रश्न विरहित रचनेची कोडी

पहिल्या वर्गातील रचना प्रश्नार्थक असते. उदा.

पाऊस नाही, पाणी नाही, रान कसे हिरवे?
कात नाही, चुना नाही, तोंड कसे रंगले?

अशा उखाण्यात उखाणा घालणारा सुटसुटीत व लयबध्द रचनेत प्रश्न विचारतो, आणि उत्तर देणारा एका शब्दात या प्रश्नाचे उत्तर देतो गोपनाचा स्फोट करतो. वरील उखाण्याचे उत्तर 'पोपट' असे आहे. प्रश्न विरहित उखाण्याचे उदा. खालील प्रमाणे

काळी गाय, ढवळी येणी,<br>तिघ लागतात तिच्या ध्यानी<br>एक हिंडे परदेशावानी।।

या उखाण्यातही गोपनची क्रिया आहेतच फक्त उखाण्याची रचना प्रश्न विरहित आहे अशा प्रकारचे उखाणे मराठीत विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत.

१) प्रश्नोत्तर स्वरुपाचे उखाणे :

प्रश्नोत्तरी स्वरुपाच्या उखाण्यांना 'कूट' असेही म्हणतात. प्रश्नोत्तरी उखाण्याचा विकार प्रश्न व उत्तर यात असतो यात दोन घटक असतात. एक प्रश्न विचारणारा व या प्रश्नात उत्तर देणारा दुसरा घटक या उखाण्यातील प्रश्न रुपकाश्रयी असतात व उत्तरात गोपनाचा स्फोट करुन मूलार्थ व्यक्त केला जातो. अशा स्वरुपाच्या उखाण्याला प्राचीन परंपरा आहे. महाराष्ट्र 'कलगीतुऱ्या' प्रकारात आध्यामिक आशयावर आधारलेली अनेक कुटे उपलब्ध झालेला आहेत. वेदात कूटे आणि कुटकथानक स्वतंत्र प्रकारात आढळतात. काही कुटे कथानकावर आधारलेली आढळतात. त्यांना कुटकथानक म्हणतात. अध्यात्मावर आधारित कुटकथानके नाथ संप्रदायात प्रचलित असल्याचे अढळते. कलगीतुऱ्याच्या लावणीत प्रश्नोत्तराच्या रुपाने एखादे कथानक महाभारत,रामायण, भागवत इत्यादी पौराणिक विषयावर आधारलेली आहेत. प्रश्नोत्तरी स्वरुपाच्या उखाण्याचा एक विषेश म्हणजे प्रश्नात आणि उत्तरात पद्यात्मक असते. एक चरण प्रश्नाचा असून दुसरा चरण पहिल्या चरणात विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरांचा असतो. प्रश्नोत्तरी स्वरुपाच्या या उखाण्याचे उदाहरण म्हणून दुर्गा भागवत यांनी पुढील उखाणा दिला आहे.

प्रश्न :–

कोठे सांगा ही कांचन नगरी<br>तिथे कोण तो तप करी<br>हयाचे पासून कोण नारी<br>गुरु पुत्रा याचा शोध करी<br>सृष्टीची रचना कशी झाली केव्हा<br>आकाश तारे निर्मिले कोणी तेव्हा<br>प्रश्न करीतो अडूरवाला<br>उत्तर देई रे गुरुच्या मुला।।

उत्तर :–

एकवीस स्वर्ग तो कांचन नगरी<br>तेथे गौतम ऋषी तप करी<br>तेथे हो जन्मली गो माता आई<br>खरे सांगतो शोध तू घेई<br>मायेपासून उत्पन्न सारे<br>तेहतीस कोटी देवांचे पसारे<br>अगस्तीपासून निमार्ण तारे<br>सृष्टी ही निर्मिली त्या मायाने रे<br>सीताराम राजापूर वाला<br>प्रश्नाचा जबाब देतो तुला।।

याप्रमाणे प्रश्नोत्तर करीत करीत कुटातील कथानक विकसित होत जाते प्रश्नोत्तररुपी उखाण्याचा विधीशी संबंध असल्याने काही ठिकाणी पहावयास मिळाते. बंजारा जमातीत लग्नविधीत प्रश्नोत्तर रुपी उखाणे घालण्याची प्रथा काही ठिकाणी पहावयास मिळते. गोंड जमातीत मार्तिकाच्या विधीशी अशा उखाण्यांचा उपयोग करतात.

उखाण्यातील प्रश्नोत्तरी स्वरुपाच्या उखाण्याचे स्वतंत्र वैशिष्ट असते उखाण्यातील पदतालित्य वैशिष्टयपूर्ण आणि कलात्मक असते रुपकांच्या आश्रयांनी केलेली गुंफन आश्चर्यचकित करणारी असते. कोडयात टाकणारी असते.

## प्रश्न विरहीत उखाणा :—

प्रश्नविरहीत उखाण्याची रचना साधी, सोपी व सहजस्फूर्त असते. यात फक्त गोपनाक्रिया असते. या उखाण्यांची रचना गद्यात्मक असतो तरी पद्याकडे अधिक झूकलेली आढळते.

प्रश्नविरहीत उखाण्यांचे वर्गीकरण पुढील प्रमाणे करता येते.

१) नाव घेण्याचे उखाणे
२) व्याही विहीणीचे उखाणे
३) खेळातील उखाणे
४) मनोरंजनात्मक उखाणे

अशा स्वरुपाचे उखाण्यांना साधे उखाणेही म्हणतात. महाराष्ट्रात उखाण्यातून नाव घेण्याची प्रथा आहे. नाव घेण्याच्या उखाण्याच्या निर्मिती मागील प्रेरणा अभ्यासनीय आहे. स्त्रीने व पुरुषाने नेहमीच व्यवहारात एकमेकाने नाव उच्चारावयाचे नाही व प्रसंगी विषेश उखाण्यातून ते उच्चारावास हरकत नाही या समजुतीतून उखाण्यांची निर्मिती झाली असावी. नैमित्तीक कारणासाठीच नवऱ्याचे नाव उखाण्यातून घेणे याचा स्पष्ट उल्लेख एक नाथांचया 'रुख्मिणी स्वयंवरांत १५ ते १८ या अध्यायात आलेला आहे ते असा —

न कळे भीमकाचे लाघव, सकळही म्हणती धन्यभाव
आता घेऊनिया नांव, पायमागे कुणाचे ।।५४।।

रुख्मिनीला नाव घेण्याबद्दल केलेला हा उल्लेख स्पष्ट आहे. चमत्कृतीजन्य, लयबध्द आणि संयमक अशी काव्यरंचना अशा प्रकारच्या उखाण्यातून आढळते. कल्पकतेला अशा उखाण्यात महत्वाचे स्थान असते. अशा प्रकारच्या उखाण्यातून विविधता नाविन्य आणि बदलत्या समाजस्थितीचे दर्शन आपणास घडते. उदा.

सोन्याची बुगडी, मोत्याचा घोस
....... रावांची नाव घ्यायची मला हौस

चमत्कृतीजन्य रचनेचे उदाहरण म्हणून पुढील उखाणा देता येईल.

ताड फाड
रामफळाचं झाड
सोन्याच चौकट
रुप्याचा पाट
खोलीत खोली
खोलीत अंजीर भात
टंजीर भातावर साजूक तूप
...... रावांच रामासारख रुप

अशा या उखाण्यात कल्पकता आहे.

## २) व्याही—विहीणीचे उखाणे :—

लग्नप्रसंगी विषेशत: रुखवताच्या प्रसंगी थट्टामस्करी करुन हास्याचे तुषार उडविण्यापलीकडे अशा स्वरुपांच्या उखाण्याची झेप जात नाही व्याही—विहिणीच्या या उखाण्यात अश्लिलता अधिक प्रमाणात आढळते.

''आला आला रुखवत त्यात होती नोट
विहिणबाई मागती पँट आणि कोट''

आणि हाच उखाना पुढे अश्लिलता धारण करतो. तो असा

''आरकरांची नय, तिला परकराचा दाणा
इव्हाही म्हणतो इहिनबाई
पलंगावरती का याना
येते दादा ये, पन फजितीला भेते''

भारतात निरनिराळया प्रदेशात व जमातीत लग्नप्रसंगी गायिल्या जाणाऱ्या गीतांचा अभ्यास करतांना या गीतातील सांकेतीक अश्लिलता आपल्या लक्षात येते.

३) खेळातील उखाणे :—

साध्या उखाण्याचा किंवा प्रश्नविरहीत उखाण्याचा तिसरा प्रकार म्हणजे खेळातील उखाणा हा होय त्या उखाण्याची सांगड एखाद्या खेळाशी घातली जाते. महाराष्ट्रात झिम्मा किंवा फुगडी हे खेळ खेळतांना अशा उखाण्यांचा वापर होतो. उदा.

''समोर होता कोनाडा, त्यात होता पेडा
मैनीला नाही कळला, तीचा नवरा होता येडा
नवरा होता येडा बाई नवरा होता येडा
त्याला आवडे लांडया शेपटीचा गोंडा''

या उखाण्याला दुसरी मैत्रीला उत्तर देते त्याचे त्याचे स्वरुपही एकमेकांचे वर्म काढण्यासारखेच आहे.

समोर होता कोनाडा, त्यात होता आणा
ठकीला नवरा भेटला काणा, बाई काणा
असा नवरा लई शाहाणा बाई शाहाणा
का ग ठके त्याच्याकडे जाईना

असे स्पर्धात्मक स्वरुप अशा प्रकारच्या उखाण्याचे असते.

मनोरंजनात्मक उखाणे :—

केवळ मनोरंजनाच्या हेतूने अस्तित्वात आलेला उखाण्यांचा हा प्रकार आहे. मनोरंजनाचे हे उखाणे पुरुष वर्गात अधिक प्रमाणात प्रचलित आहेत या उखाण्याचे स्वरुप कोडयासारखे आहे. पण अत्यंत सुटसुटीत असा हा उखाणा असतो. संध्याकाळी मंडळी गप्पा गोष्टी करावयास बसले की, या उखाण्याचा रंग चढतो आणि मग उखाणे सांगव्याची स्पर्धा सुरु होते अशा उखाण्यांची उदा. पुढील प्रमाणे

१) पाच दार — (पवा)
२) वळचणीला खवा — (केस)
३) दुधावरचा फेस — (लोणी)
४) जेवनात जी — (करंजी)
५) वैरणात बा — (कडबा)

मोजके व समर्पक शब्द हे या उखाण्यांचे एक वैशिष्टये होय.

## सारांश :

उखाण्याचे स्वरुप असे विविधतेने नटलेले आहे. उखाण्याच्या विविध घडणी आकर्षक असून अर्थपूर्ण आहेत. पुरुष वर्गात कोडी तर स्त्रियांत उखाणे प्रचलित आहेत. उखाण्याची परंपरा भारतातील सर्वच प्रांतात प्रचलित असल्याचे दिसते. उखाण्याची कलात्मक अर्थपूर्ण रचना त्यातील कल्पना, विचारांची मांडणी आणि त्यातील नाद ताल त्याचे वेगळेपण दर्शविते. मंनोरजनातून ज्ञानाची देवाण—घेवाण करण्याचे उखाणा—कूट हे एक माध्यम आहे. साधारणत: वेद काळापासून ब्रम्होधाच्या रुपातून प्रवास करीत करीत उखाणा आजही लोक जीवनात प्रचलित राहिला आहे. याचे एक कारण उखाण्याची कलात्मक रचना होय.

## संदर्भ ग्रंथ सूची :

१) दुर्गा भागवत, लोक साहित्याची रुपरेखा
२) डॉ. प्रभाकर मांडे, लोकसाहित्याचे स्वरुप
३) कमलाबाई देशपांडे, अपौरुषपेय वाङ्मय
४) तत्रैव
५) कुंदनलाल उप्रेती लोकसाहित्य के प्रतिजात
६) लोकसाहित्य (संकल्पना व स्वरुप) डॉ.व्यवहारे

❖❖❖

# मध्ययुगीन मराठी संत कवयित्रींचे जीवन आणि कार्य

**प्रा. डॉ. मीनाक्षी रा. देव**
मराठी विभाग प्रमुख व सहा. प्राध्यापक
डॉ. सौ. इं. भा. पा. महिला कला महाविद्यालय, औरंगाबाद, महाराष्ट्र, (India)
मो. नं. ९८८११०९०४६

**प्रस्तावना :**

मध्ययुगीन कालखंडात भक्ती साधनेची एक मोठी परंपरा महाराष्ट्रात होऊन गेली. या भक्ती परंपरेत संत कवयित्रींच्या कार्यकर्तृत्वाचा मोलाचा वाटा आहे. तेराव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंत संत साहित्याला या संत कवयित्रींनी अधिक अर्थपूर्ण व सौंदर्यपूर्ण बनवले. ओवी, अभंग, श्लोक अशा विविध काव्य प्रकारातून स्त्री संतांनी आपले अनुभव विश्व प्रगट केले. मध्ययुगीन मराठी संत काव्यात चक्रधर स्वामी - महदंबा,  संत ज्ञानदेव - मुक्ताबाई, संत नामदेव - जनाबाई, संत तुकाराम - बहिणाबाई, संत रामदास स्वामी - वेणाबाई अशा गुरु शिष्यांच्या जोड्या पहायला मिळतात.

थोर विचारवंत चक्रधर स्वामी यांना बोलते करण्याचे धाडस महदंबेने केले आणि बालयोगिनी मुक्ताबाईने ज्ञानेदवांना जणू लिहिते केले. त्यामुळे मराठी सारस्वताचे क्षितिज उजळून निघाले जनाबाईने नामदेवांचे कुटुंब सांभाळले आणि गोणाई राजाई यांच्यासह संपूर्ण कुटुंबालाच आत्मविश्वास दिला. तुकाराम शिष्या बहिणाबाईने `ज्ञानदेवे रचिला पाया। तुका झालासे कळस' असा वारकरी संप्रदायाचा इतिहास एका अभंगात सांगून सगळ्या वारकरी संतांना एकत्र बांधून ठेवले. वमदास स्वामीच्या पश्चात संप्रदायांची व मठ देवळांची चोख व्यवस्था वेणाबाईने सांभाळाली. मध्ययुगीन कालखंडातील स्त्रियांचे हे कार्य कर्तृत्व निश्चितच दुर्लक्ष करण्यासारखे नाही. या संत कवयित्रीचे जीवन चरित्र खूप प्रेरणादायी आहे.

## १) आद्य मराठी कवयित्री महदंबा :

१३ व्या शतकात श्री चक्रधर स्वामींनी स्थापन केलेल्या महानुभव पंथातील ज्येष्ठ संन्यासिनी म्हणजे महदंबा - महदाईसा, रूपाईसा या नावाने ही त्या ओळखल्या जातात. उपजत कवित्वाची देणगी त्यांना लाभली होती, बालविधवा ते विद्वान संन्यासिनी असा एक विलक्षण जीवन प्रवास त्यांनी अनुभवला. महदाईसा या अत्यंत हुशार, कुशाग्र बुद्धिमत्तेच्या विदुषी होत्या, चक्रधरांची भेट झाल्यावर त्यांच्याकडून अनेक प्रश्नाचे समाधान त्यांनी करून घेतले त्यानंतरच त्यांनी स्वामीचे शिष्यत्व स्वीकारले. त्यांची भक्ती डोळस होती, बुद्धीची आणि चौकसपणाची त्याला जोड होती. त्यामुळे चक्रधरांना त्या सतत मनातील प्रश्न शंका विचारत असत, त्यांचा हा गुण स्वामींनाही आवडत असे.

आपल्यानंतर पंथाची जबाबदारी नागदेवाचार्यांकडे सोपवताना चक्रधरस्वामींनी महदंबेशी चर्चा करून मग निर्णय घेतला. महदंबेने पंथांच्या कार्यात नागदेवाचार्यांना सर्व प्रकारची मदत केली. महानुभाव पंथात त्यांना सन्मान दिला जात होता, त्या सुद्धा घरातील जबाबदार स्त्रीप्रमाणे पंथात वावरत असत.

महदंबेची श्रीकृष्णावर नितांत श्रद्धा होती. त्यांचे मन ओळखूनच श्री. गोविंद प्रभूनी महदंबेली कृष्ण विवाहाची गाणी रचण्यास सांगितली. त्यांनी ही अत्यंत भक्तिभावाने श्रीकृष्ण आणि रुक्मिणीच्या विवाहाचे वर्णन करणारी गाणी गाईली, "महदंबेचे धवळे" या नावाने ते लोकप्रिय आहेत. या धवळ्यांच्या निर्मितीमुळे महदंबेला मराठी साहित्यात आद्य कवयित्री होण्याचा मान प्राप्त झाला. १३ व्या शतकात ज्या प्रकारचे

स्त्रियांचे जीवन होते विशेषत: विधवा स्त्रियांचे जीवन होते. त्या जीवन चाकोरीच्या बाहेर पडून संन्यास घेऊन संन्यासिनीचे जीवन जगण्याचे धैर्य त्यांनी दाखवले आणि एक वेगळा आदर्श परमार्थाकडे जाणाऱ्या स्त्रियांसमोर त्यांनी ठेवला.

## २) बालयोगिनी मुक्ताबाई :

वारकरी संप्रदायातील पहिल्या संतकवयित्री म्हणजे मुक्ताबाई. ज्ञानदेवांच्या कुटुंबातील कर्तृत्वसंपन्न बालिका, चांगा वटेश्वराची गुरु, निवृत्ती - ज्ञानदेव सोपान या भावंडांची माता, संन्याशाची मुले म्हणून समाजाने चौकटी बाहेर या भावंडाना फेकले, तेव्हा मुक्ताबाईने `विश्व झालिया वन्ही। संत मुखे व्हावे पाणी।' या वृत्तीने आपल्या भावंडा मधील प्रतिभाकोंभ कोमेजू दिला नाही. मुक्ताबाई या परखड, भावशील आणि अनुभववादी कवयित्री होत्या. त्या जितक्या प्रेमळ तितक्याच फटकळ, जितकी कनवाळू तितकीच रागीट होत्या, ज्ञानदेव, नामदेव आणि चांगदेव या तिन्ही आचार्यां ना मागदर्शन केले. मुक्ताबाईंनी आपल्या कूट रचना पर अभंगातून आपल्या आध्यात्मिक अनुभूती प्रगट केल्या.

संत मंडळीमध्ये मुक्ताबाईंचा अधिकार मोठा होता त्यांना `आदिशक्ती' म्हणून ही संबोधले जाते, एक ज्ञानवान योगिनीची प्रतिमा मुक्ताबाईंनी आपल्या जगण्यातून उभी केली.

## ३) नामयाची दासी जनाबाई :

संत नामदेवांच्या सहवासात आणि संत ज्ञानदेवांच्या काळात संत जनाबाईंचे काव्य आणि कर्तृत्व बहरास आले. `संतवाटिकेतील जाईची वेल' असे त्यांना म्हटले जाते. समाजाच्या सामान्य स्तरापासून ते असमान्य स्तरापर्यंत जनाबाईंनी केलेला प्रवास हा मोठा विलक्षण आहे. स्वानंदाचे आणि आत्मविश्वासाचे बोल जनाबाईंच्या कवितेतून व्यक्त झाले आहेत, स्त्री सुलभ वृत्तीतून हळूवारपणे, उत्कट आर्ततेने जनाबाईनी ईश्वराला आळवले. जनाबाईंचे आध्यात्मिक, परमार्थिक आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व त्यांच्या अभंगातून गोचर होते.

आध्यात्मिक साधनेसाठी त्यांनी जीवनाला, स्वकष्टांना दूर लोटले नाही, `दळिता कांडिता तुज गाईन अनंता' ही त्यांची उर्जा होती. वास्तव जीवन आणि आध्यात्मिक प्रवास यांची अपूर्व सांगड जनाबाईंनी घातली जनाबाईनी दैनंदिन कष्टांना आणि जीवन व्यवहाराला ईश्वरमय करून टाकले. आपल्या समर्पित आणि उपेक्षित जीवनाच्या साथ संगतीने त्यांनी आध्यात्मिक उन्नती साधली. जनाबाईंनी आपले पोरकेपण एकटेपण नामदेवांच्या घरात जिरवून टाकले होते. आपलं सामर्थ्य आणि आपल्या मर्यादा यांची योग्य जाण जनाबाईंच्या ठिकाणी होती.

जीवनाशी, दासीपणाशी आणि स्त्रीत्वाला जपून जनाबाईंनी अभंगवाणी गाईली, ``संतांचे घरची दासी मी अंकिली। विठोबाने दिली प्रेमकळा। जोड झाली विठोबासी । दासी नामयाची म्हणोनिया।''

अशी कृतज्ञता जनाबाईने व्यक्त केली आहे. ल. रा. पांगारकर म्हणतात त्याप्रमाणे, ``जनाबाईंच्या अभंगात नामदेवांची सगुणप्रीती आणि ज्ञानदेवांची योगानुभूति असा दोहोंचाही प्रत्यय येतो.''

## ४) तुकाराम शिष्या बहिणाबाई :

मराठी कवितेच्या इतिहासात दोन बहिणाबाई आपल्या काव्य कर्तृत्वाने अजरामर झालेल्या आहेत. एक म्हणजे संत कवयित्री आणि दुसरी म्हणजे आधुनिक काव्यातील बहिणाबाई चौधरी दोघींनीही मराठी कवितेवर आपला अमिट ठसा उमटवला आहे. तुकाराम शिष्या बहिणाबाई या मराठी संत परंपरेतील एक महत्त्वाच्या संत कवयित्री होत. परमार्थाची ओढ असणाऱ्या विवाहित स्त्रीला लौकिक संसारात कसा संघर्ष करावा लागला याचे चित्र त्यांच्या जीवन चरित्रातून पहायला मिळते.

बहिणाबाईंचा जन्म इ. स. १६२८ मध्ये मराठवाड्यातील वेरुळ जवळील देवगावी झाला. बालवयात त्यांचा विवाह झाला, कोपीष्ट पतीचा जाच त्यांना असह्य होत राहिला, त्यांचे मन ईश्वर चिंतनाकडे व भक्तीकडे वळले. पंढरपूरला गेल्यावर विठ्ठल दर्शनाने त्यांच्या मनात भक्तिभाव वाढत गेला तिथे कीर्तनातून तुकारामांचे अभंग ऐकून त्यांना तुकारामाना भेटण्याची ओढ लागली.

बहिणीने कीर्तनाला जाणे, तुकारामांचे अभंग म्हणणे त्यांच्या कर्मठ, रागीट नवऱ्याला आवडले नाही नवऱ्याने त्यांचा प्रचंड छळ केला. पण तिची श्रद्धा, निष्ठा, पाहून तुकाराम महाराजांनी त्यांना दृष्टांत दिला. तुकारामांना पाहून तिचे मन शांत झाले. बहिणा ही सोळाव्या शतकातली स्त्री होती, रुढी परंपरा शास्त्रवचने, संस्कार, आईवडिलांची शिकवण यांचे ओझे त्यांच्या मनावर होते. संसार आणि अध्यात्म यांच्या द्वद्वांत त्या सापडल्या पण त्यातून ही योग्य मार्ग त्यांनी चोखाळला. ``स्त्रियेचे शरीर पराधीन देही । न चाले उपाय विरक्तीचा।'' किंवा ``शरीराचे भोग वाटतात वैरी । माझी कोण करी चिंता।'' अशी प्रामाणिक कळकळ त्यांच्या अभंगातून व्यक्त होते. आत्मसंघर्ष आणि कौटुंबिक संघर्ष बहिणाबाईने समर्थपणे सहन केला आणि तो काव्यातून अभिव्यक्त ही केला. परमार्थाची ओढ असणाऱ्या स्त्रिला प्रपंच करताना किती यातना होतात, स्त्रीची कशी कुचंबना होते. हे अनुभव त्यांनी अभंगातून कथन केले. मात्र एकदा भक्तीमध्ये समरस झाल्यावर या त्रासाकडे अलिप्त पणे बघण्याची त्यांची विकसित झालेला वृत्तीही यातून दिसून येते.

एका सांसारिक स्त्रिने प्रपंचात राहून स्वत:चा केलेला विकास, निष्ठेने केलेली वाटचाल त्यांच्या उदंड काव्यरचनेमुळे आपल्याला कळतात. वारकरी संप्रदायात ही त्यांच्या रचना आदरणीय आहेत. प्रतिकूल परिस्थितीत स्वत:चे स्वत्व टिकवून ठेवून, संसार यातनांना तोंड देत, अध्यात्माची वाटचाल करणारी मनस्वी आणि समंजस स्त्री देहूमध्ये तुकाराम महाराजांच्या उपदेशपर अभंगाने तयार झाली आणि त्यांच्याच आशीर्वादाने त्यांच्यामध्ये कवित्ववृत्ती जागी झाली.

`संतकृपा झाली इमारत फळा आली।' या अभंगातून बहिणाबाईंनी महाराष्ट्रात भागवतधर्मासाठी संतांनी केलेल्या कार्याचे अचूक वर्णन केले. वारकरी संप्रदायात तेजस्विनी सारखी झळकणारी संत कवयित्री म्हणून त्या सन्मानास प्राप्त ठरल्या.

## ५) समर्थ रामदास स्वामींची विद्वान शिष्या - वेणाबाई :

समर्थ रामदासांच्या शिष्य परिवारातील ज्ञानी विद्वान विदुषी कवयित्री म्हणून वेणाबाईचे नाव घेतले जाते.

१६व्या शतकात समर्थ रामदासांनी उदात्त हेतूनी समाज संघटनेचे, धर्म संघटनेच्या उभारणीचे कार्य हाती घेतले होते. त्यांच्या कार्यात व सेवेत वेणाबाईंनी स्वत:ला समर्पित केले होते.

वेणाबाई या बालविधवा होत्या, एकदा समर्थ रामदास स्वामी भिक्षा मागण्यास त्यांच्या घरी आले तेव्हा वेणाबाई तुळशी वृंदावनापाशी `एकनाथी भागवत' वाचीत होत्या. समर्थांनी त्या ग्रंथा संदर्भात वेणाबाईना प्रश्न विचारले, त्या संवादातून समर्थांना वेणाबाईची बुद्धिमत्ता उमजली. समर्थांच्या या भेटीचा वेणाबाईवर विलक्षण प्रभाव पडला. 'हेच आपले गुरु आहेत, त्यांच्या कडून आपण उपदेश घ्यावा, त्यांची सेवा करीत पुढचे जीवन व्यतीत करावे' असा त्यांच्या मनानी निग्रह केला. आणि समाजाचा, घरातील लोकांचा विरोध पत्करून त्यांनी समर्थांची दीक्षा घेतली आणि जीवनाच्या अखेरपर्यंत समर्थांच्या सेवेत मठात राहिल्या.

वेणाबाईचा शिष्य म्हणून समर्थांच्या परिवारात समावेश झाला. समर्थ रामदास स्वामी यांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करण्याचे ठरवले होते. बौद्धिक आणि मानसिक दृष्ट्या स्त्री - पुरुष समान

आहेत असे त्यांचे मत होते. त्यांनी विधवा, अनाथ, दु:खी स्त्रियांना पंथात सन्मानाने प्रवेश दिला. त्यांच्यासाठी मठ स्थापन केले कीर्तन - प्रवचन, ग्रंथलेखन करण्यास स्त्रियांना प्रोत्साहन दिले. स्त्रियांचे संघटन केले, या कामाचे `वेणाबाई' हे उत्तम उदाहरण ठरले. .

वेणाबाई सर्व सामान्य विधवा स्त्री, प्राप्त परिस्थितीतून बाहेर पडून जीवनाचा वेगळा रस्ता निवडून महंतपदाच्या योग्यते पर्यंत त्या पोहचल्या. जीवनाच्या अखेरपर्यंत मठाची व्यवस्था आणि समर्थांची सेवा करीत राहिल्या ``समर्थचरणी संती उध्वलीन। अधिष्ठानी पावली संस्थान।'' असे वेणाबाईंचे जीवन समर्थमय झाले होते. त्यांची स्वामी निष्ठा शुद्ध भक्तिभाव आणि प्रांजळपणा यामुळे समर्थ संप्रदायाशी त्यांचे अतुट असे नाते निर्माण झाले.

अशा या मध्ययुगीन संत कवयित्री संतांच्या वडिलधाऱ्या कृपा छत्राखाली वावरल्या, आपले व्यक्तिगत दु:ख बाजूला ठेवून त्या परोपकारासाठी झिजल्या, ईश्वर भक्ती मध्ये एकरूप झाल्या त्यांनी आपल्या आचरणातून मूल्य संस्कार रुजविला, स्त्री स्वभावातील वात्सल्य, करुणा, आत्मियता, जाणीवा, वृत्ति - प्रवृत्ती हे सर्व ईश्वरमय करून समर्पणाच्या भूमिकेतून त्यांनी साधना केली.

## सारांश :

``न स्वातंत्र्यम् स्त्री अर्हति।'' असे म्हणणाऱ्या संस्कृतीला महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, वेणाबाई यांनी आपल्या कार्याकर्तृत्वाने चोख उत्तर दिले, त्याचबरोबर या संत कवयित्रींनी इतिहासात स्वत:ची एक ठळक नाममुद्रा उमटवली त्यांचे कार्यकर्तृत्व आणि काव्य म्हणजे त्यांच्या कालखंडाचा आणि संस्कृतीचा दर्पण आहे.

या संत कवयित्रींनी मराठी माणसाचे मन घडवले. संकटावर मात करण्याची शिकवण दिली जगण्याची उमेद दिली, हृदयातील ईश्वरी तत्त्वाला जागे ठेवण्याचे कार्य केले. विपरित परिस्थितीतही सहानुभूती, सद्संगती, सदाचार यांचा आग्रह धरला. माणसाचे शरीर व मन विशुद्ध कसे राहिल याची शिकवण दिली. आपल्या चरित्राचे व चारित्र्याचे आदर्श समाजासमोर ठेऊन कार्य केले. त्यांच्या आयुष्यात ही अनेक व्यथा - वेदना होत्या, तरी त्यांनी आपली साधना आणि काव्यात्मवृत्ती सोडली नाही, अनेक ताण तणाव, भौतिक व्यथा, वेदना मागे टाकून `देह मंदिर आत्मा तो राऊळ' या भावनेने त्या जगल्या आणि व्यक्त ही झाल्या, त्यानी जो अभंग रूपी ठेवा सर्व सामान्य माणसासाठी ठेवला तो खूप मानसिक, भावनिक आधार दिला बळ देणारा आहे.

स्त्री जन्म म्हणून त्या उदास झाल्या नाहीत किंवा रडत बसल्या नाहीत तर त्यांनी स्वत:च स्वत:चा मार्ग आखला आणि संत मंडळीच्या बरोबरीचे स्थान भक्ति परंपरेत मिळविले स्त्रीत्व स्त्री भाव - स्त्री स्वभाव यांचे मनोज्ञ असे चित्रण त्यांच्या अभंग रचनेतून पहायला मिळते.

स्त्री मुक्तीच्या पाऊलखुणा शोधताना या मराठी संत कवयित्रींचे योगदान निश्चितच विचारात घ्यावे लागते.

## संदर्भ ग्रंथ सूची :

१) संत कवयित्रीचे वाङ्मयीन कार्य :- डॉ. सुहासिनी इर्लेकर.

२) अवघी दुमदुमली पंढरी :- उषा माधव देशमुख

३) संत कवयित्री :- संपादक डॉ. अर्चना काटकर

❖❖❖

# 'जिप्सी' या काव्यसंग्रहामधून व्यक्त होणारे निसर्ग चित्रण

**प्रा. डॉ. लालबा दुमटकर**
गो.सी. टोम्पे महाविद्यालय, चांदूरबाजार, जि. अमरावती, महाराष्ट्र, (India)
lalbadumatkar123@gmail.com

**प्रस्तावना** :

कवी मंगेश पाडगावकर हे स्वातंत्र्योत्तर काळातील एक महत्त्वाचे कवी म्हणून ओळखले जातात. मुख्यत: निसर्ग, प्रेमभावना आणि काव्य निर्मितीची प्रक्रिया हे तीन घटक त्यांच्या जिप्सी या काव्यसंग्रहात आढळतात. मुळात मंगेश पाडगावकरांची भाववृत्ती ही निसर्गाने आच्छादलेली आहे. त्यांचे मन निसर्गाशी तन्मय झालेली आहे. निसर्गाच्या समन्वयातच ते आनंदी, दु:खी होतात. इतके निसर्गाशी त्यांचे जवळचे नाते जुळलेले आहे. त्यामुळे पाडगावकरांच्या कवितेची भाषा ही निसर्ग प्रतिमा, प्रतीकातून प्रकट होते. कवी मंगेश पाडगावकर यांच्या काव्याची अगदी पहिली प्रेरणा ही निसर्ग हीच आहे. त्यांचे बालपण कोकणात गेले, त्यामुळे लहानपणापासूनच त्यांच्या मनावर कोकणातल्या निसर्गाने फार मोठे संस्कार घडवलेले आहे. निसर्गाच्या विविध अवस्थांचे दर्शन या काळात त्यांना सहजतेने घडले आहे. या सर्व अवलोकनाचा त्यांच्या कवितेवर फार खोल संस्कार होताना दिसतो; म्हणूनच पाडगावकरांची सगळीच कविता ही निसर्गमय झालेली दिसते. आपल्या सर्व भावभावना निसर्गातील प्रतिमांच्या प्रतीकांच्या द्वारे रेखाटतात. किंबहुना निसर्गाची मदत घेतल्याशिवाय त्यांच्या प्रतिभेला व्यक्त होणे कठीण जाते. केवळ निसर्ग चित्र रेखाटणे, आपल्या भावना निसर्गातील प्रतिमा द्वारे व्यक्त करणे आणि निसर्गातील रूपके घेऊन वेगळा आशय व्यक्त करणे. असा हा पाडगावकरांच्या कवितेत निसर्ग आलेला आहे. निसर्ग हेच पाडगावकर यांचे पहिले प्रेम आहे; म्हणूनच त्यांची निसर्ग कविता ही त्यांच्यापासून वेगळी करणे अशक्य आहे. आपल्या निसर्ग कवितेत पाडगावकरांनी सौंदर्याचे अतिशय पारदर्शक चित्रण केलेले आहे. आपल्या थरथरत्या भाव जीवनाचे ओथंबून वाहणारी निसर्गाची क्षणचित्रे पाडगावकर आपल्या कवितेत चित्रित करतात. उदाहरणात 'खडक' या कवितेमध्ये एका समुद्रकिनाऱ्यावर सभोवताली दिसणाऱ्या नयनरम्य वातावरणाचे चित्र साकार करताना म्हणतात,

"निवली खळब, निवांत झुलती लाटा
कधीच गेल्या, रेती वरल्या पुसून वाटा"१

नुकतीच भरती येऊन गेलेली आहे ही भरतीची खळबळ शांत झाल्यावर जणूकाही आनंदाने न्हाऊन निघालेल्या किनाऱ्यावरचा एक खडक संथपणाने आपले अंग वाळवीत बसला आहे. असे या खडकाचे जिवंत चित्र पाडगावकर आपल्या या कवितेमध्ये रेखाटतात. 'शांत किनारा' या कवितेमध्ये ही पाडगावकरांनी असेच विलोभनीय निसर्ग दृश्य रेखाटलेले आहे.

"अथांग सारे, आकाश सागर
डोंगर वारे, लोकरी गाण
आनंद धारा, शांत किनारा"२

निसर्गाच्या सुंदर निवांत रूपानं पाडगावकरांची भाववृत्ती सुद्धा अतिशय सुंदर शांत आनंदमय होते. निसर्गाच्या रूपाप्रमाणे त्यांची भाववृत्ती अत्यंत लयबद्ध होते आणि त्यांची शब्दरचना सुद्धा लयबद्ध पावले समोर टाकू लागते. असा अनुभव पाडगावकर यांच्या कवितेतील कविता वाचताना येतो. 'रात्र भिजली', 'निवांत' या दोन कविताही यासंदर्भात उलगडण्याजोगते आहेत. 'निवांत' कवितेत ते म्हणतात,

"कोवळ्या पाण्याचा लख्ख आरसा
त्यात डोकावे शुभ्र त्याचा गुलजार ससा
लवचित सर झडून गेली

भिजल्या पाणी शीळ वार्याची झाली ओली
शालीन कौलांची उलीन घरे
आतिथ्यशील कोणाची वाट पाहतील बरे"३

या कवितेमध्ये सुद्धा निसर्ग दृश्याचे एक भावपूर्ण चित्र पाडगावकर रेखाटताना दिसतात. खरे म्हणजे जिप्सीतील कवितांमधून निसर्गाची तिच ती दृश्य चित्रित होतात सळसळणारी पाने, शीळ घालणारा वारा, प्रतिबिंबाचे गुढ इशारे देणारा वारा, आकाशातील विविध रंग, स्तब्ध उभे राहणारे माळ, एकटाच चमकणारा तारा किंवा एकटाच चमकणारा मेघ, दवबिंदूतील थरथरणारे सौंदर्य, अशी या संग्रहात कितीतरी निसर्गसौंदर्य वारंवार प्रकट होताना दिसतात; पण त्यांचे बदलते भावजीवन याच निसर्ग दृश्यातून बदलत्या स्वरूपात साकार होत असते आणि म्हणूनच तीच ती येणारी निसर्ग दृश्य कधीही कंटाळवाणी ठरत नाहीत. वाऱ्याचे एकच दृश्य पाडगावकरांनी वेगवेगळ्या कवितांमधून कसे साकार करतात. याचे उदाहरण म्हणजे 'निवांत' या कवितेमध्ये वारा लाल वळसा घेऊन पुढे जाणारा असा दिसतो. 'संथ निळे पाणी' या कवितेत

"कुरळ्या लहंरीमधुनी
शिळ घालतो वारा"४

असे दृश्य दिसते. 'उदात्त संध्याकाळ' या कवितेत वाऱ्याची ती झुळूक लाजरी, अकालीच प्रौढ झाल्या सारखी वाटते आणि 'शांत किनारा' या कवितेत लहरी चुंबून वारा लहरे असे दृश्य येते. म्हणजे वाऱ्याचे हे एकच दृश्य पण निरनिराळ्या मनोवृत्तीत वेगवेगळ्या रूपांमध्ये आपल्याला दिसतात. अशी कितीतरी उदाहरणे या संदर्भामध्ये देता येतील. निसर्गाचे तेच दृश्य पण वेगळ्या मनाच्या अवस्थेत पाडगावकर त्यांच्या वेगळे चित्र आपणाला दाखवतात. काजव, तारा, मेघ, चांदणे, लहरी, तरुण पालवी, दिशा, रंग, गंध यांचे कितीतरी विविध विभ्रम विविध भाववृत्ती चित्रित केलेली आहे. जिप्सी मधील पाडगावकरांचे विश्व हे प्रामुख्याने निसर्गाच्या सौंदर्याचे विश्व आहे. ते चांदण्यांचे विश्व आहे. कातर वेळचे विश्व आहे. धुक्याचे, पर्जन्याचे, पहाटेचे, मध्यरात्रीचे विश्व आहे. त्यामध्ये कुठे कलकलाट नाही कर्कश नाही आणि कुठेही निराशा नाही. निसर्गाचे हे जग पाडगावकरांनी जिव्हाळ्याने आणि समरसतेने चित्रित केलेले दिसतात. निसर्गाच्या इतक्या प्रामाणिक सुंदर अनुभूतीचा अविष्कार एक कवी बोरकर वगळले तर मराठीत अन्यत्र सापडणे कठीण आहे. 'कांती' या कवितेमधून निसर्गाची आल्हाददायक क्षणचित्रे ते रेखाटतात. उदाहरणात 'संथ निळे हे पाणी', शांत किनारा, किमया, निवांत, खडक, यासारख्या अनेक कवितेतून निसर्ग सहवासातल्या आनंदाची चित्रने येतात. पण त्याच बरोबर काही कवितांमधून निसर्गामध्ये असलेल्या चैतन्य तत्वाचे दर्शनही घडवतात. एका कवितेत या चैतन्य तत्त्वाला स्त्री रूपात त्यांनी वर्णन केलेले आहे. "मी चैतन्य होऊनी आले" या कवितेत हे निसर्गाचे चैतन्य एका स्त्री रुपाने कवीशी हितगुज करताना दिसते अशा प्रकारचे वर्णन येते. या निसर्गाने एक स्त्री रूप धारण करून आपल्या गात्रावर इंद्रधनुष्य फुलविले आहे आणि सर्व ऋतूचे नजराणे घेऊन ती आपणास भेटायला आलेली आहे असे कवीला वाटते. दुसऱ्या एका कवितेत निसर्गसौंदर्याच्या या चैतन्य तत्त्वाला पाडगावकर बोलतात आणि येताना त्या चैतन्य तत्वाने कोणत्या रुपानं आपल्याला दर्शन द्यावे हे सांगतात.

"जर पहाटेच येणार तरी, ये धुके होऊन गहन निळे
जर येणारच रात्री तर, ये होऊन थरथर पर्णाची"५

अशा प्रकारे निसर्गाच्या विविध दृश्यातून निसर्गाच्या चैतन्य तत्वाला ते आव्हान करतात. एका कवितेत पाडगावकर परमेश्वराला उद्देशून म्हणतात,

"मी कधीच काही म्हटले, की तू दे मज दर्शन"६

त्याचे कारण सभोवताल जी निसर्गाची सुंदर दृश्य दिसतात, जे सर्व परमेश्वरी शक्तीचे आविष्कार आहेत अशी पाडगावकर यांची नितांत श्रद्धा आहे. निसर्गाच्या अगदी बारीक-सारीक दृश्यामधून सुद्धा पाडगावकरांनी सौंदर्याचे दर्शन घडवले आहे. आणि या सौंदर्य मागे असणाऱ्या चैतन्य तत्वाला ते परमेश्वर

असे म्हणतात; तेव्हा पाडगावकरांच्या निसर्ग कवितेचा असा एक आगळा वेगळा अविष्कार आपणाला सांगता येईल. तिसरा महत्त्वाचा प्रकार म्हणजे निसर्ग दृश्यमधून पाडगावकर आपल्या भाववृत्ती साकार करतात. 'आनंद यात्री,' या कवितेत निसर्ग सहवासाने विलक्षण आनंदी बनलेल्या आपल्या मनस्थितीचे वर्णन करताना म्हणतात,

"मेघाच्या उत्सवी झाले जन्म
दवान सूर्याचे घेतले दर्शन
दूर क्षितिजाची निळी भुलावण
पैशा विन मला ठेवी खिळवून
अक्षय विनाच घुमे माझ्यापायी
आनंदयात्री मी आनंदयात्री"७

असे शब्दाशब्दातून पाडगावकर निसर्गाच्या रूपानं आपला आनंद मिसळून गात आहेत आणि नाचत आहेत असे भासते; तर काही कवितांमधून आपल्या मनाची उदासीनता निसर्ग रूपातून साकार करतात. 'ही उदासीन संध्याकाळ,' या कवितेत निसर्गातील प्रत्येक दृश्य त्यांना त्यांच्या मनस्थितीप्रमाणे उदास झालेले दिसते आणि वाचकांचे मन ही उदासीनतेने मारून जाते.

"ही उदास संध्याकाळ
खिन्नपणा पांघरून बसला
झुरत दुरचा माळ
संथ तरंगत मेघ एकला
न कळे शोधीत काय चालला
अंधाराचे करीत ध्यान जणू
पर्वत भव्य विशाल"८

अशाप्रकारे आपल्या विविध भाववृत्ती पाडगावकर निसर्ग दृश्यातून साकार करतात. जिप्सीमधील सर्वच कविता या संपूर्ण निसर्गाने व्यापलेल्या आहेत. निसर्गाचे कितीतरी अवस्था पाडगावकर आपल्या कवितातून साकार करतात. हे करताना त्यांनी सौंदर्याचे पारदर्शक विश्व उभे केले आहे. या निसर्ग दृश्यांमध्ये कुठेही कृपतेचे किंवा बिभस्त्तेचे दर्शन घडत नाही. निसर्गाच्या त्यांच्या अनुभवात प्रामाणिकपणा, प्रेमळपणा स्त्रोत भरलेला आहे. यासंदर्भात तुलनाच करायची झाली तर बालकवीच्या कवितेशी तुलना करता येईल. बालकवीच्या कवितेतील निसर्ग दृश्य प्रमाणे हळवे, नाजूक, स्वप्नाळू असे निसर्ग विश्व पाडगावकर करतात; पण बालकवीपेक्षा पाडगावकरांचे वेगळेपण असे की बालकवीच्या निसर्गातील दृश्य बालरूपाने अनुभवलेला व त्यांच्या कल्पनेतला निसर्ग होता. त्यांच्या दृष्टीतील निसर्ग हा वास्तव आहे. गात्रागात्रातून पाडगावकरांनी निसर्ग अनुभवलेला आहे आणि शब्दाशब्दातून तो ओथंबून भरून टाकला आहे. म्हणूनच मराठी निसर्ग कवितेच्या परंपरेत त्यांच्या जिप्सीतील कविता या लक्षणीय वाटतात.

**संदर्भसूची** :

१) जिप्सी (कवितासंग्रह) - मंगेश पाडगावकर, मौज प्रकाशन 1953, पृ. क्र. १२
२) तत्रैव -२२
३) तत्रैव-२६
४) तत्रैव-२९
५) तत्रैव-३४
६) तत्रैव-४१
७) तत्रैव-४४
८) तत्रैव-४८

❖❖❖

# महाराष्ट्राचा 'महार'

डॉ. मृदुला निळकंठ रायपुरे
डॉ. आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चंद्रपूर
ईमेल – mrudulajanglekar@gmail.com मो. नं. – ९९७५०३३०२७

## सारांश –

भारतीय परिप्रेक्ष्यातून पाहता 'महार' हा शब्द आजच्या घडीला जातिवाचक जरी असला तरी या शब्दाला अतिशय महत्त्वपूर्ण असा इतिहास जुळलेला आहे. 'महार' या शब्दाच्या व्युत्पत्तीपासून जर विचार केला तर हा शब्द प्रारंभी प्रदेशवाचक होता. एवढेच नव्हे तर संपूर्ण प्रदेशाला 'महार राष्ट्' असे संबोधले जाई. आजच्या महाराष्ट्राचे महार हे महाराष्ट्राचे मूळनिवासी व शासनकर्ते लोक होते. हे लोक आर्यांशी झालेल्या संघर्षात पराभूत झाले. कालांतराने जातिव्यवस्थेच्या रचनेत त्यांना समाजात निम्न दर्जा देऊन त्यांच्यातील क्षात्रधर्माला संपूर्ण नष्ट करण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र आता वेळ आली आहे की या विषयाचे पुनर्चिंतन करून 'महार' या शब्दाची महती जनमानसात रूजवून या शब्दाची गेलेली प्रतिष्ठा परत मिळवून द्यावी.निकोप समाजरचनेचा विचार करता जातिव्यवस्थेने व उच्चनीच भेदभावाने बरबटलेला समाज कधीही प्रगती करू शकत नाही. भारताला जर नव्या जगाशी, आधुनिक जगाशी, विकसित जगाशी आपले नाते जोडायचे असेल तर या जातिव्यवस्थेला फाटा दिल्याशिवाय ते शक्य होणार नाही. आपल्या सामाजिक संशोधनातून मानवामानवांतील भेद दूर करणे हे संशोधकाचे प्रथम कर्तव्य आहे. 'महार' या शब्दाचा वास्तविक अर्थ विचारवंतांसमोर मांडण्याचे हे एक प्रमुख कारण आहे. कुंपणाच्या बाहेर ठेवलेल्या या समाजाचा खरा इतिहास उलगडून दाखविणे, हे या शोधप्रबंधाचे उद्दिष्ट आहे.

बीजसंज्ञा – महार लोक, सामाजिक व्यवस्था, आधुनिक स्थित्यंतर

## प्रस्तावना –

कुठल्याही शब्दाचा व्युत्पत्तीशास्त्रानुसार अर्थ त्याच्या ऐतिहासिक गुणवत्तेशी, वैशिष्ट्याशी जुळलेला असतो. 'कुशल' हा शब्द आपण 'प्रवीण', 'निपुण' या शब्दांचा पर्यायवाची शब्द म्हणून आज आपण वापरतो. पण त्या शब्दाचे मूळ वेगळेच आहे. कुश नावाचे गवत कापण्यास फार कष्ट आणि तंत्र लागते. म्हणून जे लोक ते कापायचे त्यांना कुशल म्हणायचे. आता तो संदर्भ गळून पडला व कुशल या शब्दाचा अर्थ निपुणता या शब्दाशी जुळला. 'राक्षस' या शब्दाचेही तसेच आहे. 'रक्ष्' या धातूपासून उत्पन्न झालेला 'राक्षस' या शब्दाचा अर्थ रक्षण करणारा असा होतो. मात्र आजच्या घडीला या शब्दाचा अर्थ किती विचित्र झाला आहे. मूळ अर्थाच्या विरूध्दात हा शब्द मराठी भाषेमध्ये कार्य करतो आहे. असे एक–दोन नव्हे तर शेकडो, हजारो शब्द आहेत, ज्यांचे अर्थ आज पार बदलून गेले आहेत. त्यापैकीच एक शब्द म्हणजे 'महार'.

'महार' या शब्दावरून आपल्याला एखाद्या जातिसमूहाचा बोध होतो. हे प्रकरण इथेच थांबत नाही तर या शब्दाला तुच्छतेचा, निम्नतेचा दर्प आहे. 'महार – कुपाच्या बाहार' अशी म्हण विदर्भात आहे.या म्हणीवरून जातिव्यवस्थेने या शब्दाला किती हिनत्व दिले याची कल्पना येते. स्वत:च्या मानवतेची पातळी सोडून इतरांच्या मानवतेचे हनन करण्याचे हे अनोखे उदाहरण म्हटले पाहिजे.

## महार लोक –

महात्मा फुले यांनी 'महार' या शब्दाची 'वैदिकांचे महा अरि', अशी फोड केली आहे. अरी म्हणजे शत्रू. वैदिकांचे मोठे, महा शत्रू म्हणजे हे महार लोक होत. डॉ. विल्सन, डॉ. ओप्पर्ट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. श्री. व्यं. केतकर या विद्वानांच्या मते, महाराष्ट्र हा प्रदेश म्हणजे महारांचा प्रदेश होता. त्यांच्या नावावरूनच या प्रदेशाला हे नाव पडले. सुरूवातीला ते 'महारराष्ट्र' असे होते.पण नंतर त्याचे ऱ्हस्वीकरण झाले. व्याकरणिक नियमाप्रमाणे विसर्गाचा 'र' होऊन त्यापुढे 'र' हा वर्ण पुन्हा आला तर एका 'र' चा लोप होतो व तो दीर्घ उच्चारल्या जातो.

महाराष्ट्र – महार + राष्ट्र

महार – म् + अ + ह् + आ + र् + अ

या स्वनांमधील 'ह्' हा स्वन विसर्गाशी मिळता–जुळता आहे. त्याच्यापुढे 'र' हा ऱ्हस्व वर्ण आला आहे.

राष्ट्र — र् + आ + ष् + ट् + र् + अ
यामध्ये 'र' हा दीर्घ वर्ण आहे. 'महार' या शब्दातील शेवटचा 'र' व 'राष्ट्र' या शब्दातील सुरूवातीचा 'र' यांची संधी होऊन ऱ्हस्व 'र' चा लोप होतो व दीर्घ 'र' शिल्लक राहतो. ही विसर्ग—र्—संधीआहे. या संधीप्रमाणे 'महारराष्ट्र' या शब्दाचे 'महाराष्ट्र' झाले आहे.यावरून असे म्हणता येईल की, महाराष्ट्राच्या या प्रदेशात जे लोक राहत होते, त्यांना 'महार' संबोधल्या जाई. अर्थात जातिव्यवस्थेच्या निर्मितीच्या आधीची ही अवस्था आहे. संशोधक इरावती कर्वे म्हणतात की, महाराष्ट्रात एकही असे गाव नाही ज्या गावात महार नाही. या वक्तव्यावरून महार लोकांचे वास्तव्य व त्यांचे प्राचीनत्वयाचा सहज अंदाज येतो.

महार लोक हे लढवय्ये होते. त्यासोबतच ते मनमिळाऊ आणि चांगल्या स्वभावाचे होते. लिळाचरित्रामध्ये चक्रधरांचे शिष्य जेव्हा त्यांना विचारतात की आपण कुठे राहिले पाहिजे तर 'महाराष्ट्री असावे' असे म्हणून चक्रधर स्वामींनी महाराष्ट्राच्या लोकांचे गुण वर्णन केले आहे. महाराष्ट्राचे लोक स्वत: वाईट वागत नाही व इतरांनाही वाईट वागू देत नाही, असे ते म्हणतात. महारांच्या क्षात्रधर्माचे उदाहरण म्हणजे इंग्रजांनी महारांची एक लष्करी फलटणच उभी केली होती.इ.स. १८१८ मध्ये भीमाकोरेगाव येथे झालेल्या इंग्रज—पेशवा युध्दात इंग्रजांकडून लढणाऱ्या महार रेजिमेंटच्या केवळ पाचशे सैनिकांनी हजारो पेशव्यांच्या सैनिकांचा धुव्वा उडविला होता.यावेळी महार ही एक जात होती. पण या महार रेजिमेंटमध्ये केवळ महार लोकच नव्हते तर बहुजन समाजातील सर्व, मग ते कुणबी, तेली, सुतार, चांभार कोणीही असोत ते सर्व होते आणि आजही तशीच रचना भारतीय लष्करामध्ये आहे. बहुजन समाजाच्या सर्व जातीचे लोक ज्या रेजिमेंटमध्ये होते त्या रेजिमेंटला 'महार रेजिमेंट' हे नाव दिल्या गेले.

महार ही जात एका समूहापूरती मर्यादित नव्हती. जसा बिहारचा बिहारी, बंगालचा बंगाली तसा महाराष्ट्राचा महार अशी प्रदेशवाचक ओळख या शब्दाची होती. लढण्याची वृत्ती ही शासनकर्त्या लोकांमध्येच असते. किंवा असे म्हणता येईल की शासनकर्ते लढवय्ये असतात. त्याचप्रमाणे महार लोक हे केवळ महाराष्ट्राचे मूळनिवासीच नव्हतेतर ते शासनकर्ते, संरक्षणकर्ते व पालनकर्ते होते. या आधी म्हटल्याप्रमाणे वैदिकांचे ते महा अरि म्हणजेच मोठे शत्रू होते. वैदिकांच्या रानटी हल्ल्यांचा त्यांनी निकराने लढा दिला असला पाहिजे. प्रत्यक्षात त्यांच्याशी जे—जे महार प्राणपणाने लढले, त्यांचा पराभव झाल्यानंतर त्यांना गुलाम करण्यात आले. त्यामुळे त्यांच्या वाट्याला अगतिकता आली. ज्या लोकांनी वैदिकांशी समेट घडविला, वैदिकांनी थोडे अधिकार देऊन त्यांना आपल्यात सामावून घेतले व ज्यांनी प्रचंड विरोध केला, त्यांना मात्र मानवतेला लाजवून सोडवेल अशी समाजरचना करून त्यात अत्यंत हीन व खालच्या दर्जावर नेऊन ढकलले.

## सामाजिक व्यवस्था —

वैदिकांनी महाराष्ट्राचा प्रदेश म्हणजेच महारांचा प्रदेश जिंकल्यानंतर एक नवीन समाजरचना उभारली ज्यामध्ये जातिव्यवस्थेची उतरंड निर्माण करून स्वत:ला सर्वोच्च स्थानी व बाकीच्यांना आपल्या सोयीप्रमाणे त्यांचे वेगवेगळे स्थान निश्चित करून त्यांची कर्मेही ठरवून दिली. चातुर्वर्ण्य पध्दतीमध्ये ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य हे वैदिक होते. कालांतराने त्यांनी आर्य हे रूढ नाव धारण केले. शूद्र या चौथ्या वर्णात महारराष्ट्रातील सर्व मूळनिवासियांचा समावेश करून वरील तीन वर्णांची सेवा करणे हे कर्म त्यांच्या कपाळी मारले.

वैदिक चलाख होते. त्यांच्या देवसंकल्पना, जीवन जगण्याची पध्दती यावरून स्पष्ट होते की ते शत्रूच्या बाबतीत फारच निर्दयी होते. उत्तर जर्मनीतील वायकिंगस्च्या टोळ्यांशी वैदिकांचे खूपच साधर्म्य आहे. या वैदिकांनी आपला वंश वाढविण्यासाठी इथल्या मूळनिवासी स्त्रियांशीसंग केला. पण स्त्रियांना मात्र शूद्रच ठेवले. स्त्रियांच्या बाबतीतली त्यांची अनुदारता जगजाहीर आहे. अनेक अधिकारांपासून त्यांना वंचित ठेवण्यात आले. शत्रूला पायाखाली रगडून मारणे, त्यांचे तुकडे करणे, छाती—पोट फाडून त्यांचे रक्त पिणे, इ. सर्व प्रकार त्यांच्या देवांच्या कृत्यांशी निगडीत आहेत. हे रानटी कृत्य करणारे, संहार करणारे, आग लावून सर्व त्यात भस्मसात करणारे त्यांचे पूजनीय देव आहेत. जसा माणूस तसा त्याचा देव. यावरून त्यांच्या स्वभावातील भयानकता सहज प्रतीत होते. इतरांचा संहार करणारा तो आपला पालनकर्ता हे समीकरण त्यांच्या देवसंकल्पनेत आहे. अशा संकल्पना मनात बाळगणाऱ्या वैदिकांनी जेव्हा या नव्या सामाजिक व्यवस्थेची रचना केली, त्यावेळी त्यांनी अत्यंत जागरूकपणे सर्व मूळनिवासियांचे कायमचे विभाजन कसे होईल याकडे विशेष लक्ष दिले. जातिव्यवस्थेची निर्मिती करून ते प्रत्यक्षात उतरवले गेले. सामाजिक रचनेची व्यूहरचना करताना जातिव्यवस्थेचा तुरूंग उभारण्यात आला. प्रत्येक कक्ष दुसऱ्या कक्षाशी कोणतेही व्यवहार करेनासा होईल यासाठी त्या कक्षांचे रूपांतर वेगवेगळ्या जातींत करून त्यांचे आपापसातील सर्व व्यवहार बंद केले. एवढेच नव्हे तर प्रत्येक जातीमध्येस्वत:विषयी आणि इतर जातींविषयी न्यूनता, हीनता यावी यासाठी प्रचंड

प्रमाणावर धर्मग्रंथांची निर्मिती करून प्रत्येक जातीच्या उत्पत्तीची कहाणी रचण्यात आली. बहुतेक सर्व बहुजन जाती या हीनतेच्या मूळातूनच जन्मल्या असे पटवून देण्याची काटेकोर खबरदारी घेण्यात आली. प्रथमतः बळजबरीने हे नियम पाळवून घेण्यात आले. कालांतराने हेच नियम रूढी—परंपरेत बदलले. मूळात परंपराप्रिय असलेल्या बहुजन समाजात हे नियम हळूहळू झिरपत गेले.

या सामाजिक व्यवस्थेमध्ये चार वर्णांच्या व्यतिरिक्त अतिशूद्रांचा पाचवाही वर्ण होता ज्यामध्ये महार लोकांना ठेवण्यात आले. अर्थात हा पाचवा वर्ण मागाहून बनविण्यात आला. शूद्र वर्णामधील काही लोक जे वैदिकांच्या विरोधात बंडखोरी करत होते, बाकी लोकांना एकत्र जुळविण्याचा प्रयत्न करत होते, त्यांना गावाबाहेरचा रस्ता दाखविण्यात आला. गावाशी त्यांचे सर्व व्यवहार बंद करण्यात आले. महार लोक हे शरीराने काटक, मजबूत, उंच, आडदांड. त्यांचे शरीर कमजोर व्हावे म्हणून त्यांचे अन्न—पाणी तोडल्या गेले. वाडीत टाकून त्यांचे मानसिक खच्चीकरण करण्यात आले. विठोबा हे महारांचे दैवत. त्या देवापासूनही त्यांची ताटातूट करण्यात आली. उद्देश हा की महार लोकांचे वैयक्तिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक, भावनिक विस्थापन व्हावे. झालेही अगदी तसेच!

महाराष्ट्र शासनाच्या गॅझेटिअरमध्ये महाराष्ट्रातील अनेक जातींची माहिती सापडते. त्यामध्ये एक बाब महत्त्वपूर्ण अशी आहे की सर्व जातींच्या लोकांच्याबोलींमध्ये, मूळदैवतांमध्ये, दिसण्यामध्ये, आडनावांमध्ये एकसारखेपणा आहे. विशेषकरून कुणबी—मराठा यांच्याशी महारांचे खूपच साम्य आहे. फरक आहे तो पोषाखाचा व राहणीमानाचा. हा फरक सामाजिक व्यवस्थेमुळे आला, हे उघड आहे.वांशिक भेद त्यांच्यात नाहीत, याचाच अर्थ ते एकच समाजाचे घटक होते. प्राचीन महाराष्ट्रातील महान नाग संस्कृतीचे ते वंशज आहेत. पण वैदिकांनी निर्माण केलेल्या सामाजिक व्यवस्थेमुळे त्यांचे विभाजन झाले. हे विभाजन करण्यामागे वैदिकांची केवळ सूडबुध्दीच नव्हती तर येत्या काळात आपले संरक्षण बहुजनांकरवीच व्हावे शिवाय निरपवादपणे संपूर्ण समाजावर आपली सत्ता कायम रहावी याची तजवीज त्यांनी केली. आपल्या अस्तित्वाला धोका निर्माण होऊ नये म्हणून त्यांनी बहुजनांना शिक्षण बंदी केली. शिक्षण हा आत्मोन्नतीचा मार्ग ठरू शकतो म्हणून शंबूकासारख्या कहाण्या लिहून समाजावर आपली पकड पक्की करण्यात वैदिक यशस्वी झाले.

## आधुनिक स्थित्यंतर —

वैदिकांच्याच भाषेत बोलायचे झाले तर आपले ईप्सित साध्य करण्यासाठी त्यांनी यज्ञ उभारला. त्या यज्ञकुंडात मूळनिवासियांची आहुती दिली. पण राख होऊन आकाशात जाऊन पुन्हा पाऊस होऊन बरसात झाली ती १९ व्या शतकांतील ज्योतिबा फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर यांसारख्या महामानवांच्या रूपाने! या महापुरूषांनीच आधुनिक महाराष्ट्राचीच नव्हे तर संपूर्ण देशाची, जगाची सर्व उणिवांची तहान भागवली. फक्त त्यांनी वाढलेले पाणी प्राशन करता आले पाहिजे.

या संपूर्ण लेखात महार लोकांचा थोडासा इतिहास उलगडण्याचा प्रयत्न केला. हा इतिहासच भविष्य घडवू शकतो. 'महार' या शब्दाला लागलेले दूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केव्हाचेच पुसून टाकले आहे. तरीही भारतीय जनमानसात वैदिकांच्या विचारांचे एवढे तण माजले आहे की त्याच्या बुध्दीची सुपिकताच नाहिशी झाल्यागत आहे. मात्र त्यातही काही संघटनांच्या, महामानवांच्या विचारसरणीच्या माध्यमातून ते तण उपटून काढण्याचा स्तुत्य प्रयत्न होत आहे. शेवटी हा संस्कृती संघर्ष आहे. संस्कृतीचा लवलेशही नसलेल्या वैदिकांनी मूळनिवासी भारतीयांच्या संस्कृतीवर आक्रमण करून, तिला तोडून—मुरडून आपली संस्कृती बनविली. संस्कृतीचे खरे मालक आज सर्व गोष्टींपासून वंचित आहेत. हे चित्रही पालटेल यात शंका नाही. कारण जग हे अनित्य आहे.

## समारोप —

भौगोलिक व ऐतिहासिक अशी भक्कम पायाभरणी असलेला भारत देश सांस्कृतिकदृष्ट्या खूप समृध्द आहे. भारतीय संस्कृती फार प्राचीनतम आहे. उज्ज्वल संस्कृतीचं लेणं लाभलेल्या या देशातील सामाजिक व्यवस्थेत मात्र मोठी फट निर्माण झाली आहे. ही फट म्हणजे जातिव्यवस्था होय. आजच्या आधुनिक युगातही भारताच्या प्रत्येक शहरात, प्रत्येक खेड्यात जातिव्यवस्था दिसून येते. या जातिव्यवस्थेला हजारो वर्षांची परंपरा आहे.जातिव्यवस्थेच्या उतरंडीमध्ये खालच्या स्तरावर असणाऱ्या जाती या परंपरेच्या नाहक बळी ठरल्या आहेत. त्यापैकी एक जात म्हणजे 'महार'. या जातीचा इतिहास जाणून अभ्यासकांसमोर मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

कुठलीही परंपरा–प्रथा नेमकी कधी सुरू झाली हे निश्चित सांगणे कठीण जाते.तिचे प्रस्थापित रूप आपल्यासमोर येते तेव्हा प्रदीर्घ काळ निघून गेलेला असतो. जातिव्यवस्थाही अशाच पध्दतीने रूढझाली. व्यवसायातून जातिनिर्मिती, जातिनिर्मितीतून कर्मसिध्दांत, अशी दुहेरी वीण या प्रथेला आहे. त्यामुळे या प्रथेचा नेमका कालखंड सांगणे जड आहे.

महार लोक हे महाराष्ट्रातील मूळनिवासी आहेत.महाराष्ट्रातील असे एकही गाव–खेडे नाही जिथे महार नाही. अस्पृश्य ठरविल्या गेलेली ही जात वास्तविकतेत मात्र क्षात्रधर्माने परिपूर्ण होती. 'महार' हे नामाभिधान प्रदेशवाचक होते. ते आपल्या प्रदेशाचे रक्षण करणारे लढवय्ये होते. त्यांच्यातील या गुणाला पारखूनच इंग्रजांनी महार रेजिमेंट बनविली. या रेजिमेंटने १ जानेवारी १८१८ रोजी भीमाकोरेगााव येथे अन्यायी पेशव्यांचा पराभव केला. मोठ्या सत्तेला शह देऊन नामोहरम करण्याची ताकद असणारे ते असामान्य लोक होते. म्हणूनच त्यांच्या शौर्याचा गौरव करण्यासाठी इंग्रजांनी भीमाकोरेगाव येथे एक शौर्यस्तंभ उभारला. हा स्तंभ महारांमध्ये असणाऱ्या शौर्याचे प्रतिक आहे. या शौर्याला नमन करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर दरवर्षी जात. इतिहासाची सोनेरी पाने अनुभवण्यासाठी आजही लाखो महार त्याठिकाणी जातात. 'महार' या शब्दाची प्रतिष्ठा परत मिळवून देण्यासाठी हा लेखप्रपंच करण्यात आला.

## निष्कर्ष –

१. 'महार' हा जातिवाचक शब्द जातिव्यवस्थेच्या निर्मितीच्या आधी प्रदेशवाचक होता.
२. लढवय्ये व शूरतेचे प्रतिक असलेल्या महारांचे सर्व तऱ्हेचे विस्थापन करून त्यांची अस्मिता नाहिशी करण्यात आली.
३. 'महार' शब्दाचा मूळ अर्थ आणि त्याचे महत्त्व भारतीय बहुजन समाजाला पटवून देणे, हे गरजेचे आहे.

## संदर्भ –

१. 'अस्पृश्य मूळचे कोण', आंबेडकर भीमराव रामजी, नागपूर.
२. 'अक्षरधारा', संपादक मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, प्र.आ. २०१७.
३. 'आपला महाराष्ट्र–परंपरा व प्रगती', माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, १ मे १९८५.
४. 'प्राचीन भारतीय संस्कृती व सभ्यता', कोसंबी डी.डी., डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्र.आ.२००६.
५. 'बहुजनाचा बाप महारच होय', टिपले अनराज, सुधीर प्रकाशन, वर्धा, प्र.आ. २००७.
६. 'भारत की आदिवासी नाग सभ्यता एक महान आश्चर्य', डॉ. नवल वियोगी, सम्यक प्रकाशन, नवी दिल्ली, प्र.आ. २००८.
७. 'मराठी लोकांची संस्कृती', कर्वे इरावती, देशमुख आणि कंपनी, पुणे, दु.आ. १९६२.
८. 'महार आणि त्यांचे वतन', आंबेडकर भीमराव रामजी, नागपूर.
९. 'महाराष्ट्र : भूमी व लोक, महाराष्ट्र गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्र.आ. १९९६.

❖❖❖

## Form IV
(See Rule 8)

Statement about ownership and other particular about the Journal

## Research Journal of India


| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | Dr. Bhau Mandavkar Research Centre (DBMRC), Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | Annual |
| 3. Printer's Name | - | Seva Prakashan, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | Dr. Mrs. Veera Mandavkar |
| Nationality | - | Indian |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | Dr. Pavan Mandavkar |
| Nationality | - | Indian |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.



Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

**INDIRA MAHAVIDYALAYA**



KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401

☎ 07201-226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

www.researchjournal.net.in

Email: imvkalamb@yahoo.co.in

indiram414@sgbau.ac.in

For Research centre: researchjournalofindia@gmail.com

marathipradhyapak@gmail.com



Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC RE-ACCREDITED WITH 'B+' GRADE


| | | | |
|---|---|---|---|
| Annual Subscription | - | Individual / Institutional | ₹ 500/- |
| Account Details : Bank | - | Bank of Maharashtra | |
| Branch | - | Azad Maidan Road, Yavatmal | |
| IFSC code | - | MAHB0000047 | |
| MICR code | - | 445014001 | |
| A/c No. | - | 60175373000 | |
| A/C Name | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre | |


p ISSN 2349-9370

9 772349 937002

e ISSN 2582-4848

9 772582 484004



(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)